ऑक्टोबर २०१२। किंमत : ₹ १०

# लोकराज्य








## उद्योगात अग्रेसर
# महाराष्ट्र

RABHA

# दृष्टिक्षेपात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

| औद्योगिक क्षेत्रे | अधिसूचित | कार्यान्वित |
|---|---|---|
| मोठी | १०२ | ९६ |
| छोटी | ११४ | ९० |
| विकास केंद्रे – राज्य शासन | ५८ | ४६ |
| केंद्र शासन | ०४ | ०४ |
| एकूण | २७८ | २३६ |

| औद्योगिक क्षेत्राकरिता जमीन (हेक्टर) | नियोजित | ताब्यात |
|---|---|---|
| शासनाची | ९,४८१.३६ | ६,४८६.०४ |
| खाजगी | ८८,८८६.५५ | ५०,१६२.२१ |
| एकूण हेक्टर | ९८,३६७.९१ | ५६,६४८.२५ |

| औद्योगिक क्षेत्राकरिता जमीन (हेक्टर) | नियोजित | ताब्यात |
|---|---|---|
| शासनाची | २,३४३.१८ | १६७.४६ |
| खासगी | ४,३५७.१६ | ३,४२४.८५ |
| एकूण (हेक्टर) | ६,७००.३४ | ३,५९२.३१ |

| औद्योगिक भूखंडाचे क्षेत्रफळ (हेक्टर) | आखलेले | वितरीत | शिल्लक |
|---|---|---|---|
| | ३०५१२.४३ | २८०२२.५४ | २४८९.८९ |

| भूखंडाचे प्रकार (संख्या) | आखलेले | वितरीत | शिल्लक |
|---|---|---|---|
| औद्योगिक | ४६२६२ | ४२४४३ | ३८१९ |
| वाणिज्य | ४२०८ | ३२७२ | ९३६ |
| सुखसोयी | १५५२ | १३१५ | २३७ |
| निवासी | ४०१२ | ३२८३ | ७२९ |
| शेड्स | ६०३८ | ४२७९ | १७५९ |
| छोटे (भूपीडितांकरिता) | ४१०८ | ३९१७ | १९१ |
| एकूण | ६६१८० | ५८५०९ | ७६७१ |

| तयार शेड्स/गाळे (संख्या) | बांधून तयार | वाटप | शिल्लक |
|---|---|---|---|
| शेड्स | ४१०८ | ३९१७ | १९१ |
| गाळे अ) औद्योगिक | २२८९ | १३६० | ९२९ |
| ब) वाणिज्य | १९२ | १७१ | २१ |
| एकूण गाळे | २४८१ | १५३१ | ९५० |
| एकूण | ६५८९ | ५४४८ | ११४१ |

(संदर्भ: उद्योगसमृद्धी १९६२-२०१२)

वर्ष ६४ वे | अंक ७ | ऑक्टोबर २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन


# लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| व्यवस्थापकीय संपादक | प्रल्हाद जाधव |
| संपादक | सुरेश वांदिले |
| कार्यकारी संपादक | प्रभाकर मुराळकर |
| उपसंपादक | किरण केंद्रे |
| प्रशासन व वितरण अधिकारी | दिगंबर पालवे |
| वितरण अधिकारी | विलास बोडके |
| साहाय्य | सुधाकर गायकवाड<br>विद्या कदम |
| मुखपृष्ठ | राभा |
| मांडणी, सजावट | संदीप पवार |
| मुद्रण | एच. टी. मीडिया लि. दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई |


संपादकीय पत्ता
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मादाम कामा रोड, हूतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८
e-mail : lokrajya@dgipr.maharashtra.gov.in
lokrajya2011@gmail.com
ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in
वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७
e-mail : lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग

## औद्योगिक समृद्धीचा समर्थ पाया



राज्यात सुमारे ६३,००० हेक्टर क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २३३ लहान-मोठी औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली आहेत.

पान १०

## विशाल आघाडी



मोठ्या उद्योगांना विशिष्ट सवलती/प्रोत्साहने देऊन राज्यामध्ये औद्योगिक गुंतवणुकीचा ओघ वाढविणे आणि त्यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या भरीव संधी निर्माण करण्याकरिता विशाल प्रकल्पाची संकल्पना आकारास आली.

पान १५

## महा-सायबर-राष्ट्र



आठ वर्षांपूर्वी राज्य शासनाने माहिती तंत्रज्ञान धोरण आखले. यामुळे राज्यात पायाभूत सुविधा कमी किमतीत उपलब्ध करून देणे शक्य झाले. अधिकाधिक माहिती तंत्रज्ञान उद्योगांना महाराष्ट्राकडे आकर्षित करणे शक्य झाले.

पान १७

## हिंजवडी बहरली

पुण्याजवळील हिंजवडी येथे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नामांकित कंपन्यांनी माहिती तंत्रज्ञान घटकांची स्थापना केली व तद्नंतर तेथे अशी क्षेत्रे स्थापन होण्यास गती आली. आजघडीला हे ठिकाण जागतिक दर्जाचे आयटी हब म्हणून ओळखले जाते.



पान २९

## वाघांचा आणि विश्रामगृहांचा मेळघाट



रिमझिम पावसाच्या अंगावर अलगद पडणाऱ्या सरी, दऱ्यांमध्ये नजर वळली की दिसतात धो-धो कोसळणारे धबधबे, जणू स्वर्गात आल्याचा अद्भुत अनुभव आणि तो द्विगुणित करण्यासाठी मेळघाटात पर्यटकांची प्रतीक्षा करणारी ब्रिटिशकालीन विश्रामगृहे.

पान ५५

## याशिवाय


| | | | |
|---|---|---|---|
| संतुलित विकासाला प्राधान्य | ६ | दमदार झेप | ३५ |
| कायम टॉपवरच राहू... | ७ | मराठवाड्याचे टेकऑफ | ३६ |
| अर्थव्यवस्था गतिमान | | स्टील सिटी... | ४० |
| करणारी गुंतवणूक | ९ | झेप कोल्हापूरची | ४१ |
| आर्थिक समृद्धी आणि... | १३ | संधी आणि समृद्धी | ४३ |
| जैवतंत्राचे सामर्थ्य | १९ | अपूर्व अभियांत्रिकी | ४५ |
| प्रगती सुपरफास्ट | २३ | हलकी-फुलकी बैलगाडी | ४७ |
| प्रयोग भूमी | २५ | 'आरकेएस'ची झेप | ४८ |
| इंडस्ट्रियल कॉरिडॉर | २७ | देसाई बंधू : नावातच ब्रॅण्ड | ४९ |
| केशर कथा | २८ | उद्योगमित्र-प्रवासी भारतीय | ५० |
| औद्योगिक संस्कृतीचे नवे पर्व | ३१ | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रमय चरित्र' | ५१ |
| कर्तृत्व आणि कीर्ती | ३३ | वर्धा-श्रम आणि आश्रम संस्कृती | ५२ |
| समृद्धीच्या पुढच्या टप्प्यावर | ३४ | शिक्षणातून सुरक्षितता | ५८ |

**शिरपेचातील तुरे**

'लोकराज्य'चे विशेषांक, दूरदर्शनवरील जय महाराष्ट्र, आकाशवाणीवरील दिलखुलास हे कार्यक्रम म्हणजे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या शिरपेचातील तीन तुरे आहेत. आरोग्य विशेषांकामुळे आरोग्यविषयक विविध योजना राज्यातील जनतेपर्यंत पोहोचण्यास निश्चितच मदत झाली आहे.

**– विलास देशपांडे**
उपसंचालक (आयईसी), पुणे



'आरोग्यम् धन संपदा' हा अंक अतिशय उपयुक्त वाटला. आम्हा प्रशिक्षकांना गावोगावी जाऊन आहार व आरोग्याबाबत जागृती करावयाची असते. यासाठी अंकात सखोल माहिती मिळाली; तसेच आजीबाईचा फर्स्ट एड हा विभाग मनाला खूप भावला.



**– जयश्री भारद्वाज,** प्राचार्या,
अंगणवाडी सेविका प्रशिक्षण केंद्र,
लोणारा, नागपूर

**'लोकराज्य' एक परंपरा**

आरोग्य विशेषांकातील जनसामान्यांसाठी आरोग्य विषयक सरकारच्या योजनांवरील व आरोग्य विषयक सदरांवरील सर्वच लेख खूपच उपयुक्त आहेत. मी शिकत असताना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करताना हे मासिक उपयुक्त होते व आजही विद्यार्थी याचा उपयोग विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी करतात. त्यामुळे एवढेच म्हणावेसे वाटते की, लोकराज्य हे मासिक नसून एक परंपरा आहे.

**– मिलिंद रा. त्रिभुवन,**
शाखाधिकारी, आय.डी.बी.आय.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर

**मी चातकपक्षी**

चातकपक्षी जसा पावसाची वाट पाहतो तसा मी 'लोकराज्य'च्या अंकाची वाट पाहत असतो. शिक्षण विशेषांक खूपच आवडला. अंकाचे मुखपृष्ठ तसेच अंतरंग सतत आकर्षित करते. मी आता 'लोकराज्य'चा चातकपक्षी झालो आहे. यापुढेही वाचकांची तहान भागवावी, ही सदिच्छा.



**– सौदागर किसन काळे**
लक्ष्मी टाकळी, पंढरपूर, जि. सोलापूर

**परंपरा 'लोकराज्य'ची**

गेली अनेक वर्षे मी 'लोकराज्य'चा वाचक आहे. लोकराज्यची विशेषांक परंपरा आजही चालू आहे. शिक्षण विशेषांक हा खरोखरच वाचनीय अन् संग्रही ठेवावा असाच आहे. 'ओ.. नागपूर' हा लेख वाचनानंद आहे तर कुमारांसाठी माहितीचा खजिना, बालसाहित्य विशेष लेखामुळे बाल वाचक नक्कीच ही पुस्तके घेण्यास आपल्या पालकांना प्रवृत्त करतील यात शंका नाही.



**– नंदकुमार रोपळेकर,** गोरेगाव, मुंबई

**संग्राह्य 'लोकराज्य'**

दिवसभर शेतात, चिखलमातीत राबून मिळवलेल्या मजुरीतून मी लोकराज्यची वार्षिक वर्गणी भरलेली आहे. प्रत्येक अंकातील शब्दन्शब्द वाचत असतो, एवढी मला लोकराज्यची आवड आहे. अंकातील सर्व विषयांची समर्पक माहिती लोकांना व विद्यार्थ्यांना देत असतो. त्यामुळे सर्वांना उमेद व प्रोत्साहन मिळते. कमी किंमत, उत्तम कागद, आकर्षक स्वरूप, कलात्मक मांडणी असा सुंदर लोकराज्य कायम संग्रही असावा असाच आहे.

**– पी. आर. मोहिते,**
अध्यक्ष, श्रमिक सेवा विकास संघ, नागरदळे, जि. कोल्हापूर

**लोकराज्य स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी**

स्पर्धा परिक्षांसाठी लोकराज्य मासिकाची असलेली उपयुक्तता ओळखून सांगली शहरातील जय हिंद स्पर्धा परीक्षा प्रबोधिनीचे सर्वच्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी लोकराज्यचे वर्गणीदार झाले असून जय हिंद स्पर्धा परीक्षा प्रबोधिनीचे प्राध्यापक अशोक चौगुले आणि प्रा. सचिन रजपूत यांनी प्रबोधिनीच्या १२२ विद्यार्थ्यांची यादी जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांच्याकडे सुपूर्द केली.यावेळी प्रबोधिनीचे प्राध्यापक अशोक चौगुले, प्रा. सचिन रजपूत ,प्रा. इंद्रजित पाटील, प्रा. बाळकृष्ण अर्जुन, विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम पांढरे या विद्यार्थ्यांने केले तर आभार प्रा. किशोर आवटी यांनी मानले.



**'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...**

**वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)**

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी**

http://dgipr.maharashtra.gov.in

# उद्यमशील प्रतिभा



'**लो**कराज्य' चा ऑक्टोबर महिन्याचा अंक आपल्यापुढे सादर करताना मला आनंद होत आहे. आधुनिक भारताच्या दोन महान व्यक्तींचा जन्मदिवस ऑक्टोबर महिन्यात साजरा होतो. २ ऑक्टोबर हा राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच 'जय जवान जय किसान' असा नारा देणाऱ्या लाल बहादूर शास्त्री यांचा जन्मदिवस. शांततामय सहजीवन आणि सत्याचा मार्ग हाच खरा समाज उन्नतीचा आधार असल्याची उभ्या जगाला खात्री देणाऱ्या आणि ग्रामोन्नतीतून संपन्नतेचे स्वप्न पाहणाऱ्या महात्मा गांधीचे स्मरण स्फूर्तीदायी आहे. विजयादशमी आणि त्यापूर्वी येणारा नवरात्र उत्सव, त्यापुढे येणारा मुस्लीम बांधवांचा ईद-उल-झुआ (बकरी ईद) हा सणही ऑक्टोबर महिन्यात येत आहे. याच महिन्यात नागपूर येथे दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा होत आहे. शतकानुशतके जुन्या रूढी, परंपरा आणि अज्ञान यात अडकलेल्या दलित समाजाला नवा प्रकाश देण्याचे ऐतिहासिक कार्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने केले. भारतातील एका मोठ्या सामाजिक क्रांतीचे प्रतीक असणाऱ्या या सोहळ्यात लाखो लोक उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.

महाराष्ट्र हा शूरवीरांचा देश तर आहेच, पण उद्यमशील राज्य म्हणून गेली १०० वर्षे महाराष्ट्राची ओळख देशापुढे आहे. महाराष्ट्राच्या उद्यमशीलतेमुळे देशी-परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्राने आपला पहिला क्रमांक गेली अनेक वर्षे कायम ठेवला आहे. जागतिक पातळीवर आर्थिक मंदीचे वातावरण असतानाही महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाची गती कमी झालेली नाही. सन २०११-१२ मध्ये देशात आलेल्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्राकडे आकर्षित झाली. औद्योगिक विकासाला अतिशय अनुकूल असलेले वातावरण आणि उत्तम पायाभूत सुविधा या दोन कारणांमुळे गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे आकर्षित होत असतात. एप्रिल २००० ते जून २०१२ या कालावधीत देशात आलेल्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी एक तृतीयांश गुंतवणूक महाराष्ट्रात झाल्याचे दिसून येते. ऊर्जा, परिवहन, सॉफ्टवेअर, वित्त आणि बँकिंग, रिटेल क्षेत्रात गुंतवणुकीचे प्रमाण लक्षणीय आहे. महाराष्ट्रात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित व्हावी म्हणून सरकारने जैवतंत्रज्ञान धोरण, ई-गव्हर्नन्स धोरण, माहिती तंत्रज्ञान धोरण, विशेष आर्थिक क्षेत्र धोरण आणि पर्यटन धोरण आदी धोरणे आखली असून त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू आहे.

महाराष्ट्राच्या विशाल प्रकल्प धोरणाला गुंतवणूकदारांचा उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. मागील पाच वर्षांच्या कालावधीत मंजूर केलेल्या ३४३ विशाल प्रकल्पांद्वारे २.७८ लाख कोटी रुपये गुंतवणूक तर ३.१९ लाख रोजगाराच्या संधी अपेक्षित आहेत. सन २०११-१२ या वित्तीय वर्षात १.१२ लाख कोटींचे प्रस्तावित गुंतवणुकीचे विशाल प्रकल्प अंतिम करण्यात आले आहेत. समतोल विभागीय विकास हे शासनाचे अंतिम ध्येय आहे. वस्त्रोद्योग, माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, ऑटोमोबाईल्स, औषधी निर्माण, जैवतंत्रज्ञान, वाईन उद्योग या क्षेत्रात महाराष्ट्राने घेतलेली आघाडी आणखी बळकट केली आहे.

महाराष्ट्रात असणाऱ्या दर्जेदार पायाभूत सुविधा या जशा गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यास सहाय्यभूत ठरतात, त्याचप्रमाणे उत्तम तांत्रिक कौशल्य प्राप्त केलेल्या मनुष्यबळाची सहज उपलब्धतता, उत्तम कायदा व सुव्यवस्था, समृद्ध सांस्कृतिक वारसा, सामाजिक ऐक्य आणि परस्पर सहकार्य या बाबींसुद्धा फार मोठी भूमिका बजावत आहे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याचे गौरवाने संबोधले जाते. ही आर्थिक राजधानी दक्षिण आशियातील प्रमुख वित्तीय केंद्र व्हावे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मुंबईचा चेहरामोहरा बदलून ते एक दर्जेदार आंतरराष्ट्रीय शहर व्हावे यासाठी अनेक पायाभूत प्रकल्प राबविण्यात येत असून ते पूर्णत्वाच्या विविध टप्प्यावर पोहोचले आहेत. हे प्रकल्प पूर्ण होताच मुंबईच्या बदललेल्या स्वरुपाची जाणीव सबंध जगाला होईल. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात 'वर्ल्ड क्लास मुंबई' चा सर्वाधिक वाटा राहील. देशाचे रिटेल कॅपिटल, एन्टरटेनमेन्ट कॅपिटल म्हणून मुंबई; ऑटो, आयटी, बीटी हब म्हणून पुणे; सीड कॅपिटल म्हणून जालना आणि वाईन कॅपिटल म्हणून नाशिक उदयास आले आहे.

औद्योगिक विकास हा केवळ काही भागांपुरताच मर्यादित राहू नये, यासाठी महाराष्ट्राच्या सर्व भागात उद्योगधंदे स्थापित करण्यासाठी सरकार विशेष प्रयत्न करीत आहे. नागपूर, चंद्रपूर, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, नांदेड, लातूर, सोलापूर अशी नवी औद्योगिक केंद्रे आता विकसित झाली आहेत. या औद्योगिक विकासाचा चेहरा मानवी असेल याकडे विशेष लक्ष पुरविण्यात येत आहे.

मुंबई-नाशिक, पुणे-औरंगाबाद हा सुवर्ण चतुष्कोण विकास महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद अशी बाब ठरते. त्या माध्यमातून औद्योगिक, आर्थिक विकासाला आणखी गती मिळाली असून महाराष्ट्राला 'देशाचे ग्रोथ इंजिन' करण्यासाठी हा चतुष्कोण महत्त्वाची भूमिका बजावित आहे.

राज्याच्या औद्योगिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बजावलेल्या भूमिकेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. राज्याच्या औद्योगिक विकासाची पायाभरणी करणारे स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षातच औद्योगिक विकास महामंडळाचा सुवर्ण महोत्सव साजरा होण्याचा सुंदर सुवर्णयोग जुळून आला आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात लघु उद्योगांसोबतच ग्रामोद्योगांनीही महत्त्वाचा वाटा उचलला. त्यातून विपुल रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणाऱ्या साधन संपत्तीची निर्मिती झाली.

महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीच्या विविध बाजूंचा सर्वंकष आढावा लोकराज्यच्या या उद्योग विशेषांकात घेण्यात आला आहे. हा अंक लोकराज्यच्या या आधीच्या अंकाइतकाच आपणास आवडेल, अशी आशा आहे.

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in



# संतुलित विकासाला प्राधान्य

महाराष्ट्रात उद्योगवाढीसाठी स्वतंत्र असे वातावरण राज्याच्या स्थापनेपासूनच आहे आणि त्यामागे स्वर्गीय यशवंतरावजींची दूरदृष्टी आणि नियोजन याला श्रेय द्यावे लागेल. यशवंतरावजींनी अवघ्या चार महिन्यांत 'बोर्ड ऑफ इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट' या नावाचं मंडळ स्थापन केलं आणि राज्याला उद्योगाभिमुख बनवण्यासाठी पाया घातला.

मला जर विचाराल तर विदेशी गुंतवणुकीत राज्याचे उद्योग विश्वातील स्थान संपूर्ण देशात क्रमांक एकवर आहे, त्याला कारण आहे राज्यातील उद्योगांचा विभागनिहाय विकास. उद्योगांचे हब निर्माण करणाऱ्या औद्योगिक वसाहती विकसित झाल्या आणि उद्योगांना सवलती आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्याचे सकारात्मक परिणाम आज दिसत आहेत.

शासकीय व निमशासकीय उद्योगात रोजगाराच्या संधी वाढण्यास मर्यादा पडताहेत. परंतु खाजगी उद्योग क्षेत्रात मात्र रोजगारांच्या विपुल संधी उपलब्ध होत आहेत. या कारणामुळे राज्यात नामवंत उद्योग समूहांनी आर्थिक गुंतवणूक करुन प्रकल्प सुरू करण्यास सुरुवात केल्यानंतर मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ लागला.

आज माझ्या दृष्टीने उद्योगातील यश हे या क्षेत्रातील भौतिक गुंतवणूक, संपत्ती, मालमत्ता यावर अवलंबून नसून मानव विकासावर अवलंबून आहे. यामध्ये मानवी गुंतवणुकीच्या दर्जाला जास्त महत्त्व आहे.

### दिल्ली-मुंबई कॉरीडॉर

आपल्या समोर दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर ह्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती देण्याचे काम आहे. १४८२ किलोमीटर्सचा हा कॉरीडॉर देशातील सात राज्यांमध्ये उद्योगांचा एकात्मिक विकास करणार आहे. राज्यातील जेएनपीटी, नाशिक, दिघी, धुळे, शेंद्रा, तळेगाव अशा ठिकाणी विविध प्रकल्प या डीएमआयसी अंतर्गत उभारण्यात येतील.

### ई गर्व्हनन्स

एमआयडीसी आणि उद्योग विभागाने आपल्या कामकाजात ई गर्व्हनन्सचा समावेश करायला सुरुवात केली आहे ही चांगली गोष्ट आहे. ऑनलाईन माहिती देणे आणि त्यावर तातडीने प्रक्रिया करणे यादृष्टीने आपण पावले टाकली आहेत. ई गर्व्हनन्सचा परिणामकारक वापर केल्यामुळे निश्चितच गुंतवणूकदारांना प्रोत्साहन मिळणार आहे, त्याचप्रमाणे आपल्या अंतर्गत कामातही पारदर्शकता आणि शिस्त येणार आहे.

### औद्योगिक क्लस्टर्स

महाराष्ट्रामध्ये क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून आपण चांगल्या प्रमाणात औद्योगिक सुविधा निर्माण केली आहे. राज्यात सुमारे ५० क्लस्टर्स निश्चित केले असून या ठिकाणी औद्योगिक विकास सुरू आहे. सिंगल विंडो क्लिअरन्स त्याचप्रमाणे प्रोत्साहनपर सवलती आणि सूट देतांना संपूर्ण पारदर्शकता, क्लस्टर्समधील उच्च दर्जाचे पायाभूत सुविधा त्याचप्रमाणे योग्य नियोजन केल्यास औद्योगिक विकास नियोजनबध्दरीतीने होऊ शकेल.

### ७५ टक्के प्रकल्प मागास भागात

राज्यातील सर्व विभागांचा संतुलित विकास व्हावा यादृष्टीने आम्ही नियोजन सुरु केले आहे. एकूण मंजूर ३२४ मेगा प्रॉजेक्ट्सपैकी १११ प्रॉजेक्टस मागास भागांमध्ये उभारण्यात येत आहेत. विशेष आर्थिक क्षेत्रासाठी एकंदर १४३ प्रस्तावांना केंद्राने मंजुरी दिली आहे. एकूण मेगा प्रॉजेक्टपैकी ७५ टक्के प्रकल्प मागास भागात स्थापन झाले पाहिजेत असा आमचा आग्रह आहे.

### कौशल्य विकास

जमिनीचा अधिकाधिक योग्य वापर, औद्योगिकरणाचे विकेंद्रीकरण आणि कौशल्य विकास (Skil Development) अशा त्रिसूत्रीचा विचार केल्यास मागास भागांमध्ये निश्चितच प्रगतीला चांगला वाव आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा आणि उद्योगासाठी तयार होणारे मनुष्यबळ याची योग्य सांगड घालणे हे आमच्या समोरचे आव्हान आहे.

उद्योग-कृषी-शिक्षण असा एक सर्वसमावेशक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. त्यामुळे यातील सर्व घटकांना न्याय देणारे धोरण तयार होऊ शकेल. त्या भागातील किती जणांना आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून रोजगार मिळाला ते महत्त्वाचे आहे.

शिक्षण हे उद्योग व्यवसायाभिमुख व्हावे, यातून प्रॅक्टीकल ज्ञान मिळावे यादृष्टीने विशेषत: तरुणांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. मोठ्या उद्योगांच्या सामाजिक भावनेतून देखील काही उपक्रम येत्या काळात सुरू झाले तर शासनाच्या उद्दिष्टाला हातभार लागेल. येथील उद्योजकांनी मागास भागातील युवकांमध्ये स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी उद्योगी वृत्ती कशी वाढवता येईल, त्यांना कसे प्रशिक्षण देता येईल, कार्यशाळा, प्रदर्शने, चर्चासत्रे अशासारखे चांगले कार्यक्रम करण्याची गरज आहे.

### लवकरच लवचीक औद्योगिक धोरण

राष्ट्राच्या एकूण उत्पादनात महाराष्ट्राचा १५ टक्के इतका सर्वाधिक वाटा असून, १६ टक्के इतकी सर्वाधिक रोजगारनिर्मिती झाली आहे. देशाच्या एकूण थेट विदेश गुंतवणुकीच्या १/३ इतक्या गुंतवणुकीला आकर्षित करुन महाराष्ट्राने आपले प्रथम स्थान कायम राखले आहे. औद्योगिकीकरणाच्या २६ क्षेत्रांपैकी २० क्षेत्रांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. आपल्याला हे स्थान अधिक मजबूत करावयाचे असून त्यादृष्टीने शासन विविध प्रयत्न करीत आहे. लवकरच राज्याचे लवचीक असे औद्योगिक धोरण आम्ही जाहीर करणार आहोत. हे धोरण तयार करतांना उद्योगांना येणाऱ्या सर्व अडचणींचा पुरेपूर विचार आम्ही केला आहे. या धोरणाच्या अंतिम मसुद्याला मान्यता मिळेपर्यंत विविध सूचना आणि कल्पनांचे आम्ही स्वागत करतो. जागतिक आणि स्वदेशी गुंतवणूकदारांना सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी एक खिडकी सुविधेमार्फत सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहेत.

**'महाराष्ट्राची स्पर्धा अन्य कुठल्याही राज्याबरोबर नाही. आपली स्पर्धा आपल्याशीच आहे. उद्योग-व्यवसाय यांचा विकास व्हावा म्हणून प्रत्येक राज्य आजच्या काळात नवनवीन मार्गाने मार्केटिंग करत आहे. प्रत्येक मोठा उद्योग महाराष्ट्रातच आला पाहिजे असा आग्रह असू शकत नाही. महाराष्ट्र हा उद्योगाच्या बाबतीत 'लिडर स्टेट' होते आणि पुढेही राहील यात मला काही शंका वाटत नाही.'**

**- मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण...**

**शब्दांकन : सतिश लळीत**
**संपर्क : ९४२२४१३८००**

# कायम टॉपवरच राहू...

**- उद्योगमंत्री नारायण राणे**

**राज्यात 'विशाल प्रकल्प धोरण' मोठ्या प्रमाणात राबविले जात आहे, त्याच्या फलनिष्पत्तीबद्दल काय सांगता येईल?**

राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्ट्यातील उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरिता व औद्योगिकदृष्ट्या विकसनशील व मागास भागात उद्योग आकर्षित होण्यासाठी समतोल प्रादेशिक विकासावर लक्ष केंद्रित करून राज्य शासनाने विशाल प्रकल्प धोरण राबविले आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीस मोठा हातभार लागला आहे. अविकसित भागात जास्तीत जास्त विशाल प्रकल्प आकर्षित होऊन स्थानिक लोकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. विशाल प्रकल्प धोरणांतर्गत देशी विदेशी गुंतवणूकदेखील मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. या धोरणांतर्गत जनरल मोटर्स, वोक्स वॅगन, डेमलर क्रायसलर, सॅनी हेवी इंडस्ट्रीज, ब्रिज स्टोन, एल. जी. इलेक्ट्रॉनिक्स, मायको बॉश, बोईंग, इम्सोफर मॅन्युफॅक्चरींग, हुंडाई हेवी इंडस्ट्रीज, पियाजियो व्हेईकल्स, पोस्को लि. इत्यादी प्रतिष्ठित कंपन्यांनी राज्यात गुंतवणूक केली आहे.

**'सूक्ष्म लघु उपक्रम समूह विकास योजने'अंतर्गत राज्यात मोठी गुंतवणूक झाली असल्याचे सांगितले जाते. त्याची नेमकी स्थिती काय आहे?**

देशातील रोजगार निर्मिती आणि आर्थिक सर्वसमावेशकतेमध्ये लघुत्तम; तसेच छोट्या व मध्यम उद्योग क्षेत्राचे असामान्य स्थान आहे. देशाला आर्थिकदृष्ट्या बलशाली बनविताना हे क्षेत्र अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने विचार करणे अत्यावश्यक आहे. केंद्र शासनाने 'सूक्ष्म व लघु उपक्रम समूह विकास योजना' सुरू केली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ३० समूह विकास प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. यातून ४५० कोटींची गुंतवणूक व ८०,००० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून सूक्ष्म व लघु उपक्रमांच्या क्षमता वृद्धीसाठी व सामायिक सुविधांच्या विकासाकरिता साहाय्यक अनुदान देण्यात येते.

**औद्योगिक विकास महामंडळाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. या वाटचालीकडे आपण कसे पाहता?**

महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून औद्योगिक क्षेत्रात सदैव अग्रेसर राहिले आहे. राज्याचे पहिले मुख्यमंत्री (स्व.) यशवंतराव चव्हाण यांनी अंगीकारलेले विकासाभिमुख धोरण व त्यांचा भविष्यवेधी दृष्टिकोन याचेच हे फलित आहे. राज्य निर्मितीनंतर लगेचच यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिक प्रगतीचा पाय घालणारी धोरणे स्वीकारली. राज्याचा औद्योगिक विकास साध्य झाल्याशिवाय आर्थिक व सामाजिक बदल घडून येणार नाही, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. ही भूमिका केंद्रस्थानी ठेवून त्यांनी राज्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली. उद्योग विकासाच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल होते. गेल्या ५० वर्षांतील महाराष्ट्राच्या प्रगतीत आणि विकासाच्या वाटचालीत या महामंडळाचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. संपूर्ण राज्यात उद्योगांचे जाळे तयार करण्याच्या उद्देशाने या महामंडळाची स्थापना करण्यात आली. हे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये महामंडळाने व पर्यायाने राज्याने मोठ्या प्रमाणावर यश मिळविले आहे. मागास भागात उद्योगांची उभारणी करून त्या परिसरात सर्वांगीण विकास साधण्याचे शासनाचे धोरण आहे. या धोरणास अनुसरून महामंडळाने आज संपूर्ण राज्यात २३३ लहान-मोठी औद्योगिक क्षेत्रे निर्माण




**पुरोगामी व मोठ्या उद्योजकांची पहिली पसंती असणारे महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य आहे. राज्याचा गतीने व समतोल विकास व्हावा यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन व नव्या उद्योगांची निर्मिती यांची योग्य सांगड घालण्यात येत आहे. विविध भागांच्या औद्योगिक उद्योगांच्या विकासावर शासनाचा भर आहे.**

**महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य आहे. अधिकाधिक रोजगार निर्मिती करणारे उद्योग महाराष्ट्रातच आहेत. राज्याने औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्याचा अग्रक्रम कायम ठेवला आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा सर्वाधिक १२.४३ टक्के वाटा असून, गुजरातचा वाटा ७.२९ टक्के; बिहारचा वाटा ३.१६ टक्के आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न ८३ हजार ४७१ आहे. गुजरातचे ७५ हजार ११५ हजारांच्या जवळपास आहे, तर बिहारचे २० हजार ७०८ एवढेच आहे.**



### ‘दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर’ या प्रकल्पाची संकल्पना नेमकी काय आहे?






दिल्ली-मुंबई या दोन शहरांना जोडणारा रेल्वेचा डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर हा प्रकल्प भविष्यात औद्योगिक क्रांती घडवून आणेल. या कॉरिडॉरची लांबी १४८२ किलोमीटर आहे. हा फ्रेट कॉरिडॉर उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश व महाराष्ट्र या सहा राज्यांतून प्रवास करून जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या ठिकाणी येऊन मिळतो. यामुळे देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई ही दिल्लीला जोडली जाईल. या कॉरिडॉरच्या माध्यमातून विकासाचे नवे पर्व राज्यात सुरू होणार आहे. या प्रकल्पक्षेत्रात महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे व नंदुरबार आदी जिल्ह्यांचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत येऊ घातलेली उद्योगक्षेत्रे आंतरराष्ट्रीय दर्जाची असतील.

केली आहेत. पायाभूत सुविधा उपलब्ध करून गुंतवणूकदार व उद्योगांना महामंडळाने सतत सर्वतोपरी सहकार्य केले आहे. या माध्यमातून राज्याच्या आर्थिक विकासाची पायाभरणी करण्याचे कार्य महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केले आहे. या महामंडळामुळे मागास व ग्रामीण भागात उद्योग सुरू झाले. त्यामुळे विकासाला अधिक गती मिळाली. कुशल व अकुशल हातांना काम मिळून जीवन गतिमान झाले. वीज, पाणी यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक आघाड्यांवर महाराष्ट्राने आपली मुद्रा उमटवली आणि एक प्रगतशील राज्य, अशी ठळक ओळख निर्माण केली.

**प्रस्तावित नवीन औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये काय आहेत?**

राज्याची भविष्यातील गरज व सर्वांगीण प्रगती डोळ्यांसमोर ठेवून राज्याची औद्योगिक विकासात आघाडी कायम राहावी यासाठी शासनाने नवे औद्योगिक धोरण तयार केले असून, नव्या औद्योगिक धोरणात लघु व मध्यम उद्योजकांचा प्राधान्याने विचार करण्यात आला आहे. ग्रामीण व मागास भागात रोजगार निर्माण व्हावेत, हे नव्या औद्योगिक धोरणाचे मूलभूत सूत्र आहे.

राज्याच्या अविकसित भागावर लक्ष केंद्रित करून अशा भागांना विकसित भागाच्या समपातळीवर आणणे, हे प्रस्तावित नवीन धोरणाचे वैशिष्ट्य ठरेल. विशाल व अतिविशाल प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याबरोबरच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाच्या विकासाकरिता सर्वंकष दृष्टिकोन, रोजगाराभिमुख उद्योगांच्या वाढीकरिता पुढाकार घेणे, गुंतवणूकदारांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, औद्योगिक विकासासाठी जमिनीचा पर्याप्त वापर करणे, पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे, असक्षम आजारी उद्योगांच्या सुलभ बहिर्गमाकरिता व सक्षम आजारी उद्योगांच्या पुनर्वसनाकरिता साहाय्य करणे, उद्योगांना शाश्वत विकासाकरिता प्रोत्साहन देणे, वैश्विक बदल व काळाचा विचार करून पावले उचलणे. राज्याचा सर्वांगीण विकास साधणे.

**राज्यातील उद्योग क्षेत्रात काही अडचणी निर्माण होत आहेत. त्या दूर करण्याबाबत प्रस्तावित नवीन औद्योगिक धोरणात उपाययोजना सूचविल्या आहेत का?**

बंद पडणाऱ्या उद्योगांना सावरण्यासाठी नवीन औद्योगिक धोरणात उपाययोजना केल्या आहेत. त्यात पुनर्जीवनक्षम नसलेल्या उद्योगांना शासनाच्या देण्यांमधून बाहेर पडण्यासाठी नवीन विशेष योजना प्रस्तावित केली आहे. औद्योगिक वसाहतीमधील चटई निर्देशांकांत वाढ केली जाईल, बंद घटकातील स्थिर मालमत्ता विशेषत: जमिनीच्या पुनर्वापराकरिता शासनाच्या देण्यामधून मुक्त करण्याकरिता व पुनर्वापर सुलभ करण्यासाठी विशेष अभय योजना राबविली जाईल. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र स्थापन करण्यात येतील. यातून उद्योग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकेल.

**आपल्याकडील उद्योग परराज्यात जात आहेत, अशी चर्चा अधूनमधून होत असते, त्यात कितपत तथ्य आहे?**

राज्यातील उद्योग परराज्यात चाललेत, हा दावा खोटा असून वस्तुस्थिती वेगळी आहे. आज देशातील सर्वच राज्यांत उद्योग उभारणीमध्ये प्रचंड स्पर्धा सुरू आहे. त्यातही आपल्या राज्याने अग्रक्रम कायम राखला आहे. मुळात आपल्या राज्याचा औद्योगिक पाया व्यापक व भक्कम आहे. विशाल प्रकल्पांतर्गत सर्वाधिक उद्योग महाराष्ट्रात उभारले गेले आहेत. महाराष्ट्रातच मोठ्या प्रमाणात थेट परदेशी गुंतवणूक झाली आहे. देशातील एकूण थेट परदेशी गुंतवणुकीपैकी ४२ टक्के गुंतवणूक आपल्या राज्यात प्रत्यक्षात अंमलात आली आहे. रोजगार निर्मिती व विकासाची वाटचाल सतत उंचावत राहिली आहे. गतकाळातील औद्योगिक प्रगतीचा आम्हाला अभिमान आहे; परंतु तेवढ्यावर समाधानी न राहता भविष्यातही सतत पहिल्या क्रमांकावर राहण्यासाठी आम्हाला सतत प्रयत्नरत राहावे लागणार आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण आखले आहे. निरंतर प्रगतीसाठी भविष्यातही आम्ही कटिबद्ध राहू, यात शंका नाही.

**शब्दांकन : काशिबाई थोरात**
**संपर्क :९५०३२८०३७०**

# अर्थव्यवस्था गतिमान करणारी गुंतवणूक

**नवीन उद्योजक राज्यात यावेत, त्यांनी औद्योगिक गुंतवणूक करावी यासाठी पोषक वातावरण उद्योग विभागाने निर्माण केले. राज्यात १७,५८३ औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी ७,३६० उद्योग प्रकल्पांनी राज्यात उत्पादन सुरू केले. याद्वारे रु. १,६९,७१२ कोटींची गुंतवणूक झाली असून, ९.०२ लाख रोजगार निर्मिती झाली आहे.**

महाराष्ट्र हे औद्योगिक गुंतवणुकीसाठी सर्वात जास्त पसंतीचे राज्य आहे. मुंबईबरोबरच पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद ही शहरेदेखील औद्योगिक क्षेत्र म्हणून उदयास येत आहेत. मागील तीन वर्षांत राज्याच्या अर्थव्यवस्थेत सरासरी वाढ ९ टक्के राखण्यात यश मिळाले आहे.

राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्ट्यांचे विकेंद्रीकरण करण्याकरिता व राज्यातील औद्योगिकदृष्ट्या विकसनशील व मागास भागात उद्योगधंद्यांना आकर्षिक करण्यासाठी उद्योग विभागामार्फत सामूहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत विशाल प्रकल्प अंतर्भूत आहे. विशाल प्रकल्पांसाठी शासनाने गुंतवणुकीची मर्यादा निश्चित केली आहे. यामुळे राज्यात अधिक गुंतवणूक आकर्षित होऊन उद्योगांद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. राज्यात एकूण ३४४ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे.

परदेशी गुंतवणुकीसाठीही राज्याला पसंती दिली जात आहे. केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या एकूण प्रस्तावात राज्याचा २३ टक्के वाटा आहे. राज्यात मंजूर झालेल्या प्रकल्पांपैकी १,९२८ प्रकल्प उत्पादन करीत असून त्यायोगे रु. ४९,७७६ कोटी इतकी गुंतवणूक झाली आहे.

मोठ्या उद्योगांबरोबरच राज्यात किरकोळ व्यापार क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात वाव उपलब्ध आहे. मात्र, यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत मराठवाडा विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले. या योजनेंतर्गत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र येथे सुविधा निर्माण करून किरकोळ व्यापार क्षेत्रात प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. मागील तीन वर्षांत एकूण ३२४ प्रशिक्षण कार्यक्रमांमधून मराठवाड्यामधील आठ जिल्ह्यांतील ४८१२ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

उद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने १३ जिल्ह्यांमध्ये उद्योग सेतूची स्थापना केली आहे. याद्वारे उद्योगांशी संबंधित ४७ ना हरकत प्रमाणपत्र परवाने देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यातील द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण, २०११ अंतर्गत नव्याने विकसित होत असलेला वाईन उद्योग तसेच काजू प्रक्रिया उद्योग यांना प्रोत्साहन अनुदान देऊन या उद्योगांना चालना देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. त्यानुसार राज्यातील वाईन उद्योग घटकांना आतापर्यंत रु. १२.४३ कोटी तर काजू प्रक्रिया उद्योग घटकांना रु १२.२० कोटी अनुदान मंजूर व वाटप केले आहे.

राज्यातील लघुउद्योग घटकांना नवी दिशा दाखवून त्यांच्या विकासासाठी मदत करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ स्थापन करण्यात आले होते. गत ५० वर्षांच्या वाटचालीत महामंडळाने भरीव कामगिरी केली असल्याचे दिसून येते. सन २००७-०८मध्ये महामंडळाची आर्थिक उलाढाल रु. २५९.५२ कोटी होती तर २०११-१२ या वर्षात रु. ५५३.८२ कोटींची आर्थिक उलाढाल महामंडळाने केली आहे. लघुउद्योग घटकांनी उत्पादित केलेल्या उत्पादनास स्थिर बाजारपेठ मिळवून देण्याबरोबरच त्यांना उत्पादनाची विक्री करण्यासाठी महामंडळ मदत करीत आहे.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून गौरविल्या जाणाऱ्या स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण या वर्षी साजरे करीत आहोत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम.आय.डी.सी.) स्थापनेची संकल्पना त्यांचीच होती. मुंबईतील उद्योगधंदे टिकविण्याबरोबर मुंबईबाहेरही औद्योगिक वसाहती निर्माण झाल्या पाहिजेत, असे विचार त्यांनी मांडले होते. या विचारांचे आज दृश्य व सकारात्मक रूप पाहावयास मिळते आहे. एम.आय.डी.सी. महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने एक शक्ती बनली आहे.

राज्यात नव्याने येणाऱ्या उद्योगांच्या संख्येसोबत कंपन्यांचा दर्जा व त्याद्वारे होणारी गुंतवणूक व रोजगार निर्मिती याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. राज्यात मे. जनरल मोटर्स, वोक्स वॅगन, डेमलर क्रायसलर, सॅनी हेवी इंडस्ट्रीज, ब्रिज स्टोन, एल.जी. इलेक्ट्रॉनिक्स, मायको बॉश, बोईंग, हुंडाई हेवी इंडस्ट्रीज, पोस्को लि., इम्सोफर मॅन्युफॅक्चरिंग अशा अनेक प्रतिष्ठित कंपन्यांची गुंतवणूक आकर्षित झाली आहे. देशातील औद्योगिक उत्पादन व नक्त मूल्य वृद्धीमध्ये राज्याचा २० टक्के वाटा आहे, तर आश्वासक औद्योगिकीकरणामुळे सेवा क्षेत्रातील स्थूल उत्पादनातील वाटा ५९ टक्के आहे. हे साध्य करण्यासाठी उद्योग विभागाने गुंतवणुकदारांना राज्यात गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण केल्याने हे शक्य झाले.

(शब्दांकन : शांताराम शेरवाडे)
संपर्क : ९८६९०७००५३



सचिन अहिर, उद्योग राज्यमंत्री

**राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक उपक्रमांद्वारे स्थानिक लोकांना प्राधान्याने नोकरी मिळाली पाहिजे या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. राज्यातील औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिकांना रोजगार देण्याचे बंधनकारक केले आहे.**

● गंगाधर बनबरे

# औद्योगिक समृद्धीचा समर्थ पाया



१९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) स्थापना केली. राज्यात उद्योगधंद्यांची त्वरित व पद्धतशीररीत्या स्थापना करून त्यांची वाढ व विकास घडवून आणण्यास चालना व मदत देणे हे महामंडळाचे ध्येय आहे.

**राज्यात सुमारे ६३,००० हेक्टर क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २३३ लहान-मोठी औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली आहेत.**

मुंबई-पुणे येथील उद्योगांचा सुव्यवस्थित विकास करणे व राज्यातील इतर भागांत नवीन औद्योगिक क्षेत्रे स्थापन करून त्यांना उत्तेजन देणे हे महामंडळाचे सुरुवातीचे उद्दिष्ट होते. जमीन, वीज व पाणी तसेच उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा देऊन राज्याने औद्योगिक क्षेत्रात आघाडी घेतली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून माहिती व तंत्रज्ञान, जैविक तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग, हिरे व दागिने उद्योग यांना उत्तेजन दिले आहे.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा मुंबईचा काही प्रमाणात औद्योगिक विकास झालेला होता. त्याला १०० वर्षांची परंपरा होती. राज्याचा विकास करायचा तर उद्योगाचे विकेंद्रीकरण गरजेचे होते. याची जाणीव पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना होती. राज्याच्या औद्योगिक क्रांतीचा पाया यशवंतराव चव्हाण यांनी घातला. राज्याचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर उद्योगांशिवाय पर्याय नाही. ग्रामीण व मागास भागात उद्योगांचे जाळे उभारूनच हे शक्य होईल, याचा त्यांनी विचार केला. राज्य उद्योगाभिमुख होण्यासाठी महाराष्ट्राच्या जन्मापासून त्यांनी उद्योगपूरक धोरण आखायला सुरुवात केली. त्यामुळे महाराष्ट्राचे आजचे उद्योग क्षेत्रातील स्थान अढळ आहे. देश-विदेशातील गुंतवणूक राज्यात होऊन राज्य उद्योगात अग्रेसर राहिले आहे.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिक धोरणाविषयी आपल्या पहिल्या भाषणात भूमिका व्यक्त केली.

राज्यनिर्मिती होऊन चार महिनेही झाले नव्हते, त्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी बोर्ड ऑफ इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट या नावाचं एक मंडळ केलं. हे मंडळ झपाट्यानं कामाला लागलं व त्यांनी राज्याच्या उद्योगाचा आराखडा तयार केला. संपूर्ण राज्याचा भौगोलिक व इतर अभ्यास करून कोणत्या प्रदेशात कोणते उद्योग उभारता येतील याची माहिती तयार केली. राज्याचे उद्योग धोरण हा राज्याचा प्रमुख भाग आहे. तो कायमस्वरूपी व्यवस्थेचा भाग व्हावा म्हणून या मंडळाने 'महाराष्ट्र उद्योग कायदा' मंजूर केला. राज्याच्या सर्व उद्योगाभिमुख धोरणांचा समावेश या कायद्यात करण्यात आला. पुढे या कायद्याच्याच आधारे १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली. अशा प्रकारचा उद्योग कायदा व महामंडळ स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले. पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत एका लहानशा कार्यक्रमाचे आयोजन ठाणे येथे करून एमआयडीसीची सुरुवात झाली. यशवंतराव चव्हाणांनी लावलेल्या या लहानशा रोपट्याचा आज महावृक्ष झाला आहे. इतर राज्याच्या तुलनेत औद्योगिक महामंडळ हे महाराष्ट्राचे वेगळे वैशिष्ट्य ठरले आहे.

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाची सभा १९ मे १९६१ रोजी मुंबई येथे झाली. 'औद्योगिक विकासाच्या नव्या दिशा' या विषयावर यशवंतराव चव्हाण यांनी विचार मांडताना औद्योगिक वसाहती व उद्योगाच्या विकेंद्रीकरणाची चर्चा केली.



**आपले राज्य हे उद्योगधंद्याच्या बाबतीत भारतात सर्वांत आघाडीवर आहे. त्यामुळे राज्यातील उद्योगधंद्याचा केवळ राज्याच्याच नव्हे, तर सर्व देशाच्या अर्थव्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्याचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकणार नाहीत. तेव्हा अशा परिस्थितीत औद्योगिकीकरणाची गती ज्यामुळे रोखली जाईल व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल असे काहीही न करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते. उत्पादन सारखे होत राहण्यासाठी व त्यात वाढ होण्यासाठी उद्योगधंद्यांचा कारभार सुरळीत चालला पाहिजे.**

**- यशवंतराव चव्हाण**

"सरकारने औद्योगिक विकासाचा जो मास्टर प्लॅन तयार केला आहे, त्यात कोणत्या भागात अर्थव्यवस्थेची शहरी भागातील अर्थव्यवस्थेशी योग्य प्रकारे सांगड घातली जाईल आणि खेड्यातून शहराकडे कोणत्या उद्योगधंद्यांचा विकास होऊ शकेल यासंबंधी सविस्तर दिग्दर्शन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या कामी उद्योगपतींना त्वरित मदत मिळावी म्हणून सरकारच्या उद्योग विभागामार्फतही व्यवस्था करण्यात आली आहे.

ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची उभारणी करण्याच्या दृष्टीने ज्या औद्योगिक वसाहती स्थापन करावयाच्या आहेत, त्यांना मी फार महत्त्व देतो. या औद्योगिक वसाहतीत रस्ते, वीज, पाणीपुरवठा वगैरे सोयी उपलब्ध होणार असून, त्यामुळे तेथे छोटे-





छोटे उद्योगधंदे सुरू करण्यात चांगलाच वाव मिळणार आहे. या सोयींचा जास्तीत जास्त फायदा घऊन विजेवर चालणाऱ्या छोट्या-छोट्या उद्योगधंद्याची सुरुवात व वाढ करण्याच्या दृष्टीने प्रत्येक भागासाठी निश्चित स्वरूपाची योजना तयार करण्यात आली पाहिजे. शहरी भागात आज जे मोठे व मध्यम स्वरूपाचे उद्योगधंदे केंद्रित झाले आहेत, त्यांना ग्रामीण भागातील हे छोटे उद्योगधंदे पूरक ठरतील.

मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उद्योगधंद्यातील उत्पादन विभागाचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागात निघणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांकडे हे काम सोपविण्याचा पद्धतीशीर प्रयत्न झाला पाहिजे. यामुळे ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेची शहरी भागातील अर्थव्यवस्थेशी योग्य प्रकारे सांगड घातली जाईल आणि खेड्यातून शहराकडे धाव घेण्याची लोकांत आज जी प्रवृत्ती दिसून येते तिलाही आळा बसेल.

ग्रामीण भागात याप्रमाणे शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे निघाल्यास शहर भागातील उद्योगधंद्यांकडे कच्च्या मालाची वाहतूक करण्यात होणारे परिश्रम वाचतील. शिवाय ग्रामीण भागातील या उद्योगधंद्यामुळे शेतकरी वर्गास रोजगारीचे एक साधन उपलब्ध होईल आणि त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा राहणीचा दर्जाही सुधारेल.''

**पायाभूत सुविधांची निर्मिती**

जमीन, वीज आणि पाणी हे उद्योगाचे प्रमुख घटक आहेत. जमीन संपादन करून उद्योगांना द्यावी लागते. त्यावर पायाभूत सुविधा निर्माण केल्याशिवाय उद्योग उभारला जात नाही. या बाबी उद्योगांना सहज मिळाव्यात यासाठी राज्याने धोरण तयार केले. महामंडळाने सरकारी मालकीची पडीक व जिच्यावर काहीच उगवत नाही अशी पडीक जमीन ताब्यात घेऊन तिच्यावर वीज, पाणी व इतर सुविधा निर्माण केल्या. ही विकसित जमीन उद्योगांना दिली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात उद्योग उभारले गेले. राज्यात सर्वत्र औद्योगिक वसाहतीचे जाळे तयार केले. यातून पुढच्या औद्योगिक प्रगतीचा भक्कम पाया घातला गेला.

स्थापना झाल्यानंतर प्रथम काम सुरू केले तेव्हा महामंडळाकडे मुंबईच्या हद्दीत ३०० एकर व कल्याण - अंबरनाथ येथे ४०० एकर जमीन होती. महामंडळाने झपाट्याने काम करून पहिल्या २० महिन्यांतच १७ औद्योगिक क्षेत्रांचा विकास करून तयार प्लॉट उद्योजकांना दिले. वीज, पाणी, रस्ते याची उपलब्धता महामंडळाने करून दिली. यातून अनेक उद्योग तातडीने व कमी कालावधीत उभारले गेले. १९६२ साली चीनचे आक्रमण व १९६५ साली भारत-पाक संघर्ष असतानाही एमआयडीसीच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील उद्योगांचा विकास झाला. पहिल्या पाच वर्षांत सुमारे २०० कोटी रुपये भांडवल नवीन उद्योगधंदे काढण्याकडे आकर्षिले गेले. देशातील इतर राज्यांशी तुलना करता तेव्हा महाराष्ट्राची प्रगती एक नंबरवर होती. राज्याने आखलेले उद्योगाभिमुख धोरण किती प्रभावी ठरले त्याचा हा पुरावाच होता.

**महामंडळाने राज्यात ९९ मोठी औद्योगिक क्षेत्रे, ५८ विकास केंद्रे, ५ केंद्र शासन पुरस्कृत विकास केंद्रे व १०९ छोटी औद्योगिक क्षेत्रे, ९३ मोठी औद्योगिक क्षेत्रे, ४६ विकास केंद्रे व ९० छोटी औद्योगिक क्षेत्रे कार्यान्वित केली आहेत.**

१९६० साली महाराष्ट्रात हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच उद्योग होते. त्यातही मुंबईत त्यांची संख्या जास्त होती. मुंबई-पुणे वगळता राज्याची औद्योगिक प्रगती नव्हती. मुंबई, पुणे, ठाणे, कोल्हापूर या ठिकाणी काही प्रमाणात उद्योग सुरू होते. यात ब्रिटिश काळातील मुंबईच्या ६२ कापडगिरण्या, हिंदुस्थान पेट्रोलिअमचे कारखाने, किर्लोस्कर कारखाना, देहूरोड, भुसावळ, अंबरनाथ येथील सैन्यदलासाठी दारूगोळा बनवणारे कारखाने, तळेगावचा काच कारखाना, मुंढव्याची कागदगिरणी, नागपूरची एम्प्रेस मिल, ओगल्यांचा कारखाना अशी स्थिति होती. १९६२ ला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली व राज्याचे औद्योगिक चित्र बदलले. राज्याने उद्योग क्षेत्रात अढळ स्थान निर्माण केले.

**स्पर्धेत आघाडी**

औद्योगिक प्रगतीच्या आधारे भारतीय उद्योग जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होण्यासाठीची प्रक्रिया गतिमान करण्याकरिता केंद्र शासनाने १९९१ मध्ये औद्योगिक धोरणामध्ये सुधारणा केली. जास्तीत जास्त औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी राज्य शासनानेही केंद्र सरकारच्या धर्तीवर धोरणामध्ये व अंमलबजावणीत विविध सुधारणा अंमलात आणल्या आहेत. गुंतवणूक व उद्योगांची वाढ होऊन राज्य उद्योगात अग्रेसर राहिलेले आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक विशेषत: सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना शासनाकडून मदतीची आवश्यकता आहे. या संदर्भात मागासलेल्या भागात औद्योगिकीकरणास चालना व प्रोत्साहन देणारे पूरक धोरण अवलंबणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. औद्योगिक धोरणातील सुधारणांमुळे औद्योगिक परवाना प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी कमी झाल्या. उद्योगातील गुंतवणुकीवरील व विस्तारावरील बंधने काढून टाकण्यात आली आणि विदेशी गुंतवणुकीचा मार्ग सुलभ झाला आहे. त्यामुळे नवीन उद्योग, कारखाने व अतिविशाल प्रकल्प यात राज्याने आघाडी घेतली.

**उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण**

मुंबई, ठाणे व पुणे या महानगराच्या परिसरातून उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण होऊन औद्योगिकीकरणाची व्याप्ती राज्याच्या विकसनशील तसेच मागास भागात वाढून सर्व राज्याचा संतुलित विकास घडून यावा असे राज्य शासनाचे धोरण आहे. या धोरणानुसार महामंडळाने कार्य करून आपले कार्य तालुकापातळीपर्यंत पोहोचविले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक तरी औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आले आहे.

**माहिती तंत्रज्ञान उद्याने, पर्यावरणीय प्रकल्प, रस्ते विकास, फ्लोरिकल्चर, वाईन पार्क, सिल्व्हर पार्क, फूड पार्क, टेक्सटाईल्स पार्क अशा उद्योग उभारणीतून राज्याचा आर्थिक व सामाजिक चेहरा बदलला आहे. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर या विशाल व क्रांतिकारी प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ राज्यात नोडल एजन्सी म्हणून कार्य करीत आहे. पायाभूत सुविधांची पूर्तता व इतर आवश्यक विकासकार्यात महामंडळ महत्त्वाची भूमिका या प्रकल्पाच्या उभारणीत निभावत आहे. या प्रकल्पाच्या प्रभावक्षेत्रात मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, पुणे, धुळे, नंदुरबार आदी जिल्ह्यांचा समावेश आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर लोकांच्या जीवनात बदल घडून येईल.**

विकसनशील व मागास विभागातील औद्योगिक विकासावर महामंडळाने विशेष भर दिला आहे. होतकरू उद्योजकाला आपल्या सोयीनुसार व पसंतीनुसार त्याला पाहिजे असलेल्या क्षेत्रात जलदगतीने उद्योग उभारता यावा यासाठी महामंडळ सदैव तत्पर असते. अशा क्षेत्रांमध्ये रस्ते, रस्त्यावरील दिवाबत्ती, पाणीपुरवठा, जलनिस्सारण व्यवस्था तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे धोरण महामंडळाने अंगीकारले आहे.

**उद्योजकांना प्रोत्साहन**

१ ऑगस्ट १९६२ रोजी मऔविमची स्थापना झाली. राज्य उद्योगात आघाडीवर नेण्यासाठी शासनाने धोरण ठरवले होते. त्यानुसार त्वरित कार्य सुरू करण्यात आले. उद्योगधंद्याची वाढ व विकास करण्यासाठी त्यांना पायाभूत सुविधांची गरज होती. महामंडळाने अत्यंत झपाट्याने औद्योगिक क्षेत्र निर्माण करून त्यांचा विकास केला. संपूर्ण औद्योगिक वसाहतीवर पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करून तयार प्लॉट उद्योजकांना दिले. विकसित औद्योगिक वसाहतीत उद्योग उभारणीसाठी उद्योजकांना यामुळे प्रोत्साहन मिळाले. मोठ्या प्रमाणात उद्योजक व गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे आकर्षिले गेले. आज संपूर्ण राज्यात सर्वच जिल्ह्यांत लहानमोठी व काही ठिकाणी पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रे महामंडळाने विकसित केली आहेत. महामंडळाने स्थापनेनंतर त्वरित १७ औद्योगिक क्षेत्रे विकसित करून औद्योगिक प्रगतीचा पाया घातला.

महामंडळाच्या सूचक आकडेवारीनुसार, राज्यात १९६७-६८ साली कारखान्याची संख्या ठाणे २०३, कळवा १८, डोंबिवली ४८, अंबरनाथ २३, बदलापूर १, पिंपरी - भोसरी ३३, नाशिक २६, औरंगाबाद ७, जळगाव ५ अशी एकूण ३६४ होती. रत्नागिरी, चिपळूण, रोहे, कल्याण, भिवंडी, भांडुप, धुळे, अकोला येथे औद्योगिक वसाहती महामंडळाने विकसित केल्या होत्या. परंतु, उत्पादन सुरू झाले नव्हते. महामंडळाच्या कार्यातून व पायाभूत सुविधा पुरविण्याच्या तत्परतेतून २००८-०९ साली सुमारे ३१,७१३ कारखाने उत्पादन करीत होते व या प्रगतीचे सातत्य राज्याने राखले आहे.

महामंडळ आपला सुवर्णमहोत्सव साजरा करीत असताना स्थापनेपासूनची ५० वर्षांची वाटचाल महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाबरोबर आर्थिक व सामाजिक विकासात अत्यंत महत्त्वाची राहिलेली आहे. राज्याची स्थापना व त्यानंतरचा आर्थिक सामाजिक विकास पाहिल्यास या गोष्टी लक्षात येतात.

**स्थानिकांना रोजगार**

महामंडळाच्या प्रोत्साहन व सहकार्यामुळे मुंबईबाहेर मागास भागात मोठ्या प्रमाणात उद्योगांची उभारणी झाली. यातून स्थानिक लोकांना रोजगार मिळाला. त्या त्या भागाचा विकास होऊन सामाजिक बदल घडून आला. रोजगार व पैसा यातून नागरिकांचे जीवनमान बदलले. जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल होऊन सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया घडून आली. महानगर व शहरांकडे जाणारा लोंढा थांबून नवी औद्योगिक शहरे निर्माण झाली. याचा मागास भागाचा विकास होण्यासाठी सकारात्मक परिणाम घडून आला.

महामंडळाने राज्यभर औद्योगिक वसाहतींचे जाळे निर्माण करून स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन दिले. तसेच मोठ्या उद्योगांना या परिसरात उद्योग उभारणीसाठी सवलती दिल्या. त्या त्या भागातील कच्चा माल व त्यावर आधारित उद्योग उभे राहिले. केवळ औद्योगिक क्रांती ही समग्र परिवर्तन नव्हे. यातून समाजविकास झाला पाहिजे. समाजाच्या आर्थिक गरजांची पूर्तता होऊन इतर जीवनमूल्यांकडे त्याची दृष्टी वळण्याची गरज आहे. ही जीवनमूल्ये समाजविकासाचाच एक भाग आहेत. मूलभूत गरजा व शिक्षण याची पूर्तता ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी आवश्यक आहे. औद्योगिक विकासातून या प्रकारच्या समाजबदलाची आवश्यकता आहे. महामंडळाच्या कार्यातून या सामाजिक विकासाला गती प्राप्त झाली.

यशवंतराव चव्हाण यांचा दिशादर्शक वारसा पुढे नेताना वसंतदादा पाटील यांनी उद्योगांची कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन अभियांत्रिकी व तंत्रशिक्षणाची परवानगी खाजगी महाविद्यालयांना दिली. यातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ तयार झाले. शेतकरी, शेतमजूर व वंचित घटकांना या शिक्षणाचा फायदा झाला. हे कुशल मनुष्यबळ उद्योगांना मिळाले. यातून रोजगार व सामाजिक बदल घडून आला.

महामंडळाच्या स्थापनेप्रसंगी अत्यंत कमी उद्योग राज्यात होते. उद्योगांमुळे राज्यात एक चांगली आर्थिक परिस्थिती निर्माण झाली. शेतीपूरक उद्योग उभे राहिले. महाप्रकल्पांची निर्मिती झाली. जगभरातील गुंतवणूकदार राज्यास गुंतवणुकीसाठी प्रथम पसंती देऊ लागले. उत्पादन वाढले. महाराष्ट्राने देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली. महाराष्ट्रास औद्योगिक राज्य म्हणून ख्याती मिळाली. इतर राज्ये महाराष्ट्रापासून आदर्श घेऊन आपली प्रगती साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात दिशा देणाऱ्या महाराष्ट्राने देशाला औद्योगिक दिशा देण्याचेही कार्य केले ही अत्यंत गौरवाची बाब आहे.

महामंडळाच्या ५० वर्षांच्या वाटचालीकडे पाहताना राज्याच्या आर्थिक व सामाजिक योगदानाची दखल घ्यावीच लागते. हे महामंडळ स्थापन होताना २७ नोव्हेंबर १९६१ रोजी विधिमंडळात यशवंतराव चव्हाण यांनी आशावाद व्यक्त केला होता, ''मुंबई शहराचाच नव्हे, तर ह्या राज्याचा औद्योगिक विकास करण्यासाठी आपण ही एक नवीन साधनशक्ती तयार करीत आहोत. मला वाटते की, सर्व विचारवंतांचा याला पाठिंबा मिळेल आणि त्यामुळे नवीन निर्माण झालेल्या महाराष्ट्रामध्ये विकासाच्या दृष्टीने हे एक नवीन साधन बनेल.'' महामंडळाने आपल्या कार्याने हा आशावाद सुवर्णमहोत्सवी वर्षात सार्थ करून दाखवला आहे.

❐ ❐





● अभय मोकाशी

# आर्थिक समृद्धी आणि औद्योगिक विकास

महाराष्ट्राची आर्थिक वाटचाल झपाट्याने चालली असून त्यात औद्योगिक क्षेत्राचा मोठा वाटा आहे. भारताच्या औद्योगिक उत्पादनाचा १/५ भाग महाराष्ट्रातून येतो. रोजगार निर्मितीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे आणि देशाच्या राजकोषीय आयचा चाळीसावा हिस्सा महाराष्ट्रातून येतो. देशातील एकूण रोजगारापैकी १५.३ टक्के रोजगार महाराष्ट्राने निर्माण केला आहे. राज्याचा २०१०-११ या वर्षात वार्षिक सरासरी वाढ ११.३ टक्के होती, तर औद्योगिक वाढ ९.१ टक्के आणि सेवा क्षेत्रात १०.९ टक्के होती.

**राज्याचे स्थूल देशांतर्गत उत्पादन १४.२३ टक्के आहे, तर दरडोई उत्पन्न रु. ८३,४७१ आहे. भारताच्या एकूण निर्यातीच्या २७ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे.**

राज्यातून मुख्यतः रत्ने व आभूषणे, औषधे व औषधी द्रव्ये, प्लॅस्टिक व प्लॅस्टिकच्या वस्तू, सुती धागे, वस्त्र, तयार कापडे, सॉफ्टवेअर आणि यांत्रिकी उपकरणे इत्यादींची निर्यात होते.

थेट विदेशी गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र इतर राज्यांच्या पुढे आहे आणि याचे कारण राज्यात उद्योगांसाठी चांगले वातावरण आहे असे म्हटले पाहिजे.

### महाराष्ट्राची आघाडी

'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२'च्या आकड्यांनुसार ऑगस्ट १९९१ ते सप्टेंबर २०१० या कालावधीत राज्यात ४,२२१ प्रकल्प आले, जे त्या काळात देशात आलेल्या प्रकल्पांच्या २०.७ टक्के होते, तसेच या प्रकल्पांमध्ये एकूण थेट विदेशी गुंतवणूक रु. ८४,९५८ कोटींची झाली, जी देशातील त्या काळातील एकंदर झालेल्या गुंतवणुकीच्या २२.४ टक्के होती. राज्याच्या औद्योगिक क्षेत्रात थेट गुंतवणूक करणाऱ्या देशांत प्रामुख्याने अमेरिका आणि मॉरिशस आहेत. माध्यमांतून अनेकदा इतर राज्यांच्या औद्योगिकीकरणाचा गवगवा केला जातो आणि महाराष्ट्राच्या उपलब्धींबद्दल मौन पाळले जाते असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. ज्या गुजरात राज्याचा उदोउदो केला जातो, त्या राज्यात याच काळात फक्त २,२१७ प्रकल्प आले जे देशात आलेल्या प्रकल्पांच्या केवळ ३.५ टक्के होते आणि यात गुंतवणूक रु. २३,३९८ कोटींची होती.

थेट विदेशी गुंतवणुकदारांचा कल प्रामुख्याने माहिती तंत्रज्ञान आणि वित्तिय सेवांकडे दिसून येतो. या कालावधीत महिती तंत्रज्ञानात रु. १२,७६५ कोटींच्या थेट विदेशी गुंतवणुकीचे ७६२ प्रस्ताव राज्यात आले, तर रु. ११,८५८ कोटींचे ६६७ प्रकल्प वित्तिय सेवा क्षेत्रात आले.









औद्योगिक क्षेत्राचा विकास होण्याच्या दृष्टीने राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाने राज्यात अनेक विभागांत औद्योगिक वसाहती विकसित केल्या; ज्यात रस्ते, पाणी, वीजपुरवठा तसेच उद्योजकांसाठी इतर अंतर्गत सेवा यांसारख्या अत्यावश्यक पायाभूत सोयी उपलब्ध करून दिल्या. राज्यात अशा प्रकारे विकसित केलेल्या भूखंडापैकी ९१ टक्के भूखंड उद्योजकांना वितरित करण्यात आले. या मंडळाने २०११-२०१२ या कालावधीत रु. ६३३.३४ कोटींची उलाढाल केली.

राज्यात एकूण ३५,६९१ घटक महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात उभारले गेले, ज्याची एकूण गुंतवणूक रु. ६०,९३१ कोटी झाली असून ९.०१ लाख रोजगार निर्माण झाले.

केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने केलेल्या २००९-१०च्या अंदाजित पाहणीनुसार, महाराष्ट्रातील उद्योगांची संख्या ही देशाच्या उद्योग संख्येच्या १२.३ टक्के होती, स्थिर भांडवल देशाच्या १४.६ टक्के, खेळते भांडवल १६.४ टक्के, निव्वळ मूल्यवृद्धी २०.२ टक्के, रोजगार निर्मिती ११.६ टक्के, तर नफा २१.२ टक्के होता.

ऑगस्ट १९९१ ते ऑक्टोबर २०११ या कालावधीत गुजरातने रु. १०,०३,३४७ कोटींची गुंतवणूक मिळवून महाराष्ट्रावर बाजी मारली; पण, त्या राज्यात या काळात फक्त १०,३२८ प्रकल्प आले

**'प्रोजेक्ट्स टुडे'च्या ४६ व्या प्रकल्पाच्या गुंतवणुकीच्या सर्वेक्षणानुसार, ३१ मार्च २०१२ ला महाराष्ट्रात ८,४३७ प्रकल्प होते. त्यात झालेली गुंतवणूक रु. ६,८८,८०९ कोटींची होती; मात्र राज्याच्या आर्थिक पाहणीनुसार राज्यात रु. ८,७४,०५३ कोटींच्या गुंतवणुकीचे १७,२०७ प्रस्ताव आणणे सुलभ झाल्याचे दिसून येते. भारतात ऑगस्ट १९९१ ते ऑक्टोबर २०११ या कालावधीतील एकूण मंजूर गुंतवणुकीच्या ९.४ टक्के ही गुंतवणूक आहे. या प्रस्तावांपैकी ४० टक्के प्रस्ताव महाराष्ट्राची आर्थिक पाहणी झाली तोपर्यंत पूर्ण झाले होते.**

**महाराष्ट्रात औद्योगिकीकरणास पोषक वातावरण आहे आणि येथे कायदा आणि सुव्यवस्था चांगली असल्यामुळे अनेक औद्योगिक समूहांना महाराष्ट्रात गुंतवणूक करणे सोईस्कर वाटते. अलीकडे एका औद्योगिक समूहाने नांदेडमध्ये रु. १५०० कोटींचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याची घोषणा केली; मुख्यमंत्री अथवा उपमुख्यमंत्र्यांच्या गैरहजेरीत ही घोषणा केली यावरून उद्योजकांचा राज्यावर असलेला विश्वास दिसून येतो.**

आणि एवढी गुंतवणूक होऊनदेखील फक्त १९,८०,००० रोजगार निर्माण झाले, तर त्याच काळात महाराट्रात ४१ लाख रोजगार निर्माण झाले, याचे कारण महाराष्ट्राने प्रकल्प मिळविताना रोजगार निर्मितीवरही जोर दिला.

राज्यामध्ये ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत एकूण १,६२,९७३ सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम होते, तर ४,९१५ मोठे उपक्रम होते. या सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमात १३.९९ लाख रोजगार निर्माण झाले, तर मोठ्या उपक्रमात ११.२५ लाख रोजगार निर्माण झाले.

महाराष्ट्राने औद्योगिक विकासासाठी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सिकॉम, महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ यासारख्या वित्तीय संस्थांद्वारे उद्योगांना वित्तीय साहाय्य पुरविले जाते.

**विशेष आर्थिक क्षेत्र**

राज्याने २००६ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र धोरण स्वीकारले आणि ३० नोव्हेंबर, २०११ पर्यंत विशेष आर्थिक क्षेत्रात उद्योग उभारण्याचे एकूण २३३ प्रस्ताव आले होते आणि त्यापैकी ११६ प्रस्तावांना केंद्र सरकारकडून मान्यता प्राप्त झाली. यातील ६३ प्रस्तावांबाबत अधिसूचना काढण्यात आली आहे. देशात कार्यरत असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांत महाराष्ट्राचा चौथा क्रमांक लागतो.

गेल्या वर्षाअखेरपर्यंत राज्यात २४ विशेष आर्थिक क्षेत्रांतील एकूण रु. १७,८३० कोटींच्या गुंतवणुकीचे १५९ घटक कार्यरत होते, ज्यामुळे ८६ हजार रोजगार उपलब्ध झाले.

महाराष्ट्राने माहिती तंत्रज्ञानाच्या विकासासाठी देखील पावले उचलली आहेत. राज्यात रु. २,१०७ कोटींची गुंतवणूक होऊन १०७ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले कार्यरत आहेत. त्याद्वारे २.३ लाख रोजगार निर्माण झाले आहेत. याशिवाय ३४४ इतर माहिती तंत्रज्ञान संकुलांना इरादापत्रे दिली असून त्यात रु. ६,३४५ कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे आणि यात ८.६ लाख रोजगार निर्माण होऊ शकतो. मुंबईमध्ये १७१ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले आहेत, तर पुण्यात १६१ आणि ठाण्यात १०९ आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व सिडकोने देखील ३७ माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली आहेत.

**जैव तंत्रज्ञान धोरण**

आपल्या राज्याची प्रगती चालूच राहावी या हेतूने राज्य शासनाने २००१ मध्ये जैव तंत्रज्ञान धोरण जाहीर केले. या धोरणानुसार राज्यात एकूण रुपये ६,१७१ कोटींची गुंतवणूक असलेले १६ जैव तंत्रज्ञान संकुले उभारण्यात येणार आहेत, ज्यात १.३७ लाख रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. राज्यात जालना आणि हिंजेवाडी येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात सार्वजनिक क्षेत्रातील जैव तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली आहेत. दोन्ही ठिकाणी मिळून एकूण रु. ३०० कोटींची गुंतवणूक असलेली चार खाजगी जैव तंत्रज्ञान संकुले विकसित केली जात आहेत. याव्यतिरिक्त महाराष्ट्रात आठ सार्वजनिक क्षेत्रातील जैव तंत्रज्ञानाची विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित आहेत, ज्यात अंदाजे रु. ४,००९ कोटींची गुंतवणूक व ९३,००० रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे. यात सूक्ष्म, लघू व मध्यम ४७ असतील, ज्यापैकी चौदांना इरादा पत्रे दिली आहेत; तसेच १६ मोठे जैव तंत्रज्ञान प्रकल्प येणार आहेत, ज्यापैकी सात प्रकल्पांना इरादा पत्रे देण्यात आली आहेत.

**सहकारी औद्योगिक वसाहती**


रोजगार निर्मिती करीत असताना औद्योगिकीकरणावर जोर देऊन राज्य शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राव्यतिरिक्त औद्योगिक वसाहती सहकारी तत्त्वावर विकसित करण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत उद्योग स्थापित करण्यासाठी भाग भांडवलातील हिस्सा व तांत्रिक सल्ला यासारख्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी राज्य शासन प्रकल्प एकूण खर्चाच्या २० टक्के रक्कम भांडवल देते व उर्वरित ८० टक्के रकमेपैकी ६० टक्के रकमेची हमी वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जासंबंधी राज्य शासन देते. अशा सहकारी औद्योगिक वसाहतीत उद्योग स्थापन करणाऱ्या सभासदांना उर्वरित २० टक्के रक्कम भागभांडवल म्हणून जमा करावी लागते.

नोव्हेंबर २०११ अखेरपर्यंत मंजूर झालेल्या १४२ सहकारी औद्योगिक वसाहतींपैकी १०१ वसाहती कार्यरत आहेत, तर ३४ कार्यान्वित व्हावयाच्या आहेत; उर्वरित सात अवसायनात गेल्या आहेत.

राज्य शासनाने ९२ सहकारी औद्योगिक वसाहतींना अर्थसाह्य पुरविले आहे. या सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये राज्य शासनाचा रुपये १५.४९ कोटींचा वाटा आहे. एकूण बांधण्यात आलेल्या ७,५५० घटकांपैकी ७,२२२ घटक कार्यरत आहेत आणि त्यात १.३७ लाख रोजगार निर्माण झाले आहेत. पुणे विभागात सर्वांत जास्त, म्हणजे ४५ सहकारी औद्योगिक वसाहती, तर नाशिक विभागात ३३ आणि औरंगाबाद विभागात २६ सहकारी औद्योगिक वसाहती आहेत.

**सेवा क्षेत्रातही मोठी प्रगती**

औद्योगिक क्षेत्राबरोबरच राज्याने सेवा क्षेत्रातही मोठी प्रगती केली आहे. **(पान २२ वर)**



राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्ट्यातील उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरिता व राज्यातील औद्योगिकदृष्ट्या विकसनशील व मागास भागात उद्योग आकर्षित होण्याकरिता राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत १९६४ पासून सामूहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येत आहे.

मोठ्या उद्योगांना विशिष्ट सवलती/प्रोत्साहने देऊन राज्यामध्ये औद्योगिक गुंतवणुकीचा ओघ वाढविणे आणि त्यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या भरीव संधी निर्माण करण्याकरिता सामूहिक प्रोत्साहन योजना, २००१ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यामध्ये विशाल प्रकल्पाची संकल्पना अंतर्भूत केली गेली. त्यानुसार विशाल प्रकल्पांना अधिक प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला.


१ नोव्हेंबर २००६ रोजी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण घोषित करण्यात आले. या धोरणाच्या अनुषंगाने नवीन 'सामूहिक प्रोत्साहन योजना, २००६'लाही मान्यता देण्यात आली. या सुधारित योजनेतही विशाल प्रकल्पाची संकल्पना समाविष्ट होती.

या धोरणांतर्गत खाजगी/ संयुक्त/राज्य व केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम/ कंपन्या विशाल प्रकल्पासाठी असलेल्या प्रोत्साहनाचा लाभ घेऊ शकतात.

### विशाल प्रकल्पांची फलनिष्पत्ती

राज्यातील मुख्य उद्योगांमध्ये रासायनिक आणि तत्सम उत्पादने, विद्युत आणि बिगर विद्युत यंत्रसामग्री, वस्त्रोद्योग, पेट्रोलियम आणि तत्सम उत्पादने इत्यादी उद्योगांचा समावेश आहे. तसेच इतर महत्त्वाच्या उद्योगांमध्ये धातू उत्पादने, मद्य, जडजवाहिरे, औषध निर्माण, अभियांत्रिकी वस्तू, यांत्रिक अवजारे, स्टील आणि लोह कास्टींग आणि प्लास्टीक वस्तू इत्यादी उद्योगांचा समावेश आहे.

या उद्योगांकडून विशाल प्रकल्प धोरणास चांगला प्रतिसाद मिळाला असून राज्यातील, राज्याबाहेरील व विदेशी गुंतवणूक राज्यात आकर्षित करण्यास व त्याद्वारे रोजगार निर्मिती होण्यास मोठा हातभार लागला आहे. विशाल प्रकल्प धोरणांतर्गत देशी विदेशी गुंतवणूक देखील मोठ्या प्रमाणावर राज्यात आकर्षित झालेली आहे.




| अ.क्र. | विभाग | एकूण मंजूर प्रकल्प | प्रस्तावित गुंतवणूक (रुपये कोटीत) | अपेक्षित रोजगार |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | ४३ | ११,८२५३ | ४२,६६४ |
| २ | विदर्भ विभाग | १०६ | ६९,५६४ | ३०,७९३ |
| ३ | मराठवाडा विभाग | ५३ | १२,७४७ | ५,९७५ |
| ४ | उर्वरित महाराष्ट्र | १४१ | ७८,१०७ | १५,०४७६ |
| | एकूण | ३४३ | २७,८६७२ | ३१,९४५५ |

या धोरणांतर्गत मे. जनरल मोटर्स, वोक्स वॅगन, डेमलर क्रायसलर, सॅनी हेवी इंडस्ट्रीज, ब्रिज स्टोन, एल. जी. इलेक्ट्रॉनिक्स, मायको बॉश, बोईंग, इम्सोफर मॅन्युफॅक्चरींग, ह्युंडाई हेवी इंडस्ट्रीज, पियाजियो व्हेईकल्स, पोस्को लि. इत्यादी प्रतिष्ठित कंपन्यांची गुंतवणूक राज्यात आकर्षित झालेली आहे.

### विशाल प्रकल्प म्हणजे काय?

- नवीन व विस्तारीकरणाद्वारे सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत 'अ' व 'ब' वर्गीय तालुक्यांमध्ये ७५० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या किंवा १,५०० रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांना व 'क' वर्गीय तालुक्यांमध्ये ५०० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या किंवा १,००० रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांना आणि उर्वरित महाराष्ट्रात २५० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करणाऱ्या किंवा ५०० रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांना विशाल प्रकल्प म्हणून संबोधण्यात येते.
- सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ मध्ये नमूद केलेल्या गडचिरोली, यवतमाळ, जालना, नंदुरबार, वाशीम, धुळे, नांदेड, उस्मानाबाद, बुलढाणा व चंद्रपूर या सर्वांत कमी मानवी विकास निर्देशांक असलेल्या १० जिल्ह्यांत रु. १०० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करणाऱ्या किंवा २५० रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांना विशाल प्रकल्प म्हणून संबोधण्यात येते.

### प्रोत्साहन देण्याची पद्धती

राज्यात नव्याने अथवा विस्तारीकरणाद्वारे गुंतवणूक करणाऱ्या विशाल प्रकल्पांना शासनाने मंजूर केलेल्या प्रोत्साहनांच्या मर्यादेत किती व कोणत्या प्रमाणात प्रोत्साहन मंजूर करावे याबाबतचे अधिकार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीस देण्यात आले आहेत. या समितीत शासनाच्या महत्त्वाच्या विभागांच्या सचिवांचा समावेश आहे. अलीकडेच मंत्रिमंडळ उपसमितीने उच्चाधिकार समितीस केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम/ कंपन्यांचा समावेश व प्रोत्साहनाबाबत प्रकरणनिहाय निर्णय घेणे, विशाल प्रकल्पांना १००% मर्यादेपर्यंत ग्रॉस व्हॅटवर आधारित प्रोत्साहन देणे तसेच उद्योग घटकांनी केंद्रीय विक्री कराच्या भरणा केलेल्या संपूर्ण रकमेपर्यंत औद्योगिक विकास अनुदानासाठी पात्र धरण्याबाबतचे अधिकार प्रदान केले आहेत. विशाल प्रकल्पांना एकत्रित, अधिकची विशेष प्रोत्साहने / सवलती देण्याच्या प्रस्तावाबाबत प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे अधिकार मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाच्या

उद्योग विभागासाठीच्या उप समितीस देण्यात आले आहेत.

**विशाल प्रकल्पांना मिळणारी प्रोत्साहने**

### औद्योगिक विकास अनुदान

औद्योगिक विकास अनुदानाची रक्कम म्हणजे पात्र गुंतवणुकीच्या विहित टक्केवारी इतकी किंवा मंजूर कालावधीसाठी उद्योग घटकाने राज्य शासनास प्रत्यक्ष भरणा केलेल्या निव्वळ मूल्यवर्धित कर व केंद्रीय विक्रीकराची (खरेदीवर देण्यात आलेल्या परताव्याची रक्कम वजा जाता) जी कमी असेल ती रक्कम. औद्योगिक विकास अनुदानाची रक्कम परिगणित करताना त्यामधून मुद्रांक शुल्क माफी/सवलत, विद्युत शुल्क माफी, स्वामित्व धन परतावा या प्रोत्साहनापोटी दिलेल्या रकमा वजा करण्यात येणार नाहीत. स्व-वापराच्या वीजनिर्मितीसाठी आवश्यक गुंतवणुकीपैकी घटकासाठी वापरण्यात येणाऱ्या विजेच्या प्रमाणात केलेल्या गुंतवणुकीवर औद्योगिक विकास अनुदान देण्यात येते. वीज निर्मितीसाठी करण्यात येणारी गुंतवणूक वजा जाता घटकाने गुंतवणुकीचा निकष पूर्ण करणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण प्रकल्पांसाठी औद्योगिक विकास अनुदानाचे प्रमाण हे तालुक्याच्या वर्गीकरणानुसार पात्र गुंतवणुकीच्या ठरावीक टक्केवारीनुसार दिले जाते. माहिती तंत्रज्ञान/जैव तंत्रज्ञान/गारमेंट/पर्ल प्रोसेसिंग या घटकांना 'अ', 'ब' व 'क' वर्गीकृत तालुक्यात सर्वसाधारण प्रकल्पांपेक्षा १० टक्के जास्त अनुदान दिले जाते. औद्योगिक विकास अनुदान उपभोगण्याचा कालावधी हा गुंतवणुकीच्या प्रमाणाशी जोडण्यात आला आहे. गुंतवणूक करण्यासाठी कमाल कालावधी दि. १ एप्रिल २००७ पासून किंवा उच्चाधिकार समितीने मंजूर केलेल्या दिनांकापासून ५ वर्षे इतका आहे. रोजगार निर्मितीचा निकष हा वाणिज्यिक उत्पादन सुरू केल्यानंतर २ वर्षांच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे. उद्योग घटकाने गुंतवणुकीचा/रोजगार निर्मितीचा निकष पूर्ण केल्यानंतर औद्योगिक विकास अनुदान देय करण्यात येते.

### मुद्रांक शुल्क सवलत/माफी

'अ' व 'ब' वर्गीय तालुक्यासाठी प्रथम खरेदी खतावर ५० टक्के सवलत व इतर वर्गीकृत तालुके व विना उद्योग जिल्ह्यात १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी लागू आहे.

### विद्युत शुल्क माफी

'अ' व 'ब' वर्गीय तालुक्यात १० वर्षे व इतर वर्गीय तालुके व विनाउद्योग जिल्ह्यात १५ वर्षे विद्युत शुल्क माफीचा कालावधी आहे. विद्युत शुल्क माफीचा कालावधी औद्योगिक विकास अनुदान उपभोगण्याच्या कालावधीशी जोडण्यात आला आहे.

### राज्य कामगार विमा योजना व भविष्य निर्वाह निधी अंशदान परतावा

कमी मनुष्यबळ विकास निर्देशांक जिल्ह्यामध्ये स्थापन होणाऱ्या प्रकल्पांना वरील योजनांच्या अंशदानापोटी भरलेल्या रकमेच्या ७५ टक्के, मात्र स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या २५ टक्के या कमाल मर्यादेपर्यंत ५ वर्षांच्या कालावधीकरिता लागू आहे. घटकाने वरील योजनेच्या अंशदानाची रक्कम देय तारखेपर्यंत भरणा केल्यावरच तो पात्र राहील.

### स्वामित्व धन परतावा

विदर्भातील प्रकल्पांना ५ वर्षांकरिता लागू आहे.

**महाराष्ट्राने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करून तिचे कार्यान्वयन करण्यात कायम सातत्य राखले आहे. केवळ ५ वर्षांच्या कालावधीमध्ये राज्यात ३४३ विशाल प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पामध्ये एकूण प्रस्तावित गुंतवणूक रु. २.७८ लाख कोटी इतकी व ३.१९ लाख व्यक्तींना रोजगार अपेक्षित आहे. समतोल प्रादेशिक विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी एकूण विशाल प्रकल्पांपैकी ७६% प्रकल्प राज्याच्या मागास भागात स्थापन होतील.**

| अ.क्र. | उद्योगाचे ठिकाण | गुंतवणूक / रोजगार निर्मितीच्या पात्रतेचा निकष |
|---|---|---|
| १ | 'अ' व 'ब' वर्गीकृत तालुका | किमान गुंतवणूक- रु. ७५० कोटी<br>किंवा किमान रोजगार निर्मिती - १५०० |
| २ | 'क' वर्गीकृत तालुका | किमान गुंतवणूक रु. ५०० कोटी<br>किंवा किमान रोजगार निर्मिती - १००० |
| ३ | 'ड' व 'ड+' वर्गीकृत तालुका, विना उद्योग जिल्हा | किमान गुंतवणूक रु. २५० कोटी<br>किंवा किमान रोजगार निर्मिती - ५०० |
| ४ | कमी मानव विकास निर्देशांक जिल्हे | किमान गुंतवणूक रु. १०० कोटी<br>किंवा किमान रोजगार निर्मिती - २५० |



डॉ. दीपक शिकारपूर

# महा-सायबर-राष्ट्र

माझ्या दृष्टीने 'आयटी' या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट. तेलाचे साठे सापडल्याने मध्यपूर्व देशांचा विकास झाला. भारताचे खरे भांडवल आहे आपली युवा शक्ती, तीसुद्धा ग्रामीण भागातील.

तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातील अब्जावधी लोकांच्या जीवनामध्ये फार वेगाने बदल घडताना आपण पाहतो आणि अनुभवतो आहोत. ह्या सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानांमध्ये माहिती आणि संवादाचे तंत्रज्ञान (इन्फर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी ICT) सर्वांत आघाडीवर आहे. ह्यामुळे, पूर्वी असलेले, अंतराचे बंधन आता नाहीसे झाले आहे आणि आज सर्वांना सर्व प्रकारची माहिती मिळू शकते तसेच परस्परांशी गतिशील संवादही होऊ शकतो. अशा प्रकारे सर्व जग जोडले जाऊन 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे. आज ह्या संवादासाठी आपणास फक्त संगणकावरच अवलंबून राहावे लागत नाही. खरे तर, सेलफोन आजचा फि रता संगणक बनला असून, सेलफोनमार्फत आपण अनेक गोष्टी स्वस्तात सहजपणे आणि आपल्या पसंतीच्या ठिकाणाहून करू शकतो.

माझा पूर्ण विश्वास आहे की आगामी २० वर्षांत भारताला IT क्षेत्रात एक महत्त्वाची भूमिका पार पाडायची संधी मिळेल. जी क्रांती तेलाने मध्यपूर्व देशांसाठी केली तशीच क्रांती युवाशक्ती भारतासाठी करेल. OUTSOURCING हा प्रवास आगामी २० वर्षांत अजून जोमाने वाढेल. भारताची संगणक प्रणाली निर्यात सुमारे रुपये दोन लाख कोटी एवढी चालू आर्थिक वर्षात होईल. ही निर्यात देशाच्या पूर्ण निर्यातीच्या सुमारे ३०% आहे. २०२० पर्यंत हे प्रमाण ५०% नक्की होईल. शेतीनंतर माहिती हा रोजगार देणारा प्रमुख उद्योग असेल.

भारतात असलेल्या उच्च दर्जाच्या, विपुल आणि माफक किमतीतल्या सेवा आणि सॉफ्टवेअर प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता यामुळे जगभरातील सॉफ्टवेअर ग्राहक भारताकडे आकर्षिले जातात. KPO, OPM, अभियांत्रिकी सेवा, माहितीचे पृथक्करण, ह्याचबरोबर सॉफ्टवेअर प्रणाली निर्मितीत वाढ होत आहे. बहुराष्ट्रीय संगणक उद्योग भारतातील आऊटसोर्सिंग क्षेत्रातील तेजीचा फायदा घेण्यासाठी सरसावत आहेत. त्याचप्रमाणे अनेक कंपन्या त्यांचे सॉफ्टवेअर संशोधनाचे काम भारतीय उद्योगांना आऊटसोर्स करीत आहेत तर बाकीच्या त्यांचे अस्तित्व भारतात निर्माण करीत आहेत आणि सॉफ्टवेअर निर्यातीमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत.

बांधकाम, वाहतूक, retail, मनोरंजन, उपाहारगृहे, गुंतवणूक अशा अनेक उद्योगांचा अप्रत्यक्ष ग्राहक हा संगणक व्यावसायिक हेच आहेत. शेतीवर अवलंबून राहू नका हे अनेक तज्ज्ञ आपल्याला सांगतात. पण, कुठल्या क्षेत्रात समांतर रोजगार आहेत हे आपण सर्वांनी विचारपूर्वक शोधले पाहिजे. त्या दृष्टीने सेवा क्षेत्र हे त्यावर उत्तर असू शकते. त्यात संगणकाचा वाटा मोठा आहे. पण, संगणक साक्षरता ही सर्वांनी काळाची गरज म्हणून आत्मसात करायला हवी



### डिजिटल महाराष्ट्र

संपूर्ण भारताच्या IT & ITES विभागाच्या निर्यातीत महाराष्ट्राचा हिस्सा १८% आहे. जसजशी माहिती तंत्रज्ञान उद्योगाला प्रगल्भता येत आहे तसतशी राज्याला त्यांच्या उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी नवी आणि कल्पक दिशा सापडते आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकमधली दरी बरीच मोठी आहे. पुढच्या तीन वर्षांत कर्नाटकच्या पुढे जायला महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रांत प्रचंड प्रयत्न करावे लागतील.



**आठ वर्षांपूर्वी राज्य शासनाने माहिती तंत्रज्ञान धोरण आखले. यामुळे राज्यात पायाभूत सुविधा कमी किमतीत उपलब्ध करून देणे शक्य झाले. अधिकाधिक माहिती तंत्रज्ञान उद्योगांना महाराष्ट्राकडे आकर्षित करणे शक्य झाले. या दूरगामी निर्णयामुळे या क्षेत्रातली राज्याची निर्यात ९०% ने वाढली. राज्याने हे धोरण अतिशय काटेकोरपणे राबविले पाहिजे. स्थानिक संस्थांना याची गरज अजूनही लक्षात येत नाही, ती पटविली पाहिजे.**

**महाराष्ट्रात सॉफ्टवेअर निर्यात उद्योगात २४% वाढ झाली आहे. २०१२-१३ या वर्षात हा उद्योग २०% पेक्षा जास्त वाढण्याची शक्यता आहे.**

**आगामी १० वर्षांत संगणक व माहिती तंत्रज्ञान उद्योग महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचा रोजगार देणारा उद्योग म्हणून ओळखला जाईल.**

आय. टी. पॉलिसी या धोरणाचा भाग म्हणून २० ऑगस्ट हा 'माहिती तंत्रज्ञान दिवस' म्हणून घोषित केला आहे. या दिवशी या क्षेत्रात देदीप्यमान कारकीर्द असलेल्यांना पुरस्काराने सन्मानित केले जाते.

**महाराष्ट्राला सायबर राष्ट्र कसे बनवता येईल?**

**१. पूर्णवेळ माहिती तंत्रज्ञान मंत्री व माहिती तंत्रज्ञान संवर्धन शाखा नेमणे:** सध्या उद्योग खात्यामधील एक छोटा विभाग हे ह्या शाखेचे स्थान आहे. इतर अनेक राज्यांत ह्या शाखेला विशेष दर्जा दिला आहे व एक पूर्ण वेळ सचिव व राज्यमंत्री त्याकडे लक्ष देतो. ही शाखा राज्याला जागतिक स्तरावर पुरस्कृत करण्याकडे लक्ष केंद्रित करेल. तसेच माहिती तंत्रज्ञानाचा राज्यातील विकास पुरस्कृत करेल. ही शाखा आय.टी. आणि बी.पी.ओ.मध्ये पुढच्या पाच वर्षांत स्थानिक तरुणांसाठी एक लाख नोकऱ्याही निर्माण करू शकेल. जर आपण २०२० पर्यंत २ लक्ष कोटी रुपये हे लक्ष्य निश्चित केले तर हे शक्य आहे. ह्या शाखेने व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून त्यांचा विक्री विभाग विकसित देशात उघडला पाहिजे. त्याचप्रमाणे यशस्वीतेच्या गोष्टींची जाहिरात केली पाहिजे. जागतिक स्तरावरील पहिल्या १० माहिती तंत्रज्ञान व्यवसायांना महाराष्ट्राकडे आकृष्ट करण्यासाठी योजना आखल्या पाहिजेत. ह्यासाठी तज्ज्ञांचा एक विशेष गटही स्थापला पाहिजे.



**२. पायाभूत सुविधांकडे लक्ष देणे :** वीज, रस्ते, सार्वजनिक दळणवळणाची साधने, विमानतळ यासारख्या सुविधांनी राज्यातली सहा मुख्य शहरे (मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि कोल्हापूर) जोडणे. पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने अनेक गुंतवणूकदार सध्या बंगळुरूबद्दल साशंक आहेत. त्यांना आपल्याकडे आकृष्ट करण्याची संधी महाराष्ट्राला आहे. आपल्याकडेही जर या गोष्टींचा अभाव असेल तर आपण शेजारी राज्यांना (गुजरात, आंध्र प्रदेश इ.) ही संधी सहज उपलब्ध करून देत आहोत.

**३. मुंबई-पुणे प्रमाणेच नागपूर सांगली/कोल्हापूर औरंगाबाद, नाशिक ही शहरे संगणक प्रणाली केंद्रे म्हणून विकसित करणे:** विशेष क्षेत्रे (सेझ) हे फक्त ग्रामीण भागातच विकसित केली जावीत, शहरी भागातील झालेली (सूज आलेली) अनियंत्रित वाढ व गगनाला भिडणारे जमिनीचे दर हे चित्र लक्षात घेऊन अनेक आयटी/बीपीओ उद्योग द्वितीय स्तरावरील शहरांचा गांभीर्याने विचार करीत आहेत. आजूबाजूच्या ग्रामीण युवकांना ही सुवर्णसंधी ठरू शकते. स्थानिक युवकांना रोजगार द्यायचे धोरण क्षेत्र नक्कीच अवलंबेल. पण, हा आकर्षणाच्या मार्फत मिळणार नसून कौशल्याच्या जोरावर मिळणार आहे. बुद्धिमत्ता, आकलन शक्ती, व्यवहार ज्ञान, माणुसकी या कुठल्याही बाबतीत ग्रामीण युवा शक्ती कमी नाही. अनेक शहरी तरुण/तरुणींनी खरे तर या बाबी ग्रामीण मित्रांकडून शिकल्या पाहिजेत. ग्रामीण युवकांचे प्रश्न अगदी साधे आहेत. आत्मविश्वास, संभाषण कौशल्य, कार्यसंस्कृती, वेळ पाळणे व टापटीप या प्रमुख बाबींवर त्यांनी लक्ष दिले पाहिजे. हा कौशल्य विकास अनेक स्थानिक प्रश्न सोडवू शकेल.

४. उच्च तंत्रज्ञान शिक्षण पद्धती अंमलात आणली गेली पाहिजे. ज्यायोगे जागतिक आव्हानांना सामोरं जाण्यासाठी माहिती तंत्रज्ञान अवगत असलेले मनुष्यबळ निर्माण होईल. सध्याची तंत्रज्ञान शिक्षण पद्धती पूर्ण बदलण्याची गरज आहे. कौशल्य विकसित करणारी, प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजा पूर्ण करणारी शिक्षण पद्धती अंमलात आणली पाहिजे.

५. संगणक व माहिती तंत्रज्ञान उद्योगांशी निगडित वस्तूंवरील सेल्स टॅक्स, ऑक्ट्रॉय कमी करणे ज्यायोगे त्या वस्तू देशातील इतर राज्यांपेक्षा स्वस्त होतील.

**६. वेगवान ई शासन :** ई शासन म्हणजे माहिती तंत्रज्ञानाचा व्यापक पातळीवर वापर करून सरकारी कामकाज अधिक सोपे, पारदर्शक, कार्यक्षम आणि जबाबदार बनवणे. सर्व स्तरांवरील सरकारी कार्यालये आणि नागरिक तसेच व्यावसायिक ह्यांदरम्यान संवादासाठी माध्यम उपलब्ध करून देणे आणि नागरिकांना माहितीपर्यंत पोहोचण्याची सुविधा पुरवणे. विविध राज्यांमधून ई-शासनासंबंधीच्या अनेक योजना राबवल्या जात आहेत. प्रत्येक राज्य सरकारने आपापल्या गरजेनुसार आणि प्राधान्यक्रमानुसार योजना निवडल्या असल्या तरी कालांतराने सर्वच कारभार इलेक्ट्रॉनिक पद्धत वापरून केला जाईल हे उघड आहे. काही राज्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक जनता-दरबारदेखील यशस्वीपणे चालवला जात आहे. महाराष्ट्र राज्याने असा पण केला पाहिजे की सरकारी कामकाजात आधुनिक तंत्राचा वापर करण्यात आपण अग्रेसर असू. ह्याचा फार मोठा फायदा सर्वसामान्य नागरिकांना होईल. असे झाले तरच 'सायबर राष्ट्र' असल्याचा खरा लाभ आपण सर्व स्तरावर नेऊ शकू.

**संपर्क : ९८२२०४४५३३**

❒ ❒



# जैवतंत्राचे सामर्थ्य



● डॉ. दिप्ती देवबागकर

मानवी जनुक आराखड्याची एका दशकापूर्वी मिळालेली माहिती, रेण्वीय जीवशास्त्र (Molucular Biology) आणि जैव-माहितीशास्त्र (Bioinformatics) ह्यांच्या मदतीने जनुकाच्या (genes) कामकाजासंबंधी उलगडलेली गुपिते ह्यांचा हुशारीने आणि खुबीने केलेला वापर हा ह्या प्रगतीचा कणा आहे. जैवतंत्रज्ञानावर आधारित उद्योगांमध्ये कृषी, औषधीनिर्माण, रोगनिदान, रोगप्रतिबंधक उपाय, गुणकारक आणि उपयुक्त प्रथिने, जिवाणू (सूक्ष्मजीव), पर्यावरण आणि जैववैविध्य, नॅनोटेक्नॉलॉजी आणि स्टेम (मूळ) पेशी तंत्रज्ञान (stem cell technology), जैविक इंधन आणि आयुधे ह्यांचा समावेश होतो.

**देशामध्ये ज्या राज्यांनी जैवतंत्रज्ञानासंबंधी धोरण तयार करण्यात पुढाकार घेतला त्यामध्ये महाराष्ट्राचा समावेश आहे. २००१ साली बायोटेक्नॉलॉजी धोरण तयार करण्याबरोबरच बायोटेक पार्क निर्माण करण्याचा आराखडा तयार केला गेला. पुण्यामध्ये औषध निर्माण शास्त्राशी संबंधित बायोटेकपार्क आणि शेंद्रा आणि जालना येथे शेतीविषयक बायोटेकपार्क कार्यरत झाले. देशामध्ये ह्या क्षेत्रात होत असलेल्या एकूण उलाढालीच्या ३०-३५ टक्के वाटा महाराष्ट्रातील कंपन्यांचा आहे. त्यामध्ये हजार कोटींच्या वर उलाढाल होते. खास सुविधा असलेला (विशेष आर्थिक प्रभाग) निर्माण केल्यामुळे लाखांवर अधिक लोकांना नोकऱ्या आणि कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.**

जैवमाहितीशास्त्र, संगणकप्रणाली आणि माहितीशास्त्र ह्यांच्याबरोबर रासायनिक आणि जैवरासायनिक अभियांत्रिकी, रॉबोटीक्स अशा अनेक विषयांमधील तंत्रज्ञानाच्या मदतीने जैवतंत्रज्ञानातील उद्योगांना चालना मिळते आहे.

आपल्यासारख्या शेतीप्रधान देशामध्ये अनेक लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून असते. अन्नधान्य उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये जैवतंत्रज्ञानाच्या प्रभावी उपयोगाने उत्पादन क्षमता समर्थपणे वाढवता येऊ शकते. नवनवीन बी-बियाणांची निर्मिती संकरित जाती, कीटकांपासून बचाव करण्याची क्षमता असलेली बीटी-कपाशीसारखी झाडे, उतीसंवर्धनाच्या मदतीने जास्त उत्पन्न देणारी, कमी पाण्यामध्ये वाढणाऱ्या झाडांची लागवड, जैविक इंधनासाठी आवश्यक वनस्पतींची निर्मिती, विक्री ह्या क्षेत्रांमध्ये खूप संधी आहेत. माहिकोसारख्या कंपन्या ही आव्हाने समर्थपणे पेलून शेतीमध्ये एक क्रांतीच घडवत आहेत. मोन्साटो, नोव्हार्टीस सेमिनीस, अजित सीड्स ह्यांच्याबरोबर इतर छोट्या-मोठ्या कंपन्या ह्या क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. जनुक फेररचना केलेला बीटी कापूस आज सर्वत्र वापरात आहे. बीटी बियाणांच्या वापरामुळे उत्पन्नामध्ये मोठी वाढ झाली असली तरी जनुक बदल केलेले अन्न आणि खाद्यपदार्थ, वनस्पती बी-बियाणे ह्यावर बंदी घालण्यात आल्यामुळे (बीटी-वांगे) त्यांचा वापर होत नाही. त्यांच्या वापराला मोठ्या प्रमाणावर विरोध झाल्यामुळे काही कंपन्यांना आपली उद्दिष्टे आणि कार्यपद्धती बदलावी लागली. आपले हवामान तसेच जमिनीला पोषक आणि उपयोगी अशा पद्धती, त्यानुसार बी-बियाणे आणि संकरित जाती तयार करून त्यांची लागवड, प्रचार जैवतंत्रज्ञानाधारित उद्योगांसाठी महत्त्वाचा आहे. रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी त्यांना पर्याय म्हणून जैविक खते आणि जैविक कीटकनाशके वापरण्याच्या पद्धती प्रचलित करणे, त्यामध्ये नवे संशोधन, नव्या वाटा शोधणे ह्यांची आज गरज आहे. वनस्पतीपासून जैविक इंधनाची निर्मिती, उतीसंवर्धनाच्या मदतीने चांगला गुणधर्म असलेल्या झाडांची, वनस्पतींची लागवड करण्यासाठी नवीन तंत्रे चांगले आत्मसात करणे अशी अनेक आव्हाने आहेत.

**बायोटेक पार्क**

मराठवाड्यामध्ये वाळुंज औरंगाबाद येथे वोखार्ट कंपनीने २००४ साली बायोटेक पार्क स्थापन केले. या कंपनीमध्ये नवीन औषधे, लसी बनवण्याच्या कामामध्ये ७,५०० लोक (तंत्रज्ञान/शास्त्रज्ञ) काम करतात. १४ देशांमध्ये ही कंपनी काम करते. अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून उपयुक्त प्रथिने आणि रोगप्रतिबंधक लसी (Vaccines) बनवल्या जातात. पुण्यामध्ये 'सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (Serum Insitute of India) ही देशातील लसी बनवणारी अग्रगण्य संस्था आहे. GAVI, PATH, NIN, USFDA, Bill Gates Foundation अशा नावाजलेल्या जागतिक संस्थांबरोबर Serum Institute कार्य करते. युरोपमधील बीथोबेन बायोटेकने तर अमेरिकेतील 'मर्क' ह्या कंपन्यांशी सहकार्याचा करार करून अमेरिका आणि युरोपबरोबर जगातील इतर बाजारपेठांमध्ये आपला जम बसविण्यास सुरुवात केली आहे. आज सिरम ही कंपनी १४० देशांना लसी पुरवत असून जगामधील Vaccine institutes मध्ये पाचव्या क्रमांकावर आहे. १० कोटींहून अधिक डोस बनविणाऱ्या ह्या कंपनीचे स्वस्त आणि चांगल्या प्रतीचे लसीकरण हे आज जगामधील जवळजवळ ५०% मुलांना दिले जाते.

पुण्यामध्ये एमक्युअर (Emcure) फार्मा ह्या कंपनीने 'बायोटेक पार्क'मध्ये जिनोव्हा (Genova) ही जैवतंत्रज्ञानाशी निगडित कंपनी जवळजवळ एका दशकापूर्वी स्थापन केली. त्यांनी बनवलेली प्रथिने (Proteins) ( therapeutic proteius) आणि औषधे भारतामध्ये आणि परदेशातही पाठवली जातात. जनुकीय परिवर्तनाच्या (Genetic Manipulation) मदतीने ठरावीक रक्तपेशींच्या वाढीस उपयुक्त ठरणाऱ्या औषध निर्मितीचे काम जिनोव्हा कंपनी करीत असते. आज 'रोश' (Roche) सारख्या अनेक कंपन्या कर्करोगावरील नवीन औषधांवर संशोधन करून त्यांची विक्री करीत असतात. लुपीन (Lupin), ॲडमिन्स (Admins), निकोलस पिरामल (Nocholas piramal), सिपला (Cipla) ह्यांचे जैवतंत्रज्ञानावर आधारित औषधांचे संशोधन आणि उत्पादन सुरू आहे. यशराज आणि इतर कंपन्या रोगनिदानासाठी काम करीत असतात. रिलायन्स लाइफ सायन्स (Reliance Life Science) रोगनिदान, पेशींची जपणूक आणि वाढ ह्या अनुषंगाने संशोधन आणि विकास करीत आहे. पुण्यामध्ये वेंकटेश्वरा हॅचरीज (Venkateshwar

Hatcheries) कुक्कुटपालन (Poultry) मधील लशींचे (Vaccine) उत्पादन आणि विक्री करीत असते. ह्या व्यवसायामध्ये 'प्राज' ही कंपनी फर्मेंटेशन (Fermentation) आणि जैविक इंधने ह्यासंबंधी काम करीत आहे.

### क्लिनिकल रिसर्च आणि ट्रायल्स

क्लिनिकल रिसर्च आणि ट्रायल्स (Clinical Reasearch and Trials) मध्ये मुंबईमध्ये अनेक कंपन्या परदेशातील कंपन्यांबरोबर काम करतात. ह्यामध्ये Quinfiles ही कंपनी प्रथम क्रमांकावर आहे. निरनिराळी औषधे, रोगप्रतिबंधक प्रथिने, कर्करोगावरील औषधे ह्यांचे रुग्णावर होणारे परिणाम तपासण्याचे महत्त्वाचे काम ह्या औषधांचा प्रमाणित आणि सूत्रबद्ध वापर करून केला जातो. औषधोपचारांच्या प्रमाणीकरणामध्ये Clinical Research चे महत्त्वाचे स्थान आहे. पुण्यामध्ये NCL Innovation पार्क ही संस्था राज्य सरकार आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (CII) च्या मदतीने ह्या विषयावरील उद्योगधंद्याची, संस्थांची माहिती संकलन करीत आहे.

### नियोजनाची गरज

आज जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये उद्योगधंद्यामध्ये असणाऱ्या संधी ह्या विषयाचा आवाका आणि त्याची व्याप्ती ह्यावर नजर टाकल्यास महाराष्ट्रामध्ये ह्या क्षेत्रामध्ये उभे राहिलेले उद्योगव्यवसाय ही नुसती सुरुवात आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. भविष्यामध्ये मागणी वाढेल अशी औषध, लसी, जीवाणू, प्रथिने, ह्यांची निर्मिती करून भारतातच नव्हे, तर जगभरातील बाजरपेठा काबीज करण्याचा प्रयत्न अतिशय नियोजनपूर्वक करायला हवा आहे. ह्यासाठी अद्ययावत साधनसामग्री, सुविधा, कुशल कामगार आणि तंत्रज्ञ, जागतिक पातळीवर काम करून उद्याची आव्हाने समर्थपणे पेलणारे मनुष्यबळ ह्यांची आवश्यकता आहे.

ह्या सर्व उद्योगांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ ही अत्यंत महत्त्वाची गरज असल्यामुळे त्यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक ठरेल. आज पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नांदेड, कोल्हापूर येथे असणाऱ्या विद्यापीठांमध्ये आणि अभिमत संस्थांमध्ये अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भारत सरकारच्या 'जैवतंत्रज्ञान' विभागाने जैवतंत्रज्ञान आणि जैवमाहितीशास्त्र ह्या विषयांचे अद्ययावत प्रशिक्षण देण्यासाठी देशामध्ये संस्थांचे, विद्यापीठातील विभागांचे जाळे निर्माण केले आहे.

पुणे विद्यापीठामध्ये १९८५ साली जैवतंत्रज्ञान विभाग आणि १९८७ साली जैवमाहितीशास्त्र केंद्र प्राणीशास्त्र विभागामध्ये सुरू करण्यात आले. देशातील सर्वप्रथम हे अभ्यासक्रम सुरू करणाऱ्या विद्यापीठांमध्ये पुणे विद्यापीठाचा समावेश होता. आज हजारो विद्यार्थी येथे अभ्यास करून आणि पदव्या मिळवून जगभरातील उद्योगामध्ये काम करत आहेत. पुण्यामध्ये इन्स्टिट्यूट ऑफ बायोइन्फॉरमॅटीक्स आणि बायोटेक्नॉलॉजी (Institute of Bilinformation and Biotechology- IBB) ही नावीन्यपूर्ण संस्था बारावीनंतर विद्यार्थ्यांना M.Sc. M.Tech, करण्याची संधी देते. पुणे विद्यापीठामध्ये जैवतंत्रज्ञान विभागाबरोबरच, जैवमाहितीशास्त्र केंद्र हे मनुष्यबळ विकासकामामध्ये उत्कृष्ट काम करीत आहे. M.Sc, B.Sc, M.Tech, PhD ह्याचबरोबर MBA (Biotechnology) विषयातील अभ्यासक्रमही पुणे विद्यापीठामध्ये राबवले जातात.


**जैवतंत्रज्ञानासाठी पूरक आणि अत्यावश्यक अशा जैवमाहिती शास्त्रामध्ये काम करणाऱ्या काही मोजक्याच संस्था आहेत. पर्टसिस्टंट (Prtsistant), टाटा कन्सल्टन्सी बायोइमेजिन ह्या आणि इतर संस्थांमध्ये ह्या विषयांवर काम करण्यासाठी आवश्यक अशी क्षमता, साधनसामग्री आणि मनुष्यबळ आहे. महाराष्ट्रामधील अनेक संशोधन संस्था जैवतंत्र ज्ञानातील निरनिराळ्या घटकांवर संशोधन करीत आहेत. नागपूरमध्ये निरी (NEERI), मुंबईमध्ये टीआयएफआर (TIFR), कर्करोग संशोधन संस्था (ACTREC), प्रजननासाठी संशोधन करणारी (NIRRH), भाभा अणू संशोधन संस्था (BARC) तर पुण्यामध्ये राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (NCL), विषाणू संशोधन संस्था (NIV), पेशी संशोधन संस्था अशा संस्थांमध्ये संशोधन आणि विकासाचे काम चालू आहे. अनेक संशोधक (Scientists), तंत्रज्ञ (Technical Staff) आणि विद्यार्थी जैवतंत्रज्ञानातील संशोधन करीत आहेत.**

मुंबईमध्ये भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT), विद्यापीठ रासायनिक तंत्रज्ञान संस्था (UICT) ह्याबरोबर महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी विज्ञान विषयाशी संबंधित आणि पूरक अध्यापन आणि संशोधन केले जाते. डी.वाय. पाटील (D.Y. Patil Institute ) भारती विद्यापीठ Bharti Vidyapeeth, राजीव गांधी संशोधन संस्था, विद्याप्रतिष्ठान स्कूल ऑफ बायोटेक्नॉलॉजी, VSBT बारामती, वसंतदादा साखर संस्था (VSI), शेतकी संशोधन संस्था अशा काही सरकारी आणि खासगी, अभिमत संस्थादेखील जैवतंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये अध्यापनाचे काम करतात.

### दुर्लक्षित विभाग

हे सर्व असले तरीदेखील मनुष्यबळ विकास हा त्यादृष्टीने दुर्लक्षितच राहिलेला विभाग आहे. उच्च प्रतीचे, जागतिक दर्जाचे अद्ययावत शिक्षण घेऊन ह्या विषयातील संशोधन, विकास, व्यापार करण्याची आव्हाने समर्थपणे पेलू शकणारा विद्यार्थी, तंत्रज्ञ संशोधक, मॅनेजर, अभियंते तयार करणे हे फार मोठे आव्हान असले तरी प्रशिक्षित अद्ययावत ज्ञान असलेला शिक्षकवर्ग, उच्च, प्रतीच्या साधनसुविधा, निष्णांत आणि पारंगत संशोधक आणि विद्यार्थी, विषयांच्या रचनेमध्ये मूलभूत आणि अद्ययावत ज्ञान देताना प्रात्यक्षिकांवर, प्रत्यक्ष अनुभवावर भर देणारे अभ्यासक्रम या सर्वांपासून दूरच राहतात.

ह्या अनुषंगाने तितकीच महत्त्वाची आणखी एक गोष्ट म्हणजे 'जैविक संपदाप्रणाली' बौद्धिक स्वामित्व संपदा प्रणाली, पेटंट लायसन्सिंग (Licencing), तंत्रज्ञानाचे सुलभ हस्तांतरण (Technology Transfer) ह्याविषयी जागरूकता निर्माण करण्याची अतिशय आवश्यकता आहे. यासाठी इन्क्युबेशन (Incubation) आणि फॅसिलिटेशन (Facilitation) केंद्राबरोबरच जैवतंत्रज्ञान आणि इतर विषयातही 'ज्ञान केंद्रे' (Knowledge Centers) हवी आहेत. बुद्धीमापन संशोधन आणि तंत्रज्ञान आपली स्वत:ची बौद्धिक संपदा निर्माण करून तिचे जतन, स्वामित्व उद्योगधंद्यामध्ये वापर ह्या कार्यपद्धतीची माहिती देऊन समर्थ (Enpower)पणे काम करायला उद्युक्त करणे गरजेचे आहे. उद्योजक आणि सरकार (Public Private Partnership) यांच्या संयुक्त विद्यमाने काम, उद्योगधंद्यासाठी आर्थिक पाठबळ, योग्य त्या परवानग्या आणि उद्योग सुरू होण्यासाठी आवश्यक ती सहज सुलभ आणि सुकर व्यवस्थाही निर्माण करावी लागेल. जैव तंत्रज्ञान आणि जैवमाहिती **(पान २६ वर)**



एस. एल. श्रीखंडे

# उद्यमात् सकल समृद्धी

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बदलत्या कालानुरूप झालेले औद्योगिक बदल तसेच खुल्या आर्थिक धोरणाचे आव्हान पेलण्याकरिता वेगवेगळ्या झोनची निर्मिती केली. यामध्ये आयटी पार्क, बायोटेक पार्क, टेक्सटाईल पार्क, बी.टी. पार्क, फ्लोरीकल्चरल पार्क, सिल्व्हर पार्क, इलेक्ट्रॉनिक झोन, सेझ (विशेष आर्थिक क्षेत्र) यांचा समावेश आहे. विशिष्ट उद्योजकांना झोनवाईज लागणाऱ्या आवश्यक मूलभूत सेवासुविधा पुरवून सक्षमपणे त्या विभागातील उद्योग सुरू आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात झाली तसेच उच्चशिक्षित तरुणांना इतर राज्यात जाऊन रोजगार/उद्योगासाठी जाण्याची आवश्यकता भासली नाही. त्यांना महाराष्ट्रातच उद्योगाच्या / रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत. महामंडळाच्या सोयीसुविधांमुळे व उद्योगासाठी असलेल्या पोषक वातावरणामुळे परदेशातील/परराज्यातील उद्योजकांनी महाराष्ट्रात येऊन उद्योग स्थापन केले आहेत. तसेच नव्याने उद्योग उभारणीकरिता येत आहेत.

महाराष्ट्राचा समतोल विकास व्हावा म्हणून शासनाने वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उपक्रम राबविण्याचे ठरवून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांची निर्मिती केली. महामंडळांची स्थापना झाल्यानंतर प्रथम फक्त महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये औद्योगिक क्षेत्र स्थापन करून त्या ठिकाणी मूलभूत सुविधा जसे रस्ते, वीज, पाणी इत्यादी महामंडळांमार्फत पुरवून गरजू उद्योजकांना भूखंडाचे वाटप करून त्या ठिकाणी उद्योग उभारण्यात आले.

महाराष्ट्राचा औद्योगिक विकास होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी कायद्यामध्ये सुधारणा केली आणि उद्योजकांसाठी औद्योगिक क्षेत्रानुसार अ, ब, क, ड, ड+ असे गट पाडून विभागनिहाय सवलतीचे दर ठेवले. त्यामुळे मागास भागातसुद्धा उद्योग उभारणीकरिता उद्योजकांनी स्वारस्य दाखविले. विभागनिहाय अनुदान (सबसिडी) दिल्यामुळे औद्योगिक विकासासाठी पोषक वातावरण निर्माण झाले. त्यानंतर हळूहळू महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये औद्योगिक क्षेत्र स्थापन केले गेले. त्या ठिकाणी आवश्यक सुविधा पुरवून, उद्योगासाठी भूखंड वाटप करण्यात येऊन त्या ठिकाणी उद्योग उभारण्यात आले. मुंबई, नागपूर, कोल्हापूर व इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्रांतील कारखान्यांमुळे निर्माण झालेल्या रोजगार निर्मितीमुळे पायाभूत आणि नागरी सुविधांवर ताण पडला. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने १९९४ साली महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांत लघू औद्योगिक क्षेत्र विकास केंद्र व औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याचे घोषित केले.

या घोषणेनंतर आजमितीस जवळपास २३६ औद्योगिक क्षेत्रे कार्यरत करण्यात आली आणि २७८ औद्योगिक क्षेत्रे अधिसूचित केलेली आहेत. महामंडळाच्या ताब्यात असलेले क्षेत्र उद्योजकांना वाटप करण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग चालू आहेत. याचबरोबर महामंडळाने औद्योगिक क्षेत्रासाठी अनेक पाणीपुरवठा योजना तयार केल्या आहेत. महामंडळ एवढ्यावरच थांबलेले नसून पाणीपुरवठा योजनेसाठी 'बारवी'सारखे धरण बांधून त्या ठिकाणाहून औद्योगिक क्षेत्रांना व नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली या ठिकाणी पाणीपुरवठा केला जातो. सर्व औद्योगिक क्षेत्र मिळून महामंडळाने हजारो किलोमीटर रस्त्याचे दर्जेदार बांधकाम करून उद्योजकांच्या सोईसाठी रस्ते उपलब्ध करून दिले आहेत.

### उद्योजकांना सोयी सवलती

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी औद्योगिक भूखंड वाटप करण्यात येतात. त्याचप्रमाणे लोकांच्या गरजेसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधेकरिता जसे हॉटेल, लॉजिंग, सर्व्हिसिंग सेंटर तसेच इतर ट्रेडिंग व्यवसायासाठी भूखंडाचे वाटप करण्यात येते. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना व उद्योजकांना राहण्यासाठी निवासी झोन तयार करून भूखंडाचे वाटप करण्यात येते तसेच महामंडळाने रासायनिक औद्योगिक क्षेत्रे ज्या ठिकाणी उभारली आहेत त्या ठिकाणी उद्योजकांच्या सहकार्याने सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सीईटीपी) घनकचरा प्रक्रिया केंद्र बांधून उद्योजकांना सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यावरण समतोल राखण्यास हातभार लागला आहे.



महामंडळाने सामाजिक बांधिलकी म्हणून विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रात होणारे प्रदूषण टाळण्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवडीसाठी क्षेत्र राखीव ठेवून त्यावर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केलेली आहे तसेच काही ठिकाणी भूखंडधारकांना वृक्ष

लागवडीसाठी जागा वाटप करण्यात आलेल्या आहेत. तसेच महामंडळाने तयार केलेल्या रस्त्याच्या बाजूने वृक्षारोपण करण्यात आलेले आहे.

**परिवर्तन**

**औद्योगिक विकास :** उद्योगासाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत उद्योगाची चांगल्या प्रकारे उभारणी झाली आहे.

**रोजगार निर्मिती :** महाराष्ट्रात सर्वत्र अनेक औद्योगिक क्षेत्रे निर्माण होऊन अकुशल, कुशल अभियंता, विविध आयटीआय संस्थेतील कोर्स केलेल्या बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे.

**आर्थिक विकास :** औद्योगिक महामंडळ स्थापन झाल्यामुळे अनेक तरुण उद्योजकांनी उद्योग स्थापन केल्यामुळे कुशल / अकुशल कामगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. त्यांच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल खरेदी करणे, पक्का माल बाजारपेठेमध्ये पाठविणे या सर्व प्रक्रियेमध्ये येणाऱ्या सर्व संस्था, व्यक्ती यांची आर्थिक प्रगती झालेली आहे. याबरोबर शासनाने निर्धारित केलेले सेवाशुल्क, कर व इतर सर्व आयात-निर्यात यांच्यापासून मिळणारे कर यामुळे महाराष्ट्राच्या, भारताच्या आर्थिक उन्नतीमध्ये वाढ झालेली आहे.

**राहणीमान :** महामंडळाची स्थापना होण्यापूर्वी लोकांचे राहणीमान अत्यंत साधे होते. नवनवीन कारखान्यांमधून निर्माण होणाऱ्या उत्पादनामुळे व आर्थिक विकासामुळे उत्तम दर्जाचे उत्पादन तयार झाल्यामुळे चांगले कपडे परिधान करणे शक्य झाले आहे. तसेच उत्तम प्रतीच्या भौतिक सेवासुविधा उपलब्ध झाल्यामुळे, आरोग्यविषयक जागरूकता आली. लोकांचे राहणीमान सुधारले.

**शैक्षणिक :** महामंडळाच्या स्थापनेनंतर निर्माण झालेली रोजगारनिर्मिती आणि नवीन तंत्रज्ञानयुक्त मशिनरी हाताळण्यासाठी लागणारे शिक्षण आवश्यक असल्यामुळे आयटीआय, अभियांत्रिकी महाविद्यालये, आयटीआय, महाविद्यालये, बायोटेक महाविद्यालये व तंत्रज्ञान देणाऱ्या विविध संस्था अस्तित्वात आल्या.

**सामाजिक :** मऔविमची स्थापना झाल्यानंतर समाजामध्ये अनेक बदल झाल्याचे आपणास दिसून येते. समाजातील प्रत्येक नागरिकाला चांगल्या प्रकारच्या सुविधा मिळत आहेत. सर्व नागरिकांना काम मिळाल्यामुळे त्यांची आर्थिक प्रगती झाल्याचे दिसत आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना आधुनिक शेती अवजारे मिळू लागली. त्यामुळे शेतीची मशागत वेळेत चांगल्या प्रकारे करणे शक्य झाले. तसेच पिकांसाठी लागणारी कीटकनाशक औषधी व रासायनिक खते मिळणे सहज व स्वस्त शक्य झाले. शेतीतील मालाचे उत्पादन वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानात, आर्थिक, शैक्षणिक बाबतीत सुधारणा झाली; त्यांचा सामाजिक स्तर सुधारल्याचे दिसत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व स्तरातील लोकांमध्ये सामाजिक बदल आढळून आल्याचे दिसत आहे. ❐❐

# आर्थिक समृद्धी आणि औद्योगिक विकास

**(पान १४ वरून)**

राज्य इंटरनेटच्या वापरामध्ये देशात आघाडीवर आहे. राज्याच्या २०१०-११ या वर्षाच्या आर्थिक पाहणीनुसार महाराष्ट्रामध्ये २५६ के.बी.पी.एस.पेक्षा कमी वेगाचे इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या १४.९३ लाख आणि ब्रॉडबॅण्ड (२५६ के.बी.पी.एस. किंवा त्यापेक्षा अधिक वेग) इन्टरनेट वापरणाऱ्यांची संख्या २२.८८ लाख होती. या पाहणीनुसार देशामध्ये मोबाइल नंबर दुसऱ्या कंपनीच्या सेवेमध्ये हस्तांतरित करण्याकरिता आलेल्या ३३.३६ लाख अर्जांपैकी १०.२३ लाख अर्ज फक्त मुंबईतून आले होते.

**पायाभूत सुविधांमध्ये वाढ**

गेल्या काही वर्षात राज्यातील पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात झाली आहे. राज्यात वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेत २०१०-११ या साली १०.३ टक्के वाढ झाली आहे. वीज निर्मितीच्या क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्राचा म्हणजेच महानिर्मितीचा ५४ टक्के वाटा, खाजगी क्षेत्राचा ३६ टक्के, तर सार्वजनिक खाजगी प्रकल्पांचा वाटा १० टक्के आहे. २०१०-११ या वर्षात ८३,०१७ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मिती झाली, जी त्या आधीच्या वर्षापेक्षा २.१ टक्के अधिक होती.




**सौरऊर्जेवर भर**

सौरऊर्जेवरही राज्य सरकार भर देत आहे. सौरऊर्जेच्या विकासास गती देण्यासाठी नवीन व अक्षय स्रोत, ज्याचा भविष्यातही वापर करता येईल याचा शोध सातत्याने चालू आहे.

राज्यात सातारा, बुलढाणा व सोलापूर या जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे कराड, शेगाव व पंढरपूर या ठिकाणी सौर संसाधन मूल्यांकन केंद्रे उभारण्यात आली आहेत.

महाराष्ट्रामध्ये रस्त्यांचे जाळे चांगलेच पसरलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील असलेल्या रस्त्यांची लांबी २.४१ लाख कि.मी. इतकी होती. पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत ७,९६१ लोक वस्त्यांना २३,२०६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांनी जोडण्यात आले. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बहुतांश प्रकल्प 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या तत्त्वावर हाती घेतले आहेत आणि याद्वारे प्रामुख्याने रस्ते व उड्डाणपूल प्रकल्प होत आहेत. आजवर महामंडळाने सुमारे रु. ७,१८७ कोटींची प्रकल्प पूर्ण केले आहेत, ज्यावर रु. ६,८२२ कोटी खर्च करण्यात आले.

मुंबईत मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर मुंबई मेट्रो रेलवेचा प्रकल्प हाती घेतला आहे. हे काम लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

एकंदरीत पाहता औद्योगिकीकरण आणि सेवा या क्षेत्रात महाराष्ट्राची वाटचाल गतीने चालली आहे.

**संपर्क : ९८६९०३१३३०** ❐❐

# प्रगती सुपरफास्ट

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी औद्योगिकीकरणाद्वारे देशाचा विकास करण्याचे स्वप्न पाहिले. पं. नेहरूंच्या या स्वप्नांना मूर्तरूप देण्याचे ध्येय महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी बाळगले आणि त्या दिशेने पावले उचलली. यशवंतरावांच्या या दूरदृष्टीचे फलित म्हणूनच आज महाराष्ट्र राज्य उद्योग क्षेत्रात देशात आघाडीवर आहे.

आर्थिक विकासामध्ये औद्योगिक क्षेत्राच्या भूमिकेचे महत्त्व जाणून भारत सरकारने १९९१ मध्ये उदारीकरणाचे धोरण अवलंबिले. ज्यामुळे औद्योगिक क्षेत्राची वाढ सुलभ होऊन त्यात संरचनात्मक बदल घडून आले. महाराष्ट्राचा विचार करता विपुल नैसर्गिक साधन संपत्ती, कुशल मनुष्यबळ आणि दर्जेदार शिक्षण सुविधा यांमुळे औद्योगिक क्षेत्र वृद्धिंगत होण्यास मदत झाली. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या आव्हानाच्या अनुषंगाने राज्याने स्वत:चे औद्योगिक धोरण तयार केले. त्यानुसार १९९३ मध्ये राज्याने पहिले औद्योगिक धोरण निश्चित केले ज्यामध्ये १९९५ व २००१ मध्ये सुधारणा केल्या गेल्या. नवीनतम औद्योगिक धोरण २००६ साली अगिकारले गेले.

### औद्योगिक विकास-ठळक वैशिष्ट्ये

**औद्योगिक गुंतवणूक :** औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र नेहमीच पहिल्या पसंतीचे राज्य राहिले आहे. पोषक वातावरणामुळे रु.८,७४,०५३ कोटी गुंतवणुकीचे १७,२०७ औद्योगिक प्रस्ताव आणणे सुलभ झाले. ज्यांची गुंतवणूक देशातील ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०११ या कालावधीतील एकूण मंजूर गुंतवणुकीच्या ९.४ टक्के आहे. यापैकी ४० टक्के प्रकल्प पूर्ण झाले असून ११ टक्के प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. या प्रकल्पांचा एकूण गुंतवणुकीत अनुक्रमे १७.८ टक्के व ७ टक्के वाटा आहे. तथापि, ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या (२००७-१२) पहिल्या चार वर्षांत राज्य रु.४,५०,४४८ कोटींची गुंतवणूक आणण्यात यशस्वी झाले असून ती भारतातील एकूण गुंतवणुकीच्या ८.५ टक्के होती.

**महाराष्ट्रातून निर्यात :** राज्यातून रत्ने व आभूषणे, सॉफ्टवेअर, वस्त्र, तयार कपडे, सुती धागे, धातू व धातू उत्पादने, शेतमालावर आधारित उत्पादने, अभियांत्रिकी उपकरणे, औषधे व औषधी द्रव्ये आणि प्लॅस्टिक व प्लॅस्टिकच्या वस्तू यांची निर्यात होते. राज्यातील निर्यात वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी व निर्यातदारांनी केलेल्या प्रयत्नांची जाणीव ठेवून 'सर्वोत्तम निर्यातदार पुरस्कार' देणे व परदेशांमध्ये मालाची प्रदर्शने आयोजित करणे याबाबतीत शासन पुढाकार घेत आहे. सन २००९-१० या वर्षी विविध देशांत १६ आंतरराष्ट्रीय प्रदर्शने आयोजित करण्यात आली होती.

**उद्योगांना वित्तीय साहाय्य :** सिकॉम लि., महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांसारख्या वित्तीय संस्था आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ, भारतीय साधारण विमा महामंडळ, आयएफसीआय लि., भारतीय लघुउद्योग विकास बँक यांसारख्या केंद्रस्तरीय वित्तीय संस्थांद्वारे राज्यातील उद्योगांना वित्तीय साहाय्य पुरविले जाते.


**विशेष आर्थिक क्षेत्रे :** राज्याने १० फेब्रुवारी २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) धोरण स्वीकारले आहे. राज्यात ३० नोव्हेंबर, २०११ पर्यंत एकूण २३३ विशेष आर्थिक क्षेत्राबाबत प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्राप्त प्रस्तावांपैकी ११६ प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मान्यता देण्यात आली आणि ६३ प्रस्ताव अधिसूचित झालेले आहेत.

**सहकारी औद्योगिक वसाहती :** रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे या मुख्य उद्देशाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्राव्यतिरिक्त औद्योगिक वसाहती सहकारी तत्त्वावर विकसित करण्याचा कार्यक्रम राज्य शासनाने हाती घेतला असून उद्योग स्थापित करण्यासाठी भाग भांडवलातील हिस्सा व तांत्रिक सल्ला यासारख्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी राज्य शासन एकूण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के इतके भांडवल देते व वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के रकमेची शासन हमी देते आणि उर्वरित २० टक्के रक्कम सहकारी औद्योगिक वसाहतीतील उद्योग स्थापन करणाऱ्या सभासदांना भाग भांडवल म्हणून जमा करावी लागते. नोव्हेंबर, २०११ अखेर एकूण १४२ सहकारी औद्योगिक वसाहती मंजूर झाल्या होत्या त्यापैकी १०१ वसाहती कार्यरत असून ३४ वसाहती अद्याप कार्यान्वित व्हावयाच्या आहेत आणि उर्वरित ७ अवसायनात गेल्या आहेत. यापैकी ९२ सहकारी वसाहतींना शासनाने अर्थसाहाय्य पुरविले आहे. नोव्हेंबर, २०११ अखेर एकूण ७,५५० घटक बांधण्यात आले असून ७,२२२ घटक कार्यरत आहेत. त्यामुळे १.३७ लाख रोजगार निर्मिती झाली. या सहकारी औद्योगिक वसाहतीच्या एकूण भागभांडवलामध्ये राज्य शासनाचा रु.१५.४९ कोटींचा वाटा आहे.

**खनिज संपत्ती :** राज्यात उत्पादनक्षम खनिज

> औद्योगिक धोरण २००६ पासून राज्याने अंगिकारले. त्यानुसार औद्योगिक क्षेत्रात १० टक्के वाढ, सेवा क्षेत्रात १२ टक्के वाढ व २०१० पर्यंत अतिरिक्त २० लाख इतकी रोजगार निर्मिती ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. ही उद्दिष्टे जवळपास साध्य झाली आहेत.







साठा असणारे क्षेत्र सुमारे ५८ हजार चौरस कि.मी. इतके असून ते विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि यवतमाळ, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे या जिल्ह्यांमध्ये विखुरलेले आहे. या विभागांत कोळसा, चुनखडी, कच्चे मँगेनीज, बॉक्साईट, कच्चे लोखंड, डोलोमाईट, लॅटराईट, कायनाईट, फ्लोराईट (ग्रेडेड), क्रोमाईट इत्यादी खनिजांचे साठे आढळून येतात. ३१ मार्च, २०११ पर्यंत राज्यात ०.६ लाख रोजगार असलेल्या प्रमुख खनिजांच्या २७७ खाणी कार्यरत आहेत. राज्यातील २०१०-११ मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य रु.८,७०३ कोटी होते. यापैकी उत्खनन केलेल्या कोळशाचे मूल्य रु.५,०८२ कोटी असून ते राज्यातील उत्खनन केलेल्या सर्व खनिजांच्या एकूण मूल्याच्या ५८ टक्के होते.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली आहे. महामंडळाने रस्ते, पाणी, वीजपुरवठा व उद्योजकांसाठी इतर अंतर्गत सेवा यासारख्या अत्यावश्यक पायाभूत सोयींनी युक्त अशा औद्योगिक वसाहती विकसित केल्या आहेत. मार्च २०११ अखेर विकसित भूखंडाच्या ८९ टक्के भूखंड उद्योजकांना वितरित करण्यात आले.

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ**

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ लघुउद्योग विकास करण्यासाठी उद्योजकांना मदत करते. लघुउद्योगांना कच्चा माल पुरविणे, मालाच्या विक्रीची व्यवस्था लावणे, गोदामांची व्यवस्था करणे, हस्तकला उद्योगास चालना देणे, माल निर्यातीस साहाय्य करणे हा या महामंडळाचा उद्देश आहे.

**महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ**

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे प्रमुख कार्य म्हणजे राज्यातील खादी आणि ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तार करणे हे आहे. राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना २०१०-११ मध्ये रु.३२.३५ कोटी वित्तीय साहाय्य अनुदानाच्या स्वरूपात देण्यात आले आणि २०११-१२ मध्ये रु.१९.१९ कोटी वाटप करणे प्रस्तावित आहे.

कारागीर रोजगार हमी योजनेअंतर्गत २०१०-११ मध्ये ५.० लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या ज्या मागील वर्षी ४.७ लाख होत्या. वर्ष २०११-१२ मध्ये ५.५ लाख कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**

औद्योगिक प्रदूषण ही पर्यावरणाच्या दृष्टीने एक प्रमुख चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ही प्रदूषणासंबंधी कायद्याची अंमलबजावणी करणारी प्रमुख संस्था आहे. मार्च, २०११ अखेरीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारीतील एकूण ७५,०८० कारखान्यांपैकी वायुप्रदूषण करणारे १७ टक्के, जलप्रदूषण करणारे १८ टक्के आणि धोकादायक टाकाऊ पदार्थ निर्माण करणारे सात टक्के कारखाने होते. प्रदूषण कमी करण्याच्या हेतूने मंडळाने २०१०-११ मध्ये जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ अंतर्गत कलम ३१अ खाली ३२१ कारखान्यांना निर्देश दिले आहेत. राज्यातील ८,००७ कारखान्यांचा समावेश असलेल्या २६ औद्योगिक वसाहतींत सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे कार्यान्वित करण्यात येत आहेत. ह्या प्रयत्नांव्यतिरिक्त काही कारखान्यांकडून बँक हमी घेण्यात आली असून प्रदूषण नियंत्रण उपाययोजना अंमलात आणण्यापर्यंत काही प्रदूषणकारी कारखान्यांचा विद्युत व जलपुरवठा खंडित करण्यात आला होता.

**औद्योगिक उत्पादन निर्देशांक**

औद्योगिक क्षेत्राची वाढ औद्योगिक उत्पादन निर्देशांकाद्वारे मोजली जाते. सध्याच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकामध्ये खनिकर्म, वस्तुनिर्माण व वीज या क्षेत्रांचा समावेश आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालय अखिल भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक संकलित करून जाहीर करते. एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१२ या कालावधीत अखिल भारतीय स्तरावरील निर्देशांक (पायाभूत वर्ष २००४-०५) गतवर्षीच्या तत्सम कालावधीतील १६२.५ वरून १६९.० इतका वाढला. या निर्देशांकानुसार एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१२ या कालावधीतील वाढ ४.० टक्के होती जी गतवर्षाच्या तत्सम कालावधीत ८.३ टक्के होती.

## माहिती तंत्रज्ञान संकुले

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मऔविम) व सिडकोने ३७ माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली आहेत. माहिती तंत्रज्ञान उद्योगात खाजगी क्षेत्रातील सहभागासाठी ४५१ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर झाले असून त्यापैकी १०७ कार्यरत झाली आहेत व त्यामधील गुंतवणूक रु.२,१०७ कोटी असून, त्यामधून २.३ लाख रोजगार निर्माण झाला आहे. खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले बृहन्मुंबई (१७१), या पाठोपाठ पुणे (१६१) व ठाणे (१०९) या जिल्ह्यांमध्ये केंद्रित (९८ टक्के) झाली.**

## जैव तंत्रज्ञान संकुले

**राज्य शासनाने २००१ मध्ये जैव तंत्रज्ञान धोरण जाहिर केले. राज्यात मऔविम परिसरात, जालना आणि हिंजेवाडी (पुणे) येथे सार्वजनिक क्षेत्रातील जैव तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली असून एकूण रु.३०० कोटी गुंतवणुकीची चार खाजगी जैव तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात येत आहेत. राज्यामध्ये आठ सार्वजनिक क्षेत्रातील जैव तंत्रज्ञानाची विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित असून त्यामध्ये अंदाजे रु.४,००९ कोटींची गुंतवणूक व ०.९३ लाख इतका रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.**

**(संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-२०११-१२)**

**संपर्क : ७३०३४२८५५५**

❐ ❐



# प्रयोग भूमी

**श्रीनिवास खांदेवाले**

औद्योगिक विकास आणि त्याला जोडलेली वित्त आणि बँकिंगची क्षेत्रे यांच्या बाबतीत महाराष्ट्राचे स्थान भारतीय अर्थव्यवस्थेत, वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे श्रेय मुंबईच्या अद्वितीय भौगोलिक स्थानावर अवलंबून आहे. मुंबई हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेले खोल पाण्याचे नैसर्गिक बंदर आहे. ब्रिटिशांच्या स्वाधीन हे बंदर पडल्यानंतर त्यातील छोटी बेटे एकत्र जोडून ते बंदर-शहर बनले व त्याचा आधुनिक विकास सुरू झाला. इंग्लंडशी जहाजांनी (भरपूर माल भरून) भारताचा व्यापार कमी खर्चात चालण्यासाठी पूर्व किनाऱ्यावरची बंदरे अधिक अंतराची, म्हणून खर्चीक होती. पश्चिम किनाऱ्यावर गुजरात ते केरळच्या मध्यावर असलेले मुंबई बंदर कमीत कमी खर्च येणारे केंद्र होते (व आहे.) कोलकात्याला जसा हुगळी नदीचा गाळ समुद्रात १०-१२ किलोमीटरपर्यंत असतो व नंतर मोठ्या जहाजांना सोईचे खोल पाणी सुरू होते, तसे मुंबईचे नाही. इथे कुठलीच मोठी नदी समुद्राला मिळत नाही. एकदम बंदराला लागून खोल समुद्र आहे. मोठी जहाजे एकदम बंदरापर्यंत येतात. त्यामुळे वाहतूक खर्च वाचून मालाची आवक-जावक बंदर शहरातूनच होते. हे नैसर्गिकरीत्या घडलेले असल्यामुळे बंदर हवे तसेच उपलब्ध होते. मग, माल चढउताराचे धक्के, माल साठविण्याची गोदामे, वीजपुरवठा, जहाज व व्यापार करणाऱ्या कंपन्यांची कार्यालये, आंतरराष्ट्रीय दर्जाची हॉटेल्स, व्यापार सहायक बँका व विमा कंपन्यांची कार्यालये या सर्वांच्या सुनियोजित इमारतींची क्षेत्रे निर्माण झाली. रेल्वे सुरू झाल्यावर, व्यापाराची गती वाढल्यावर, देशातील सगळी प्रमुख शहरे (माल व माणसे यांच्या वाहतुकीकरिता) मुंबईशी जोडली गेली, रस्ते व विमान मार्ग मुंबई आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांचे मुख्य केंद्र मानून मुंबईशी जोडले गेले. पाठोपाठ शेअर बाजार स्थापन व विकसित झाला. इतकी सगळी कामे करण्यासाठी मजूर वर्ग लागतो. शेतीपेक्षा जास्त व वर्षभर पूर्ण मजुरीचे काम मिळते म्हणून देशभरचा कुशल व अकुशल मजूर वर्ग मुंबईकडे आकर्षित झाला. हे सगळे उत्पादन घटक उपलब्ध झाल्यामुळे मुंबईतच उत्पादन करून माल निर्यात करणे अधिक फायद्याचे म्हणून कारखाने मुंबईत निघू लागले व मुंबई औद्योगिक शहर बनले. कापूस विदर्भ, खान्देश, मराठवाडा, गुजरात, कर्नाटकात पिकतो; पण कापड गिरण्या मुंबईत स्थापन झाल्या. ते सर्व प्रकारच्या यंत्रांकरिता व उपभोग्य मालाकरिता सुरू झाले.

**महाराष्ट्रातील कारखाने व रोजगार**
**(विजेवर व विजेशिवाय चालणारे कारखाने समाविष्ट)**
(कारखाने संख्येत, रोजगार हजारात)

| सन | सर्व कारखाने | रोजगार |
|---|---|---|
| १९६१ | ८,२३३ | ७८७ |
| १९८१ | १६,५९४ | १,१९२ |
| २००१ | २८,३२४ | १,२०१ |
| २००८ | २,७१८ | १,३९२ |
| २०१० | ३४,८६५ | १,६५७ |

**स्रोत : महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण २०११-१२**

बंदर-शहराचे रूपांतर सर्वांत मोठ्या औद्योगिक वित्तीय बँकिंग केंद्रात झाले. उत्पादन देशभरात कोठेही करावयाचे असले तरी त्याचे वित्तीय, विमा, बँकिंग, निर्यात, भांडवल- उभारणी इत्यादी व्यवहार मुंबईत करणे फायद्याचे, सोईचे, वेळ वाचविणारे व कमी खर्चाचे असल्यामुळे देशभराच्या उत्पादन कंपन्यांची मुख्य कार्यालये मुंबईत असणे अनिवार्य होऊन मुंबई देशाची आर्थिक राजधानीचे केंद्र बनले. आजही मुंबईत अतिदाटी झाली असली तरी आर्थिक घोडदौड सुरूच आहे. या मुंबईच्या विकासाचे (बांधाच्या ओव्हरफ्लोप्रमाणे) सांडपाणी ठाणे-पुणे-नाशिक-औरंगाबादपर्यंत वाहताना दिसत आहे. या सर्व घटकांच्या आधारावर मुंबई महाराष्ट्र राज्य हे देशाच्या आयात-निर्यात, वित्त-भांडवल-बँकिंगचे व्यवहार, कारखानदारी व इलेक्ट्रॉनिक्स माहिती तंत्रासारखी क्षेत्रे या सर्वांमध्ये देशातील इतर राज्यांपेक्षा अधिक आधुनिक, संपन्न, विकसित राज्य मानले जाते. साहजिकच देशभरातून तांत्रिक शिक्षित लोक, कुशल कारागीर, भांडवलदार इत्यादी मुंबईत रोज येत राहतात.

औद्योगिकीकरणाची एक प्रवृत्ती असते. उत्पादन खर्च कमी करण्याच्या प्रयत्नात ती विशिष्ट भौगोलिक प्रदेशात केवळ केंद्रित होते एवढेच नव्हे, तर अति केंद्रीकरणाची प्रवृत्ती दर्शविते. त्यामुळे इतर (दूरचे) प्रदेश रोजगार, उत्पन्न, नागरी सुविधा इत्यादीबाबतीत मागास राहतात. त्यातून राज्यात प्रादेशिक असमतोल निर्माण होतात व त्यात दुरुस्ती शक्य झाली नाही, तर ते असमतोल तीव्र होत जातात. उदाहरणार्थ, आताच आपण उद्धृत केलेल्या आर्थिक निकषांच्या आधारे जिल्हावार मानव विकास, निर्देशांक मोजला जातो. त्यात महाराष्ट्रात सगळ्यात कमी निर्देशांक असलेले १० जिल्हे (तळापासून क्रमाने - गडचिरोली, यवतमाळ, जालना, नंदुरबार, वाशिम, धुळे, नांदेड, उस्मानाबाद, बुलढाणा, चंद्रपूर) असे दर्शवितात की, त्यापैकी सात जिल्हे (विदर्भाच्या ११ जिल्ह्यांपैकी) विदर्भातील आहेत. विदर्भातील एम.आय.डी.सी. कारखान्यांमधील रोजगार २०१० व २०११ मध्ये जेवढाच्या तेवढाच (९० हजार) होता. (संदर्भ: महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण २०११-१२, पृ. ११९) ह्याचा अर्थ असा होता की, औद्योगिक विकासाची प्रक्रिया आपोआप सर्व प्रदेशांना न्याय देणारी ठरत नाही. त्या प्रक्रियेला वळण द्यावे लागते.


### औद्योगिक, गुंतवणूक व सुविधा धोरण-२००६



राज्यातील वेळोवेळच्या औद्योगिक संधी आणि समस्या ह्यानुसार औद्योगिक धोरण व त्याचे तपशील बदलत गेले. देशातील सगळ्यात जास्त बँक ठेवी आणि बँक कर्जे, देशातील सगळ्यात जास्त विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारे व देशाच्या औद्योगिक प्रगतीची भिस्त सांभाळणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचे स्थान सतत गतिमान राहिले.

भारताने १९९२ मध्ये नवे आर्थिक धोरण स्वीकारण्यापासून १९९३, १९९५, २००१ आणि २००६ मध्ये राज्याचे औद्योगिक धोरण गरजेनुसार बदलण्यात आले.

२००६ चे धोरण तयार करताना जागतिक आणि देशातील आर्थिक विकासाची परिस्थिती चांगली होती. वातावरण आशादायक होते. म्हणून महाराष्ट्राच्या धोरणात म्हटले गेले की, राज्याने आता आर्थिक सुधारणांच्या पुढच्या टप्प्यात प्रवेश केला आहे आणि आता संरचनात्मक बदल करून



औद्योगिकदृष्ट्या संतुलित प्रादेशिक विकास घडवून आणावयाचा आहे. त्या धोरणाचे उद्दिष्ट 'उद्योगांत व पायाभूत सुविधा क्षेत्रांत वाढती खाजगी व सार्वजनिक गुंतवणूक करून संतुलित प्रादेशिक विकास व रोजगार निर्मिती यावर भर देत उच्च आणि शाश्वत आर्थिक वृद्धी करणे' असे ठरविले गेले. त्यानुसार (अ) २०१० पर्यंत औद्योगिक उत्पादन वृद्धीचा १० टक्के दर गाठणे, (ब) त्याच काळात सेवा क्षेत्राचा १२ टक्के उत्पादन वृद्धी दर गाठणे, आणि (क) २०१० पर्यंत २० लाख रोजगार निर्माण करणे, अशी लक्ष्ये ठरविली. उत्तम प्रतीच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे, अल्प मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमध्ये रोजगार निर्मितीला व गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे; देशी व विदेशी विशाल प्रकल्पांना आकर्षित करणे, स्थानिक संसाधने व इतर आर्थिक शक्यतांचा व्यापारी तत्त्वांवर उपयोग करणे, छोट्या आणि मध्यम उद्योगांना संशोधन, विकास तंत्रसुधार व दर्जा वाढविण्यास प्रोत्साहन देऊन बळकट करणे, औद्योगिक संकुले विकसित करणे, आजारी उद्योगांना संजीवनी देऊन पुनर्ज्जीवित करणे, अशक्य उद्योगांना सुरळीतपणे बाहेर पडण्यास मदत करणे, नियमावली सोपी करून उद्योगांसाठी अनुकूल वातावरण तयार करणे इत्यादींची रणनीती आखण्यात आली.

परंतु २००७ व २००८ ही जागतिक मंदीची वर्षे होती आणि २०१० पासून पुन्हा अमेरिकेत व युरोपमध्ये आर्थिक विकास कमी होऊन जवळपास दरसाल ०.५ ते ०.७५ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून तिकडे होणारी निर्यात बरीच प्रभावित झाली आहे.

**देशातील औद्योगिक क्षेत्रात नव्या घटना- घडामोडी प्रामुख्याने महाराष्ट्रातच सर्वप्रथम घडतात. अनेक वेळा ह्या घटना, नवप्रवर्तन, नव्या समस्या ह्यांना केंद्र सरकारद्वारेही कायदेशीर स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र हीच प्रयोगभूमी ठरत गेल्याचे दिसून येते.**

केंद्र सरकारच्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार २००८-२००९ पासून २००९-२०१० पर्यंतच्या वर्षात महाराष्ट्रातील उद्योगांचे देशातील उद्योगांशी प्रमाण, उत्पादनाशी प्रमाण, मूल्यवृद्धीशी प्रमाण, रोजगारांशी प्रमाण, १ ते १०५ टक्क्यांनी कमी झाले आहे. (संदर्भ : महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण, २०११-२०१२, पृ. १२१) तरी इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील परिस्थिती बरी आहे. राज्य देशाच्या एकूण निर्यातीपैकी २४ टक्के निर्यात करणारे राज्य आहे. व जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारा बाहेरील परिस्थितीचा परिणाम पुढीलपेक्षा थेट जाणवतो. त्यामुळे एकदा जागतिक परिस्थिती सुधारल्याबरोबर महाराष्ट्राचे औद्योगिक क्षेत्र पुन्हा आपल्या क्षमतेने कार्य करून एकूण प्रगतीला हातभार लावेल. परंतु त्याचबरोबर राज्यातील अप्रगत-प्रगत प्रदेश आणि जिल्हे यांच्या औद्योगिक धोरणाच्या उद्दिष्टानुसार संतुलित प्रादेशिक विकास साधला गेला तर राज्याची एकूण औद्योगिक क्षमताही वाढेल आणि संपूर्ण राज्य प्रगतीची फळे चाखू शकेल.

**संपर्क : ९३७२३९२१५७**

❑ ❑

# जैवतंत्राचे सामर्थ्य



**(पान २० वरून)**

शास्त्रामध्ये भक्कम पावले टाकत उद्योगधंद्यात चालना देण्यासाठी पूरक वातावरण आपल्या देशामध्ये आणि राज्यामध्ये तयार करण्याची गरज आहे.

राज्य शासनाने बँकांशी करार आणि कर्जाची सोय आणि विजेचा वापर आणि रजिस्ट्रेशनमध्ये जैवतंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना सूट देण्याचे पाऊल उचलले असले तरी आणि युद्धपातळीवर नियोजन व क्षमता आपल्याकडे असली तरी ही संधी हुकल्यास फार उशीर झालेला असेल.

आंतरशाखीय प्रणाली अंतर्गत शिक्षण आणि तसे तंत्रज्ञान यांची सांगड घालणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल व्हावे लागतील. त्याचबरोबर शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक, तंत्रज्ञानातील पारंगत आणि भविष्यातील आराखडे करणारे तज्ज्ञ अशा अनेक व्यक्तींना एकत्र आणून त्याबद्दल योग्य ते नियोजन आत्ताच करावे लागेल. महाराष्ट्राला निसर्ग संपदेबरोबरच बुद्धिमान लोकांची देणगी मिळालेली आहे. अशा लोकांना एकत्र आणून, त्यांना स्वायत्तता देऊन विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योजक ह्यांच्याबरोबर परस्परावलंबी कार्यक्रम / उपक्रम हाती घेतल्यास आणि त्यांना शासकीय प्रोत्साहन दिल्यास राज्याचाच नव्हे, तर संपूर्ण देशाचाच भविष्यकाळ वेगळ्या उज्ज्वल मार्गाकडे जाऊ शकेल.

**संपर्क : ९९२११८४८७१**

❑ ❑





# इंडस्ट्रियल कॉरिडॉर

# वाटचाल औद्योगिक राष्ट्राकडे

- भारत सरकारच्या सहकार्याने दिल्ली व मुंबई या दोन शहरांना जोडणारा रेल्वेचा डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर स्थापन करण्यात येत आहे.
- या फ्रेट कॉरिडॉरची लांबी १४८२ किलोमीटर असून तो उत्तरप्रदेश, दिल्ली, हरियाणा, राजस्थान, गुजराथ, मध्यप्रदेश व महाराष्ट्र, या सहा राज्यांतून प्रवास करेल. हा कॉरिडॉर जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) या ठिकाणी येऊन मिळेल.
- या कॉरिडॉरच्या दोन्ही बाजूस मिळून १५० ते २०० किलोमीटरच्या परिसरात उद्योग व मूलभूत सुविधांच्या एकात्मिक विकासासाठी केंद्र शासनाने दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (डीएमआयसी) स्थापन केले आहे.
- डीएमआयसी प्रकल्पात येऊ घातलेले उद्योग हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे असतील. त्यामुळे तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता मोठ्या प्रमाणात लागेल. तेथे तांत्रिक, अतांत्रिक, कुशल, अकुशल अशा साधारणत: १७.५ लक्ष रोजगाराची निर्मिती होण्याची शक्यता आहे.
- या औद्योगिक नगरीमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीस मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. या अत्याधुनिक औद्योगिक शहरामुळे गृहनिर्माण वसाहती निर्माण होतील. त्यांच्या गरजा व सेवा यांची पूर्तता करण्यासाठी सर्व प्रकारच्या व्यवसायात वाढ होईल.
- प्रगत तथा अत्याधुनिक औद्योगिक शहर उभारत असताना प्रकल्पग्रस्त जमीनमालकांना रोजगार संधी खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतील.
- प्रकल्पग्रस्तांना सध्या उपलब्ध होणाऱ्या दरडोई उत्पन्नापेक्षा कितीतरी जास्त पटींमध्ये दरडोई उत्पन्नात वाढ होणार आहे.
- डीएमआयसी प्रकल्पामुळे भारताला मजबूत औद्योगिक व आर्थिक आधार मिळू शकतो. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक वातावरणात स्वत:चे स्थान मजबूत करता येईल. परकीय चलन वाढविण्यासाठी देशात स्थायी व टिकाऊ मूलभूत सुविधा निर्माण करता येईल.
- या प्रकल्पाअंतर्गत मजबूत आर्थिक व्यवस्था उभारणे, शहरी-ग्रामीण दळणवळण वाढविणे, उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती व उपजत शक्तीचे एकत्रीकरण करणे अपेक्षित आहे. तसेच मानवी कौशल्य, तांत्रिक व कलेच्या संवर्धन, स्थानिक व्यापारास प्रोत्साहन देण्यात येईल. त्यामुळे एक आकर्षक सामाजिक वातावरण तयार होईल.
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन व मेळावा केंद्रामुळे आंतरराष्ट्रीय उद्योगांच्या निर्मित वस्तू व सेवा पाहण्यास उपलब्ध होतील याचा लाभ संपूर्ण महाराष्ट्रातील उद्योगांना चालना मिळण्यासाठी होईल.
- या प्रकल्पात येऊ घातलेले उद्योग हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे असणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात विदेशी पर्यटकांची वाढ होऊन पर्यटन व्यवसायासही चालना मिळेल.
- उत्पादित शेतीमालावर प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात विकसित होणार असल्यामुळे उत्पादित शेतीमालास उच्च दर्जाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होणार आहे व उत्पादने गतीने बाजारपेठेत पाठविण्यास्तव रस्ते विकास, रेल वाहतूक व समुद्र वाहतूक आणखी सुदृढ करण्याचे नियोजन आहे.
- या औद्योगिक शहरास महाराष्ट्रातील सर्व मुख्य शहरांना जोडण्याकरिता उत्तम दर्जाच्या सहापदरी, आठपदरी रस्त्यांची निर्मिती होणार आहे.
- प्रस्तावित डीएमआयसी प्रकल्पात रेल्वे सायडिंग प्रस्तावित असल्यामुळे कच्चा माल तथा पक्क्या मालाची ने-आण मोठ्या प्रमाणात व सुलभ होणार आहे.
- प्रकल्पग्रस्तांना व त्यांच्या पाल्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जाईल.
- प्रकल्पगस्तांना या औद्योगिक नगरीत त्यांच्या भूसंपादनाच्या १५ टक्के विकसित जमीन औद्योगिक प्रयोजनाकरिता किंवा ५ टक्के विकसित जमीन वाणिज्य प्रयोजनाकरिता सवलतीच्या दराने वाटप केली जाईल. या जागेवर स्वत:चा उद्योग / व्यापार सुरू करण्याकरिता मार्गदर्शन तथा प्रशिक्षण दिले जाईल.
- डी.एम.आय.सी. इंडस्ट्रियल पार्कमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त उद्योग

## महाराष्ट्रातील डीएमआयसी प्रकल्प

नाशिक - मेगा इंडस्ट्रियल पार्क
धुळे - मेगा इंडस्ट्रियल पार्क
शेंद्रा - बिडकीन - मेगा इंडस्ट्रियल पार्क
दिघी - न्यू पोर्ट इंडस्ट्रियल सिटी.



येतील. त्यामुळे परकीय चलन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होईल. विभागातील स्थानिक छोट्या, मध्यम व मोठ्या उद्योगांना अनेक परदेशी उद्योगांबरोबर व्यापार करता येईल.

- हे औद्योगिक शहर पर्यावरण संवर्धन करणारे म्हणजेच इको फ्रेंडली राहणार.

**डीएमआयसीमुळे संधी मिळणारी उद्योगक्षेत्रे**

- **स्थावर मालमत्तेतील गुंतवणूक**
- **रोजगारनिर्मिती**
- **विद्युतक्षेत्र**
- **विमान मूलभूत सुविधा**
- **बंदरे**
- **उत्पादन उद्योग**
- **बँकिंग क्षेत्र**
- **मालवाहतूक व पुरवठा पर्यटन**
- **सेवाक्षेत्र**



- या अत्याधुनिक औद्योगिक शहरात २४ तास अखंडित तथा नियमित शुद्ध पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा, मलनिस्सारण योजना इत्यादी कार्यान्वित होणार आहेत. २१ व्या शतकाच्या गरजा पूर्ण करेल अशा टिकाऊ व सुंदर शहराची निर्मिती होईल असा उद्देश ठेवला आहे.

- डीएमआयसी अंतर्गत स्मार्ट सिटी विकसित होत असल्याने त्यामध्ये शहराकरिता उत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करून त्या विविध सेवा केंद्राद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या स्मार्ट सिटीमध्ये उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.



❐ ❐

# केशर कथा

पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून काश्मीरची ख्याती आहे. कडेकपारीतून वाहणाऱ्या इथल्या नद्या, तलाव, बाग-बगिचे, पर्वतरांगा, चिनार वृक्ष अन् काश्मिरी सफरचंद अशी कितीतरी वैशिष्ट्ये काश्मीरची सांगता येतील. पण, याचबरोबर आणखी एका दुर्मिळ औषधी पिकाची देण काश्मीरला लाभली आहे ती म्हणजे केशर. केवळ काश्मीरमध्येच येणारे हे दुर्लभ अन् अनमोल पीक. श्रीनगर हायवेजवळ असणाऱ्या पामपूरलगत ५० ते ६० किलोमीटर परिसरात हे पीक घेतले जाते. केशराच्या पिकासाठी भुसभुशीत जमीन अन् बर्फाचा पाऊस आवश्यक असतो. जगात केवळ स्पेन, इराण अन् काश्मीर या तीन ठिकाणीच केशरचे उत्पादन घेतले जाते. त्यातही काश्मिरी केशराची गुणवत्ता सर्वोत्तम आहे.

केशराचे कंद जमिनीचे वाफे तयार करून त्यात लावले जातात. वर्षातून एकदा म्हणजे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये फुले उमलतात. या फुलांमधून अतिशय कौशल्याने केशर काढण्याचे काम शेतकरी करतात. केशराचे फूल जांभळ्या रंगाचे तर आतील केशर लाल रंगाचा. एका फुलात फक्त तीन केशर. तीन लाख फुले काढावीत तर जेमतेम एक किलो केशर मिळते. फूल थेट जमिनीतूनच वर येते. त्याला कोणताही पर्णसांभार नसतो. एकदा लावलेले कंद हळूहळू वाढत जातात. हे नवे कंद अन्यत्र लावता येतात. बर्फाचा पाऊस मात्र आवश्यक.

केशराचे उत्पादन हेक्टरी एक किलो मिळते. त्याला मागणी मात्र प्रचंड आहे. काश्मिरी केशराला तर जगभरातून मोठी मागणी आहे. त्याच्या औषधी गुणांमुळे त्याचे मोल सोन्याहून अधिक आहे. आयुर्वेदात केशराचे महत्त्व विशद केले आहे. सुश्रूत आणि चरक संहितेमध्ये केशरावर आणि त्याच्या औषधी गुणांवर विशेष प्रकरणे आली आहेत.

केशर हे उष्ण. त्यामुळे बाधक गुण नाहीसे करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. रोगप्रतिकारक शक्ती वाढवणार, दृष्टिदोषावर जालीम उपाय आणि मेंदूचं टॉनिक म्हणूनही केशराचा वापर होतो. उत्तम शक्तिवर्धक म्हणूनही त्याचे मोल आहे. आपण खीर, बासुंदी, श्रीखंडात केशर वापरतो. केशराची एक काडी जरी टाकली तरी त्याचा सोनेरी रंग आणि अनोखा स्वाद खाद्यपदार्थाचा आनंद द्विगुणित करून टाकतो. गरोदर स्त्रियांसाठी आणि लहान मुलांच्या गुटीमध्ये केशराचा वापर आवर्जून केला जातो. कांतिमान त्वचेसाठी केशराची मोठी मागणी आहे.



असा हा केशर नावाचा बहुगुणकारी ठेवा महाराष्ट्रातील लोकांना त्याच्या शुद्ध स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे काम नागपूर येथील मॅग्नम फाउंडेशन ही संस्था करीत आहे. मॅग्नम फाउंडेशन ही राष्ट्रीय पातळीवरची आणि मान्यवरांचा आधार असणारी संस्था. संत भोगले महाराजांनी या संस्थेची स्थापना १९३५ साली केली. विविध क्षेत्रात ही संस्था कार्य करते. संस्थेच्या महासचिव ॲड. पुष्पा शिंदे यांनी काश्मिरी केशर महाराष्ट्रात आणण्याचा ध्यास घेतला. यासाठी त्या अनेकवेळा काश्मीरला जाऊन आल्या. यातून त्यांचे केशर उत्पादक शेतकऱ्यांशी ऋणानुबंध निर्माण झाले.

केशराचे उत्पादन सरळ ग्राहकापर्यंत पोहचवणाऱ्या या उपक्रमाविषयी सांगताना ॲड. पुष्पा शिंदे, महासचिव, मॅग्नम फाउंडेशन ह्यांनी दिलेली माहिती तेवढीच अर्थपूर्ण आहे.

**(पान ४२ वर)**



# हिंजवडी बहरली

**माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नामांकित कंपन्या जसे मे. इन्फोसिस, मे. विप्रो, मे. जिऑमॅट्रिक, मे. कॉग्नीझंट इत्यादी कंपन्यांनी माहिती तंत्रज्ञान घटकांची स्थापना केली व तद्नंतर तेथे अशी क्षेत्रे स्थापन होण्यास गती आली.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी औद्योगिक केंद्रे स्थापन करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने अभियांत्रिकी उद्योग व रासायनिक उद्योग केंद्रांचा समावेश होता. परंतु १९९० च्या दशकात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा उदय झाला. महामंडळाने काळाची पावले ओळखून तळवडे सॉफ्टवेअर पार्क स्थापन केले. परंतु याचे पुणे शहरापासूनचे अंतर व इतर सुविधांमुळे तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा प्रसार तितकासा झालेला नसल्याने यास कमी प्रतिसाद लाभला. परंतु सर्वसाधारणपणे १९९५ च्या दरम्यान बंगलोर, हैदराबाद या शहरांमध्ये व लगत माहिती व तंत्रज्ञान केंद्रे विकसित होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली. या पार्श्वभूमीवर उद्योग क्षेत्रातील अग्रेसर महाराष्ट्र राज्य याबाबत उदासीन राहणे शक्य नव्हते. त्यामुळे विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुण्यामध्ये उच्च प्रशिक्षित अभियंते यांची मुबलक उपलब्धता होऊ शकेल याची खात्री बाळगून सन १९९७-९८ दरम्यान पुणे शहरालगत, शक्यतो मुंबई या देशाच्या आर्थिक राजधानीच्या राष्ट्रीय



महामार्गावर माहिती तंत्रज्ञान केंद्र उभारण्याचे वरिष्ठ स्तरावर निश्चित करण्यात आले.

पुणे शहरालगत असे आयटी पार्क करण्याचे निश्चित झाल्यावर जवळपास उपलब्ध होणारे क्षेत्र याची चाचपणी तातडीने करण्यात आली. यामध्ये प्राधान्याने शासकीय जमिनींचा विचार करून तपासणी करण्यात आली. मौजे हिंजवडी हे गाव पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात समाविष्ट असून ते पुणे शहराच्या पश्चिमेस १५ कि.मी. अंतरावर आहे. नवीन मुंबई-बंगलोर महामार्गापासून हे गाव २ कि.मी. अंतरावर आहे. या गावास संपादनापूर्वी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीपासून संपूर्ण डांबरी रस्ता उपलब्ध होता. तसेच विद्युत सेवा व पाण्याची सोय उपलब्ध होती.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १९९८ साली मौजे हिंजवडी येथील ९५.४५ हे.आर. सरकारी गायरान क्षेत्र व ०.९७ हे.आर. खाजगी क्षेत्र असे एकूण ९६.४२ हे.आर. क्षेत्र ताब्यात घेतले व या क्षेत्रावर भूखंड विकसित करून उद्योजकांना वाटपासाठी उपलब्ध करून दिले. सुरुवातीस या माहिती तंत्रज्ञान उद्यानास अपेक्षित प्रतिसाद कमी होता, परंतु सन १९९९ सालापासून अनेक नामवंत आयटी कंपन्या या ठिकाणी येऊ लागल्या.

त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. २ साठी मौजे माण, मारुंजी व हिंजवडी येथील ७.६५ हे.आर. सरकारी व २२८.५८.७० हे.आर. असे एकूण २३६.२३.७० हे.आर. क्षेत्र संपादनासाठी सन १९९९ मध्ये अधिसूचना प्रसिद्ध करून या क्षेत्र संपादनाची कार्यवाही पूर्ण केली व सन २००१ मध्ये या क्षेत्राचा ताबा महामंडळास प्राप्त झाला. त्यानंतर हे क्षेत्र विकसित करून त्यावर महामंडळाने आय टी व बी टी पार्क विकसित केले. त्यामध्ये प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित कंपन्या जसे मे. आयबीपीएल, मे. विप्रो, मे. एमक्युअर फार्मास्युटीकल्स, मे. डीएलएफ आकृती, मे. व्यंकटेश्वरा हॅचरीस इत्यादी कंपन्यांनी आपली युनिट्स स्थापन केली.

हिंजवडी व माण ही गावे तशी ग्रामीण क्षेत्रात मोडणारी होती. परंतु तेथील उपलब्ध शासकीय जमीन व संपादन करून घेतलेली खाजगी जमीन पण कोरडवाहू व माळरान पडस्वरूपाची होती. त्यामुळे या जमिनींचा उद्योग क्षेत्रासाठी वापर करणे हे किफायतशीर होते. या दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी येथे राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान स्थापित करण्यात सहकार्य केल्यामुळे या दोन्ही गावांतील क्षेत्र विकसित होण्यास मोठा कालावधी लागला नाही. या गावांची

संपादनापूर्वीची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे शेतीप्रधान व महानगरानजीक असल्याने रोजंदारीवर प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून चालत असे. परंतु जशी संपादन क्षेत्रात नवनवीन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांनी आपले माहिती तंत्रज्ञानाचे कामकाज चालू केले व गती प्राप्त केली, तसे माण, हिंजवडी गावांच्या अर्थव्यवस्थेवर, समाजकारणावर प्रभाव दिसू लागला. हा प्रभाव केवळ या दोन गावांपुरता मर्यादित न राहता त्याचे परिणाम त्यांच्या नजीकच्या गावांवरही दिसू लागले.








याच दरम्यान या आयटी क्षेत्राचा वाढता विकास व व्याप लक्षात घेता राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान टप्पा क्र. ३ साठी भूसंपादन करण्यासाठी ३५१.१७.५९ हे.आर. क्षेत्र सन २००५ संपादित करून विकसित करण्यात आले. केंद्र शासनाने सन २००५ साली विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याचे धोरण स्वीकारल्याने महामंडळाने या क्षेत्रात विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याचे नियोजन केले. यापैकी २२३.५६ हे.आर.साठी विशेष आर्थिक क्षेत्र घोषित केले. त्या क्षेत्रावर भूखंड पाडून विविध कंपन्यांना विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी भूखंड उपलब्ध करून दिले. त्यापैकी काही महत्त्वाचे उद्योजक जसे मे. टेक महिंद्रा, मे. टीसीएस, मे. असेंडास, मे. केपीआयटी कमिन्स, मे. एसक्युएस इंडिया लि. यांना वाटप केले. तीनही टप्प्यांतील वाढता कंपन्यांचा विस्तार, या कंपन्यांमध्ये कार्यरत असणारे अभियंते व कर्मचारी यांचा विचार करून Walk to Work या धोरणाचा अवलंब करून जवळपास २५० एकर क्षेत्रात रहिवास विभाग विकसित करण्याचे धोरण आखण्यात आले. यासाठी विकासक व गुंतवणूकदार निश्चित करताना शासनास परकीय चलन कसे जास्तीत जास्त प्राप्त होईल याचा विचार करून Foreign Director Investment (FDI) अंतर्गत गुंतवणूक घेण्यात आली. नियोजनपूर्वक औद्योगिक व रहिवास विभागाचा विकास चालू करण्यात आला.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानमधील केलेले सुंदर रेखांकन, मोठे रस्ते, मुबलक पाणी व वीज व मुख्यत: उद्योग पोषक वातावरण यामुळे या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. माण, हिंजवडी गावाची शेतीप्रधान अर्थव्यवस्था उद्योगप्रधान म्हणून ओळखली जाऊ लागली. या गावातील दरडोई उत्पन्न काही वर्षांत कित्येक पटीने वाढले. या पंचक्रोशीतील जमिनींचे भाव बघता बघता गगनाला भिडले. माहिती तंत्रज्ञान उद्यानालगत असणाऱ्या ग्रामीण भागाचा चेहरा बदलून तो पूर्णपणे शहरी झाला. येथील बाजारपेठेमध्ये आमूलाग्र बदल झाला. या उद्योगनगरीभोवती आर्थिक विकासाचे वलय तयार झाले. येथील सामान्य कुटुंबसुद्धा चारचाकी वाहनांचा वापर करू लागले.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी एक महत्त्वाचे IT Hub म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नकाशावर झळकू लागले. या IT Hub ची प्रसिद्धी ही केवळ राज्यस्तरावर न राहता, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा झाली. यामुळे या माहिती तंत्रज्ञान उद्यानाजवळ असणारी दोन महानगरे पुणे व पिंपरी चिंचवड येथील अर्थव्यवस्थेवर व समाजकारणावर मोठा परिणाम झाला. या माहिती तंत्रज्ञान उद्यानात काम करणारे उच्चशिक्षित अभियंते यांनी रहिवासासाठी या दोन महानगरांस पसंती दिली. त्यामुळे पुणे महानगरपालिका हद्दीत पाषाण, बाणेर, औंध, कोथरूड, वारजे इत्यादी तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात वाकड, रावेत, थेरगाव, चिंचवड इत्यादी उपनगरे वेगाने विकसित झाली. तसे पुणे हे विद्येचे माहेरघर, त्यामुळे या महानगरात या उद्योगनगरीला आवश्यक ज्ञान असणारे अभियंते तयार होण्यासाठी बऱ्याच शिक्षण संस्थांनी मोठ्या प्रमाणात अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली. या अभियांत्रिकी महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांनीसुद्धा इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, IT, Computer याच शाखांना प्राधान्य दिले त्यामुळे या कंपन्यांनासुद्धा प्रशिक्षित अभियंते मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्यास मदत झाली.

या माहिती तंत्रज्ञान उद्यानात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांनी येथील कार्यरत अभियंते व कर्मचारी यांनासुद्धा अत्यंत आकर्षक पगार व सवलती दिल्यामुळे महानगराच्या अर्थव्यवस्थेवर याचा मोठा परिणाम झाला. दोन महानगरे व लगतच्या ग्रामीण भागात यामुळे बांधकाम क्षेत्रात, दैनंदिन व्यवहारात दरवाढीचे परिणाम दिसू लागले. बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मागणी निर्माण झाली. तसेच वाहन उद्योगाच्या मागणीमध्येसुद्धा प्रचंड वाढ झाली. इतकेच नाही, तर महाराष्ट्रातील उर्वरित जिल्ह्यांतील तरुणांमध्ये माहिती तंत्रज्ञान उद्यानामध्ये अभियंते म्हणून जाण्याची ओढ निर्माण झाली. या दोन महानगरांमधील असणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या वाढत्या विस्ताराचा महानगरातील उपनगरांमध्ये परिणाम दिसू लागला. त्यामुळे हॉटेल संस्कृती, मॉल संस्कृती झपाट्याने उदयास आली व या संस्कृतीचे परिणाम नजीकच्या इतर जिल्ह्यांतसुद्धा दिसू लागले. त्याचप्रमाणे देशाच्या विविध भागांतून आलेले तरुण अभियंते, त्यांची विचारसरणी, राहणीमान व सांस्कृतिक आदान प्रदान यामुळे पुणे महानगरीमध्ये कॉस्मोपॉलिटन कल्चर आले.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानामुळे दोन्ही महानगरे व नजीकच्या ग्रामीण क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेवर सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीवर झालेला परिणाम पाहता या क्षेत्राचा कायापालट झाला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. किंबहुना या माहिती तंत्रज्ञान उद्यानामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला.

# औद्योगिक संस्कृतीचे नवे पर्व

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पुणे परिसरात पिंपरी चिंचवड हे औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्याचे १९६२ मध्ये ठरविले व त्यानुसार औद्योगिकीकरणासाठी १२२४ हेक्टर जमीन संपादन केलेली आहे. या संपादनक्षेत्रात निरनिराळ्या उद्योगांसाठी टाटा, बजाज ॲटो, बजाज टेम्पो, सेंच्युरी एन्का, फॉरमायका अशा मोठ्या उद्योगांना भूखंड वाटप केलेले आहेत.

एकेकाळी चाकण परिसरातून कांदा व भाजीपाल्याची देशात सर्वत्र निर्यात होत असे. आता त्याच परिसरातून वरील उद्योजकांकडून दरवर्षी १८ लाख वाहनांची निर्मिती होणार आहे. ही देशातील सर्वोच्च वाहन निर्मिती राहील. चाकण परिसरात जीईई कंपनीमार्फत नजीकच्या कालावधीत येथे अत्याधुनिक जनरेटर्सचे उत्पादन मोठ्या प्रमाणात सुरू होणार आहे.

महाराष्ट्र शासन व महामंडळाच्या सहकार्याने हे प्रकल्प गेल्या ५ वर्षांत कार्यान्वित झालेले आहेत. याशिवाय पुणे परिसरात जेसीबी, सॅनी, एन्फोसिस, भारत फोर्ज कार्यरत आहेत.

**बारामती टेक्सटाईल पार्क**

केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने देशात ३० ठिकाणी टेक्सटाईल पार्कस् निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला असून, त्यापैकी ६ टेक्सटाईल पार्कसाठी महाराष्ट्रात मंजुरी दिलेली आहे. त्यासाठी पुणे जिल्ह्यातील बारामती औद्योगिक क्षेत्रात ६० एकर जमीन ही टेक्सटाईल पार्कसाठी देण्यात आलेली असून, त्यामध्ये ६० भूखंड पाडले आहेत व निरनिराळ्या २० वस्त्रोद्योग निर्मिती संस्थांना वाटप केले आहेत. या प्रकल्पाचे निर्मिती मूल्य १५२ कोटी असून, त्यापैकी ४० कोटी केंद्र सरकारने सबसिडी म्हणून दिले आहेत. बहूतेक भूखंडावरील उद्योग सुरू झाले असून ७,००० कुशल व अकुशल असे रोजगार या उद्योगामुळे निर्माण झालेले आहेत.

**पुष्पसंवर्धन उद्यान**

पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यामधील तळेगाव औद्योगिक क्षेत्रासाठी ५७८ हेक्टर जमीन संपादन करण्यात आलेली आहे. संपादित क्षेत्राजवळून इंद्रायणी नदी वाहत असल्याने महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण धोरणानुसार नदीच्या उच्चतम पूररेषेपासून १ कि.मी.पर्यंतच्या क्षेत्रात उद्योग उभारण्यास प्रतिबंध असल्याने तळेगाव औद्योगिक क्षेत्राजवळील नदीखोऱ्याच्या पर्यावरण धोरणानुसार बाधित असलेल्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने २५० हे. क्षेत्रात पुष्पसंवर्धन उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेतला. त्या क्षेत्रामध्ये १०९ भूखंड आरेखित करण्यात आले असून, विविध संस्थांना त्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामध्ये फुलांचे उत्पादन, शीतकरण प्रकल्प, नर्सरी हार्वेस्ट हाउस चालू होऊन आंतरराष्ट्रीय फुलांच्या व्यापारास चालना दिलेली आहे. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली असून, परदेशी निर्यातीत सहभाग घेतला आहे व त्यामुळे परदेशी चलनाची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत आहे. तळेगाव पुष्पउद्यानामध्ये सुमारे २,००० कोटींची गुंतवणूक झाली असून ५,००० रोजगार निर्मिती झाली आहे आणि सुमारे २५०० कोटींची उलाढाल होत आहे.

**औद्योगिकीकरणामुळे पुणे जिल्ह्यामध्ये गेल्या ५ वर्षांमध्ये ४८ मोठे देशी व परदेशी उद्योग उभे राहिलेले असून त्यामध्ये ४५,५७८ कोटी रूपयांची गुंतवणूक झाली. या उद्योगांमधून सुमारे ७६,५०० रोजगार उपलब्ध झाला. गेल्या ५० वर्षांमध्ये ५० लाख लोकांना रोजगाराची संधी मिळाली.**

**महामंडळाचे पुनर्वसन धोरण**

गेल्या ५ वर्षांत महामंडळाने बाधित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी योजना आखलेली असून, संपादित क्षेत्राच्या १५% विकसित भूखंड संबंधित शेतकऱ्यांना देण्याचे धोरण राबविलेले आहे. यामुळे बाधित शेतकऱ्यांनाही त्या औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजक म्हणून मानाचे स्थान मिळत आहे व या धोरणामुळे विकासातील सहभागाच्या भावनेमुळे मोठ्या प्रमाणात भूसंपादनास चालना मिळालेली आहे.

याशिवाय उद्योजकांच्या बरोबरीने गावातील इतर उद्योगांनाही व्यापार उद्योगात फार मोठ्या प्रमाणात चालना मिळाली असून, राज्याच्या भरभराटीत पुणे जिल्ह्यातील महामंडळाच्या वसाहतींचा मोठा वाटा आहे.

**महाराष्ट्रात सर्वप्रथम पिंपरी चिंचवड हीच औद्योगिक नगरी स्थापन झाली. तिला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. या ५० वर्षांच्या कालावधीत पिंपरी चिंचवड या गावांच्या स्वतंत्र ग्रामपंचायती होत्या. १९७० मध्ये त्यांचे नगर परिषदेत रूपांतर झाले. १९८४ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत रूपांतर झाले. या विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मोठे योगदान आहे. औद्योगिककरणामुळे आशियामधील सर्वांत श्रीमंत महानगरपालिका आणि औद्योगिक नगरी अशी ओळख पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची झाली आहे.**





# भारताचे डेट्रॉईट

अमेरिकेतील मोटरनिर्मिती केंद्र म्हणून डेट्राईट हे शहर जगभर प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणे पुणे जिल्ह्यातील चाकण व तळेगाव या औद्योगिक क्षेत्रात जनरल मोटर्स, व्होक्स वॅगन, बजाज ऑटो, मर्सिडिज बेंझ, महिंद्र ॲण्ड महिंद्र, ह्युंदाई, ब्रिजस्टोन, चिनी आंतरराष्ट्रीय ट्रक उत्पादक कंपनी फोटॉन या राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पूर्ण क्षमतेने आपले प्रकल्प उभारलेले आहेत. तेथे सुमारे १८ लाख वाहनांची दरवर्षी निर्मिती क्षमता असून, बहुतेक प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्यामुळे पुणे परिसर हे भारताचे डेट्राईट संबोधले जात आहे. देशातील सर्वाधिक वाहनांची निर्मिती चाकण - तळेगाव परिसरात होत आहे.

| अ.क्र. | कंपनीचे नाव | केलेली गुंतवणूक (कोटी) | रोजगार निर्मिती | प्रकल्पाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| १. | व्होक्स वॅगन | ४२०० | २३०० | प्रवासी मोटार वाहन निर्मिती सुरू |
| २. | महेंद्र ॲण्ड महेंद्र | ४००० | २३५० | प्रवासी वाहन निर्मिती सुरू |
| ३. | मर्सिडिज बेंझ | २०४ | ५७३ | मोटार वाहन निर्मिती सुरू |
| ४. | जनरल मोटर्स | ३४४० | १२०० | शेवरलेट स्पार्क गाड्यांचे उत्पादन सुरू |
| ५. | बजाज ऑटो | २४०५ | १८००० | चार चाकी व तीन चाकी वाहन निर्मिती सुरू |
| ६. | हुंडाई | २६० | ४०० | मोटार वाहने व पार्ट निर्मिती सुरू |
| ७. | ब्रिजस्टोन | २०५० | ४४५० | टायर निर्मिती सुरू |
| ८. | फोर्बजमार्शल | २१५ | १००० | गॅस पाईप्स निर्मिती सुरू |
| ९. | जनरल इलेक्ट्रिकल इंडिया (GE-1) | १०२० | २६५० | जनरेटर सेट्सची निर्मिती |
| १०. | फियाट (रांजणगाव) | | | |
| ११. | पियागो (बारामती) | | | |
| १२. | भारत फोर्ज (बारामती) | ५०० | ५०० | |
| | एकूण | १८२९४ | ३३४२३ | |



# कर्तृत्व आणि कीर्ती

● व्ही. डी. कापते

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना १९ ऑक्टोबर, १९६२ रोजी करण्यात आली. लघुउद्योग घटकांना नवी दिशा दाखवून त्यांच्या विकासासाठी मदत व्हावी हा मुख्य उद्देश होता.

महामंडळामार्फत सुरुवातीच्या काळात लघुउद्योग घटकांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वितरणाची योजना राबविण्यात येत होती. या योजनेसोबतच लघुउद्योग घटकांना आवश्यक यंत्रसामग्रीचा भाडेतत्त्वावर पुरवठा करणे हीसुद्धा योजना सुरू करण्यात आली व या दोन्ही योजना सन १९६४ पर्यंत राबविण्यात येत होत्या. सन १९६४-६५ मध्ये महामंडळाने लघुउद्योग घटकांसाठी विपणन साहाय्य ही योजना सुरू केली. सन १९६५-६६ मध्ये महामंडळाने लघुउद्योग घटकांसाठी निर्यात साहाय्य योजना सुरू केली. या योजनेव्यतिरिक्त महामंडळामार्फत आयात साहाय्य, पूरक उद्योग विकास, उद्योग घटकांसाठी तज्ज्ञांचा गट स्थापन करणे इ. योजना राबविण्यात येत होत्या.

सन १९९२ नंतर भारत सरकारने लोखंड व पोलाद या वस्तूंवरील नियंत्रण रद्द केल्यामुळे लोखंड व पोलाद वितरण योजनेंतर्गत महामंडळाची उलाढाल कमी झाली. यामुळे महामंडळाने १९९२ नंतर विपणन साहाय्य योजनेवर जास्त भर दिला. लघुउद्योग घटकांची मागणी लक्षात घेऊन महामंडळाने १९९९ मध्ये लघुउद्योग घटकांसाठी उधारीवर कच्चा माल पुरवठा करण्याची योजना राबविली. या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योग घटकांकडे रक्कम थकीत राहिल्यामुळे सन २००१ मध्ये महामंडळाने ही योजना रद्द केली.

### कोळशाचे वितरण

महामंडळाचा लोखंड व तसेच कोळसा वितरणातील अनुभव लक्षात घेऊन सन २००५ मध्ये शासनाने लघुउद्योग घटकांना कोळशाचे वितरण करणारी शासनाची संस्था म्हणून महामंडळाची नेमणूक केली. महामंडळाने जून २००६ ते मार्च २०१२ पर्यंत राज्यातील लघुउद्योग घटकांना कोळशाचे वितरण केले.

### महामंडळाच्या योजना

**विपणन साहाय्य :** लघुउद्योग घटकांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना स्थिर बाजारपेठ मिळवून देऊन त्यांना त्यांच्या उत्पादनाची विक्री करण्यास महामंडळ खालीलप्रमाणे मदत करते:-

**(अ) वस्तूंचे दरकरार करणे.**

महामंडळाकडून खरेदीसाठी राखून ठेवण्यात









### महामंडळाची ५ वर्षांतील उलाढाल

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | उलाढाल (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १ | २००७-२००८ | २५९.५२ |
| २ | २००८-२००९ | २९१.७३ |
| ३ | २००९-२०१० | ३५४.०१ |
| ४ | २०१०-२०११ | ३५५.३१ |
| ५ | २०११-२०१२ | ५५३.८२ |

आलेल्या २१ वस्तूंचे दर करार, भांडार खरेदी समितीच्या मान्यतेने दरवर्षी करण्यात येत आहे. या वस्तूंमध्ये लोखंडी फर्निचर, संगणक फर्निचर, पीव्हीसी पाईप, आरसीसी पाईप, पॉलिथिन बॅग्ज, इ. वस्तूंचा समावेश आहे. या वस्तूंची खरेदी शासकीय विभागांमार्फत दर करारातील दराने थेट महामंडळाकडून करण्यात येते.

**(ब) शासकीय विभागांच्या खरेदी निविदांमध्ये भाग घेणे.**

शासकीय विभागांमार्फत खरेदीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदांमध्ये लघुउद्योग घटकांच्या वतीने भाग घेणे. महामंडळास शासकीय विभागाकडून कार्यादेश प्राप्त झाल्यास तो संबंधित लघुउद्योग घटकास देऊन पुरवठा करण्यात येतो.

(क) मंडळामार्फत अस्थायी स्वरूपाचे बांधकाम व नूतनीकरणाची कामेसुद्धा शासकीय विभागासाठी करण्यात येतात. महामंडळाने आदिवासी विकास विभाग, महिला बाल कल्याण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, कृषी विभाग इ. विभागांसाठी आश्रमशाळांचे बांधकाम, अंगणवाडी बांधकाम, तलाठी निवासस्थान बांधकाम, हरितगृहाचे बांधकाम इ. प्रकारची बांधकामे केली आहेत. महामंडळाने आरोग्य विभागासाठी आठ सार्वजनिक इस्पितळांच्या नूतनीकरणाची कामे घेतली आहेत. महामंडळाने विपणन साहाय्य योजनेंतर्गत सन २०११-१२ मध्ये एकूण रुपये ४५७.२९ कोटी एवढी उलाढाल केली आहे.

### लघुउद्योग घटकांना कच्चा मालाचा पुरवठा

लघुउद्योग घटकांना लागणारे लोखंड व पोलाद यांचा पुरवठा स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया व राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड या दोन मुख्य उत्पादकांमार्फत त्यांच्याच दराने पुरविण्यात येते. सन २०११-२०१२ मध्ये महामंडळामार्फत एकूण ३,४१,६४० मे. टन एवढ्या कोळशाचे राज्यातील एकूण ३८७ लघु व मध्यम उद्योग घटकांना वितरण करण्यात आले.

### हस्तकला विकास

महामंडळ राज्यातील हस्तकलेच्या विकासासाठी काम करते. लोप पावत चाललेल्या महामंडळ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला जातो. या प्रशिक्षणाद्वारे लोप पावत चाललेल्या कलांचे जतन करणे व हस्तकला कारागिरांचे कौशल्य वाढविणे ही उद्दिष्टे साध्य करण्यात येतात. राज्यातील हस्तकला कारागिरांनी तयार (पान ५० वर)



# समृद्धीच्या पुढच्या टप्प्यावर

**नागपूर विभागामध्ये आजपर्यंत सुमारे २१,००० कोटींची गुंतवणूक झाली. त्यामुळे सुमारे २ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. मोठ्या औद्योगिक क्षेत्रांच्या विकासासोबतच तालुकास्तरावर लहान औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आली आहेत.**

● विजय भाकरे

नागपूर विभागामध्ये सन १९६२ साली सर्वप्रथम नागपूर शहरालगत ७४५.८३ हेक्टरवर नागपूर (हिंगणा) औद्योगिक क्षेत्राचा विकास करून औद्योगिक विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या औद्योगिक क्षेत्रात महामंडळाने आतापर्यंत १,५५७ भूखंड वाटप केले आहेत. अतिशय कमी सोईसुविधा उपलब्ध असतानादेखील स्थानिक संसाधनांचा वापर करीत हिंगणा औद्योगिक क्षेत्रामध्ये औद्योगिक उत्पादन सुरू राहिले.

नागपूर शहराचे भारताच्या मध्यवर्ती भागातील स्थान, संपूर्ण देशाशी हवाई व रेल्वेमार्गाने संपर्क होण्याची सुविधा, स्थानिक स्तरावर उपलब्ध विपुल नैसर्गिक संसाधने आणि कृषी क्षेत्रातील उत्पादने इत्यादी उद्योगपूरक बाबींमुळे नवनवीन उद्योजकांनी नागपूर विभागास पसंती देऊन उद्योगांकरिता नवीन जागेची मागणी केल्यामुळे महामंडळाने १९९० मध्ये नागपूर शहरापासून २८ कि.मी. अंतरावर नागपूर-हैदराबाद महामार्ग क्र. ७ वर २४२०.५२ हेक्टर क्षेत्रावर सुव्यवस्थित पाणीपुरवठा, सलग विद्युत पुरवठा, सांडपाणी प्रक्रिया व उत्सर्जन व्यवस्था, घन कचऱ्याची विल्हेवाट लावणारी यंत्रणा अशा प्रकारच्या विविध पायाभूत सुविधा असलेले 'बुटीबोरी' हे उच्च पायाभूत सुविधायुक्त औद्योगिक क्षेत्र विकसित केले. या ठिकाणी सुमारे ८,००० कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. या औद्योगिक क्षेत्रात महामंडळाने सर्व सुविधायुक्त औद्योगिक, निवासी व व्यापारी, फूड पार्क, टेक्सटाईल, आयटीपार्क, एस.ई.झेड.ईत्यादी विविध विभाग विकसित केले असून आजपर्यंत २,१३९ भूखंड विकसित करून वाटप केले आहेत.

महामंडळाने नागपूर विभागांतर्गत येणाऱ्या ६ जिल्ह्यांमध्ये ३९ ठिकाणी औद्योगिक क्षेत्रे विकसित केली असून ५ ठिकाणी औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्याचे काम सुरू आहे.

ताब्यात आलेल्या क्षेत्रापैकी ६,१४३ (क्षेत्र ५,१८७.२४ हे.आर.) भूखंडाचे गरजू उद्योगांना महामंडळाकडून वाटप करण्यात आले आहे. वाटप करण्यात आलेल्या भूखंडांपैकी ३,०३६ भूखंडांवर उत्पादन सुरू आहे.

नागपूर विभागात औद्योगिक उत्पादन सुरू असलेल्या उद्योगांमध्ये मे. महिंद्र ॲण्ड महिंद्र, हिंगणा, मे. विको लेबॉरेटरी, हिंगणा, मे. व्ही.आय.पी., हिंगणा, मे. मुरली ॲग्रो, हिंगणा, मे. मालु इलेक्ट्रोड, हिंगणा, मे. जैस्वाल केमिकल, हिंगणा, मे. अशोक ले लँड, भंडारा, मे. वर्धा पॉवर कंपनी लि., वरोरा, मे. एम्को एनर्जी लि., वरोरा, मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लि., तिरोडा, मे. टाटा पॉवर, उमरेड, मे. ईरा इंटरनॅशनल, उमरेड, मे. इंडिया बुल्स, काटोल, मे. व्ही. आय. पी. एल. (रिलायन्स), बुटीबोरी, मे. इंडोरामा सिंथेटिक्स, बुटीबोरी, मे. युनिवर्थ इंडोवर्थ, बुटीबोरी, मे. के. ई. सी. इंटरनॅशनल लि., बुटीबोरी, मे. मोरारजी ब्रेम्बना, बुटीबोरी, मे. सनविजय रोलिंग, बुटीबोरी, मे. भारत पेट्रोलियम, बुटीबोरी, मे. पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., देवरी (वर्धा), मे. धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि., ताडाळी (चंद्रपूर), मे. सिपको लि., भद्रावती, मे. निप्पान डेन्रो इस्पात प्रा.लि., कळमेश्वर, मे. इलेक्ट्रोलक्स (व्होल्टास), बुटीबोरी, मे. मारुती सुझूकी, बुटीबोरी, मे. सनविजय रोलींग, बुटीबोरी, मे. शिल्पा रोलींग, बुटीबोरी, मे. ग्राईंडवेल नार्टन लि., बुटीबोरी, मे. गेमन इंडिया, बुटीबोरी व देवळी, मे. महालक्ष्मी स्टील ॲण्ड रोलींग, देवळी या प्रमुख प्रकल्पांचा समावेश आहे. या उद्योगांमध्ये आजमितीस मोठ्या संख्येने कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

'मिहान' हा अतिशय महत्त्वाकांक्षी आणि नागपूरच्या औद्योगिक विकासाकरिता आधारभूत ठरणारा प्रकल्प ४३५४ हे. आर. क्षेत्रावर नागपूर शहरालगत विकसित करण्यात येत असून त्यामध्ये आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीकरिता अद्ययावत विमानतळ आणि विशेष आर्थिक क्षेत्र, आयटी पार्क, निवासी विभाग इत्यादी MADC मार्फत विकसित केला जात आहे.

औद्योगिक उत्पादनाकरिता वाढती भूखंडांची मागणी विचारात घेऊन महामंडळामार्फत 'बुटीबोरी टप्पा क्र. २' हे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येत असून त्याकरिता १५७० हे. जमीन भूसंपादनाची शीघ्रगतीने पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे. या औद्योगिक क्षेत्रात एकूण रुपये ५,००० कोटींची गुंतवणूक होण्याची शक्यता असून त्या ठिकाणी १५,००० प्रत्यक्ष रोजगार व ३०,००० अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्याचप्रमाणे नागपूरजवळील ३० कि.मी. अंतरावर असलेले कुही व उमरेड या गावांजवळ 'नॅशनल इन्व्हेस्टमेंट व मॅन्युफॅक्चरींग झोन' (NIMZ) हा केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने विकसित करावयाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रस्तावित असून त्याकरिता ६२८० हे. जमीन संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. प्रकल्पात एकूण रु. २०,००० कोटींची गुंतवणूक होण्याची शक्यता असून त्यामध्ये ६०,००० प्रत्यक्ष रोजगार आणि १,२०,००० अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे.



**नागपूर प्रादेशिक विभागामध्ये मे. रिलायन्स पॉवर, बुटीबोरी (३०० MW), मे. वर्धा पॉवर, वरोरा (५४० MW), हे विद्युतनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लि., तिरोडा (२००० MW), मे. धारीवाल एनर्जी, ताडाळी (५४० MW), मे. जी.एम.आर. पॉवर, वरोरा (१२० MW), हे प्रकल्प लवकरच कार्यान्वित होतील. त्यामुळे एकूण ३४६० मेगावॅट वीजनिर्मिती होईल.** ❑❑

# दमदार झेप

रामदास खेडकर

**नाशिक परिसरात विकसित झालेल्या उद्योगधंद्यांमुळे सर्वसामान्य माणसाबरोबर व्यापारी वर्गाचाही फायदा झाला. तसेच या विभागातील मनुष्यविकास निर्देशांक वाढला आहे.**

भारतामध्ये नाशिकचे नाव वेगवेगळ्या क्षेत्रात अग्रेसर आहे. उदा. एचएएल कंपनी, चलनी नाणी व नोटा छपाई मुद्रांक, संरक्षण क्षेत्रातील आर्टिलरी केंद्र इत्यादी बाबींसाठी नाशिकचा उल्लेख करावा लागतो. मुंबई-पुणे नंतर उद्योगधंद्यातील जेवढी गुंतवणूक राज्यातील इतर भागात झालेली आहे, त्या सर्वांत वरचा क्रमांक लागतो तो या जिल्ह्याचा. राज्याच्याच नव्हे, तर देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये नाशिकचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यास कारणेही साजेशी आहेत.

मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, मे. बॉश (मायको), ग्लॅस्को, सिएट लि., मे. सिमेन्स इंडिया, मे. गरवारे प्लास्टीक, मे. ग्लेनमार्क, मे. कार्बन कॉर्पोरेशन, मे. इप्कॉस, मे. हर्डीज स्पायसर, मे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज्, मे. किर्लोस्कर इंजिन, मे. हिंदुस्थान नॅशनल ग्लास, मे. जिंदाल सॉ पाईप या व इतर अशा अनेक उद्योगधंद्याची प्रगती, त्यांच्यामुळे निर्माण झालेला रोजगार, उत्पादनाची निर्यात व पर्यायाने प्राप्त झालेले परकीय चलन या सर्व बाबींचा संबंध येतो तो आर्थिक विकास व समाज विकास या घटकांशी. या मोठ्या उद्योगांवर आधारित लहान उद्योगांचा वाटाही तेवढाच महत्त्वाचा आहे. अर्थात, कोणत्याही उद्योगाची वाढ होण्यासाठी जागा तर महत्त्वाची आहे; परंतु जागेबरोबरच त्या भागातील राजकीय परिस्थिती, सामाजिक रचना, कामगारांचे सहकार्य, विपणन व्यवस्था, कामगार कौशल्य या बाबी फार महत्त्वाच्या ठरतात. त्या सर्व बाबी या परिसरात चांगल्या प्रमाणात आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांची पसंती नाशिक शहराला राहिली आहे.

नाशिक (सातपूर), अतिरिक्त नाशिक (अंबड) व सिन्नर औद्योगिक क्षेत्रात खालीलप्रमाणे मोठे उद्योग कार्यान्वित आहेत. त्यांचे उत्पादन व इतर माहिती खालीलप्रमाणे:

- मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा : लोगोन, स्कॉर्पीओ, बोलेरो, झायलो, एक्सयूव्ही ५०० या गाड्यांचे उत्पादन होत आहे.
- मे. बॉश (मायक्रो) : या कंपनीमध्ये दुचाकी गाड्यांच्या प्लगचे उत्पादन होते.
- मे. सिएट : सर्व प्रकारचे टायर तयार होतात.
- मे. सिमेन्स इंडिया : या कंपनीमध्ये इलेक्ट्रॉनिक्स पार्ट तयार होतात.
- मे. गरवारे : या कंपनीमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या पॉलीस्टर फिल्म तयार होतात.
- मे. ग्लेनमार्क व ग्लॅक्सको फार्मास्युटिकल : या कंपनीमध्ये विविध प्रकारची औषधे तयार होतात.
- मे. इप्कॉस : या कंपनीमध्ये कॅपेसिटर्स तयार होतात.
- मे. क्रॉम्प्टन ग्रिव्हज : या कंपनीत स्वीज गेअर, ट्युब लाईन व फॅनचे उत्पादन होते.
- मे. जिंदाल सॉ पाईप : या कंपनीमध्ये मोठमोठे लोखंडी पाईप तयार केले जातात.
- मे. हिंदुस्थान नॅशनल ग्लास : या कंपनीमध्ये विविध प्रकारच्या रंगांच्या काचा तयार केल्या जातात.

(पान ३९ वर)



## नाशिक जिल्ह्यातील ओद्योगिक क्षेत्र

| मोठे औद्योगिक क्षेत्र | |
|---|---|
| सातपूर (नाशिक)<br>अतिरिक्त नाशिक, (अंबड)<br>सिन्नर (माळेगांव)<br>अतिरिक्त सिन्नर (एसईझेड) | मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, मे बॉश (मायको), ग्लॅस्को, सिएट लि, मे. सिमेन्स इंडिया, मे. गरवारे प्लॅस्टिक, मे. ग्लेनमार्क, मे. कार्बन कॉर्पोरेशन, मे. इपीसी इरीगेशन, मे. इप्कॉस, मे. हर्डीज स्पायसर, मे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज, मे. किर्लोस्कर इंजिन, मे. हिंदुस्थान नॅशनल ग्लास, मे. जिंदल सॉ पाईप इत्यादी मोठे उद्योग कार्यान्वित आहेत. महामंडळ व मे. इंडिया बुल इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या संयुक्त विद्यमाने बहुद्देशीय विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यात येत आहे. |

## लघु औद्योगिक क्षेत्र

| लघु औद्योगिक क्षेत्र | |
|---|---|
| विंचूर, पेठ,<br>दिंडोरी,<br>मालेगाव | विंचूर येथे अशिया खंडातील सर्वांत मोठे वाईन पार्क विकसित केले आहे. त्या ठिकाणी महामंडळाने वाईन उद्योगासाठी आवश्यक असलली किमती यंत्रसामग्री, ना नफा ना तोटा या तत्वावर वाईन उद्योजकांना वापरण्यासाठी उपलब्ध करून दिली आहे. कोल्ड स्टोरेज, वाईन इंन्स्टिट्यूट व इतर बाबींसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्या ठिकाणी विंसुरा, फ्लेमिंगो, इंडियन वाईन्स, बाळा रवी आदी नामांकित वाईनरी सुरू आहेत. |

# मराठवाड्याचे टेकऑफ

औरंगाबादची ऑटो इंडस्ट्री, जालन्याची स्टील इंडस्ट्री, हिंगोली व लातूर येथील प्रस्तावित टेक्स्टाईल पार्क, बीड, उस्मानाबाद, नांदेड व परभणी येथील विकसित होणारे कृषीपूरक उद्योग, औरंगाबाद ते जालना या पट्ट्यात होणारा एमआयडीसी प्रकल्प यासारख्या विविध औद्योगिक संधींची क्षितिजं मराठवाड्याला खुणावत असून औद्योगिक क्षेत्रात मोठी झेप घेण्यासाठी मराठवाडा सज्ज झाला आहे.

मराठवाड्याला उद्यम नगरीचे स्वप्न सुरुवातीला दाखविले ते औरंगाबादने! पूर्वी मराठवाड्यात फार मोठे कारखाने होते अशातला भाग नाही. औरंगाबाद येथे १९६२ मध्ये काही उद्योजक एकत्र आले आणि त्यांनी रेल्वे स्टेशन परिसरात सुरू केलेल्या अभियांत्रिकी क्षेत्रातील उद्योगांमुळे शहरात खऱ्या अर्थाने उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली गेली. याच काळात रेल्वे स्टेशन भागात पहिली 'एमआयडीसी' स्थापन झाली. नव्वदच्या दशकात 'बजाज' व 'व्हिडीओकॉन'सारख्या कंपन्या येथे आल्या आणि औरंगाबादमध्ये उद्योग क्षेत्राच्या भरभराटीला सुरुवात झाली. अल्पावधीतच आशियातील वेगाने वाढणारे शहर म्हणूनही औरंगाबादची ओळख निर्माण झाली.

### मल्टिनॅशनल उद्योजक

औरंगाबादमध्ये स्थिरावलेल्या कंपन्यांनी गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये विस्तारासोबतच अतिरिक्त गुंतवणूकही वाढवली आहे. प्लॅस्टिक, ऑटो कम्पोनंट, ऑटोमोबाईल, फार्मास्युटिकल्स, बीअर ॲण्ड वाइन, सीड्स, इंजिनीअरिंग' यासारखी वैविध्यपूर्ण क्षेत्र गेल्या दोन दशकांत उदयास आली. चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील आयटी इंडस्ट्रीनेही कात टाकली आहे. आदित्य बिर्ला व व्होडाफोन यांचे कॉल सेंटर सुरू झाले आहे.



**वाहन उद्योग क्षेत्रातील कंपन्यासाठी लागणारे प्लॅस्टिक, शीट मेटल, फोर्जिंग, मशिनिंग, डायकास्टिंग, इलेक्ट्रिकल्स, लाइटनिंग, ऑटो पार्ट्स आदींचे उद्योग औरंगाबाद येथे आहेत. वोक्स वॅगन, फोर्ड, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, टाटा मोटर्स, पीआरजीओ, ह्युंडाई; अमेरिका व युरोपस्थित बीएमडब्ल्यू, मर्सिडीज, जॅग्वार, जॉन डीयर, यासह इतर उद्योगांना लागणारे ऑटो कम्पोनन्ट औरंगाबादचे उद्योग पुरवितात. औरंगाबाद येथे मोठ्या उद्योगांचे जवळपास १९५ युनिट आहेत. त्यातून ८०,५०० नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. जवळपास सात हजार ३८४ कोटींची गुंतवणूक आतापर्यंत झाली आहे.**



औरंगाबादमधील उद्योजक आता खऱ्या अर्थाने 'मल्टिनॅशनल'च्या दिशेने वाटचाल करीत आहेत. औरंगाबाद परिसरात सध्या शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक वसाहत, वाळूज औद्योगिक वसाहत, चिकलठाणा औद्योगिक वसाहत, रेल्वे स्टेशन औद्योगिक वसाहत, पैठण औद्योगिक वसाहत अशा वसाहती आहेत. चारही बाजूंनी औद्योगिक वसाहती असलेले शहर म्हणून उद्योग जगतात औरंगाबादची ओळख निर्माण झाली आहे.

औरंगाबादमध्ये १९७० ते १९८० च्या दशकात बजाजसाठी ऑटो ॲक्सेसरी निर्माण करणारे छोटेमोठे कारखाने उभे राहिले, ज्या ऑटो कम्पोनन्ट उत्पादक कंपनीमध्ये २० ते २५ कामगार होते, तेथे आता दीड ते दोन हजार कामगार काम करीत आहेत. नंतरच्या काळात या छोट्या उद्योगांचे रूपांतर मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये झाले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे इन्डुरन्स तसेच व्हेरॉकचे देता येईल. या कंपन्यांची वार्षिक उलाढाल आता प्रत्येकी तीन हजार कोटींवर गेली आहे.

मध्यम व लघुउद्योजकांची संख्या तीन हजार ४०५ इतकी आहे. त्यातून ३६ हजार ८७१ रोजगार उपलब्ध झाले असून ४०४ कोटी ८६ लाखांची गुंतवणूक झालेली आहे.

### ऑटो क्लस्टर

मराठवाडा ऑटो क्लस्टरच्या रूपाने आता इथल्या ऑटोमोबाईल उद्योगांना फार मोठा आधार निर्माण झाला आहे. मराठवाडा ऑटो क्लस्टरसाठी उद्योजक एकत्रित आले. केंद्र सरकारने निधी उपलब्ध करून दिला. ऐंशी कोटी रुपये खर्चून हे ऑटो क्लस्टर सुरू झाले आहे. ऑटो मशीन किंवा कॉम्पोनन्टच्या डिझाईनपासून ते तयार करण्याचे काम येथे केले जाणार आहे. उद्योगांसाठी कॉमन फॅसिलिटी सेंटर म्हणून याकडे बघितले जाते.




औरंगाबादमध्ये बजाज ऑटो, स्कोडा कंपन्यांसोबतच वाहनांचे स्पेअर पार्ट्स तयार करणाऱ्या कंपन्यांची संख्या मोठी आहे. वाळूज औद्योगिक वसाहतीत लहान-मोठ्या सुमारे १,२०० कंपन्या आहेत. या कंपन्यांना लहान-मोठ्या कामासाठी सारखे पुणे, मुंबई अशा मोठ्या शहरांवर विसंबून राहावे लागायचे, एखादा नवीन पार्ट बनवायचा असेल, तर त्या पार्टचे डिझाईन



**शेंद्रा येथे ५० एकर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन व मेळावा केंद्र विकसित करण्यात येणार आहे.**

तयार करण्यासाठी त्यांना मोठ्या शहरात जावे लागे. त्यात त्यांचा वेळ आणि पैसाही खर्च व्हायचा. या परिस्थितीवर येथील उद्योगविश्व अनेक वर्षांपासून उपाय शोधत होते.

२००४ मध्ये केंद्र सरकारने इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर अपग्रेडेशन स्कीम या प्रकल्पांतर्गत खाजगी सरकारी भागीदारी तत्त्वावर ऑटो क्लस्टर उभारण्याची योजना आणली. औरंगाबादेतील उद्योजकांनी या योजनेंतर्गत औरंगाबादला 'मराठवाडा ऑटो क्लस्टर' उभारण्याचा निर्णय घेतला. केंद्र शासनाच्या या योजनेंतर्गत ऑटो क्लस्टरच्या उभारणीसाठी केंद्र सरकारकडून ५८ कोटी, राज्य सरकारकडून ८ कोटी आणि उद्योजकांचे १५.५ कोटी रुपये असा वाटा निश्चित झाला होता. उद्योजक मंदीच्या संकटातून जात असतानाही त्यांनी ही रक्कम उभारण्याची तयारी दर्शविली. वाळूज औद्योगिक वसाहतीत ५६ हजार चौरस फूट भूखंडावर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. वर्षभरात प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. २०१३ पर्यंत संपूर्ण ऑटो क्लस्टर उभारले जाणार आहे.

औरंगाबाद येथील उद्योजकांनी ५ कोटी रुपये आपले योगदान म्हणून येथील क्लस्टरमध्ये गुंतविले आहेत. तीन टप्प्यांतला प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या उद्योजकांना अजून १० कोटी रुपये गुंतवावयाचे आहेत. औरंगाबादच्या उद्योजकांनी केलेले हे धाडस बघता या महत्त्वाच्या उपक्रमाला ५ कोटी रुपयांचे सरसकट अनुदान देण्याची घोषणा राज्य शासनाने केली आहे. ऑटो क्लस्टरने मराठवाड्यातील उद्योगविश्वाला आता नवी दिशा मिळाली आहे. या क्लस्टरमध्ये जगातील अत्युच्च दर्जाचे रॅपिड ऑटो प्रोटोटाईप मशीन, थ्रीडी लेझर कटिंग मशीन आदी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या मशीनच्या साहाय्याने विविध आकारांतील फेब्रिकेशनची कामे सहज होणार आहेत. टेस्टिंग लेबॉरेटरी, कॅलिब्रेशन फॅसिलिटीज, डिझाईन सेंटर, इंजिनीअरिंग लायब्ररी, डिस्प्ले सेंटर, फिक्स ॲक्सेसिरीज मशीन सेंटर ऑफ एक्सलन्स, रॉ-मटेरियल बॅक आदी सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. या क्लस्टरमुळे लहान-मोठ्या उद्योजकांना त्यांना हव्या त्या भागाचे डिझाईन तयार करून मिळेल. तेथे कॉमन फॅसिलिटी सेंटर स्थापन करण्यात येत आहे. शेवटच्या टप्प्यात येथील व्यापाऱ्यांचा माल जागतिक बाजारपेठेपर्यंत जावा यासाठी ट्रेड सेंटर उभारले जाणार आहे.

### इंडस्ट्रीयल कॉरिडॉर

देशाच्या औद्योगिक विकासासाठी केंद्र शासनाने दिल्ली-मुंबई कॉरिडॉर योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत दिल्ली ते मुंबई मार्गावर ३०० कि.मी. पट्ट्यात येणारी काही शहरे विकसित केली जाणार आहेत. या योजनेचा लाभ मुख्यत: हरयाणा, उत्तरप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांना मिळेल. महाराष्ट्रात धुळे, औरंगाबाद आणि नाशिक या तीन शहरांना दिल्ली-मुंबई कॉरिडॉर योजनेचा लाभ मिळतो आहे. औरंगाबादच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची आणि क्रांतिकारी घटना आहे.

या योजनेंतर्गत औरंगाबाद नजीक बिडकीन ते शेंद्रा आणि शेंद्रा ते करमाड असा औद्योगिक पट्टा विकसित केला जाणार आहे. या पट्ट्यासाठी भूसंपादनाचे काम सुरू झाले आहे. शेंद्रा ते करमाड या पट्ट्यातील ५५६ हेक्टर जमीन संपादित करण्याचे ठरले आहे.

दिल्ली-मुंबई कॉरिडॉर अंतर्गत येणाऱ्या औद्योगिक वसाहतीसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच धुळे ते औरंगाबाद, औरंगाबाद ते नाशिक ही शहरे चौपदरी रस्त्याने जोडली जातील. औरंगाबादसाठी या योजनेचा विशेष फायदा आहे. तो म्हणजे औरंगाबाद येथे या प्रकल्पात कन्व्हेन्शन सेंटर उभारले जाणार आहे.

या प्रस्तावित कन्व्हेन्शन सेंटरचा आराखडा तयार आहे. या केंद्रात औद्योगिक संशोधन, प्रदर्शन, औद्योगिकीरणाविषयी चर्चा, परिसंवाद यासाठी जागा राहील. अनेक मोठे कारखाने औरंगाबादेत येतील. त्याचा लाभ या भागातील लोकांना मिळेल.

### ग्रोथ सेंटर

नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळातर्फे सहा औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यात आलेली आहेत. या औद्योगिक क्षेत्रांपैकी नायगाव तालुक्यातील कृष्णूर हे क्षेत्र केंद्र शासनाच्या 'ग्रोथ सेंटर' या योजनेतून विकसित करण्यात आलेले आहे. जिल्ह्यात सध्या १५०० सूक्ष्म व लघुउद्योग आहेत. सुमारे ४०० कोटी रुपयांची गुंणतवणूक झाली आहे. १८ मध्यम व मोठे उद्योग घटक कार्यरत आहेत. त्यात सुमारे ५५० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. शासनाचे औद्योगिक धोरण २००७ नुसार नांदेड जिल्हा औद्योगिक वर्गीकरणानुसार 'डी प्लस' प्रवर्गात येतो. जिल्ह्यात स्थापित होणाऱ्या उद्योग घटकांना मूल्यकरवर्धीत ५० टक्के परताव्याच्या स्वरूपात अनुदान देण्यात येते.

### नवी झळाळी

अलीकडच्या काळात लातूरने उद्योग विकासाबाबत कात टाकून नवी झळाळी प्राप्त केली आहे. रोजगार हमी योजनेतून लातूरला देशातील पहिले विमानतळ तयार करण्यात आले. तसेच लातूर-कुर्डूवाडी-मुंबई

**आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक उद्योगांबारोबरच कृषीमालावर प्रक्रिया करणारे अनेक उद्योग मराठवाड्यात विखुरलेले आहेत. असे उद्योग स्थापन करण्यासाठी अनेक चांगल्या संधी व्यापक उद्योजकांच्या प्रतीक्षेत आहेत. परभणी जिल्ह्यात कापूस जिनिंग मिल्स, लातूर जिल्ह्यात साखर कारखाने आणि दालमिल, बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यात ऑईल इंडस्ट्री प्रसिद्ध आहेत. जालना हे कृषी उद्योगाचे माहेरघर आहे.**

आणि लातूर-लातूर रोड हा ब्रॉडगेज रेल्वेमार्ग सुरू झाल्याने आणि मुख्य रस्त्यांच्या चौपदरीकरणामुळे दळण-वळण सुविधेत आणखी भर पडली आहे. विशेष औद्योगिक परिक्षेत्रही मंजूर झाल्याने औद्योगिक विकासाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. लातूर जिल्ह्यातील औद्योगिकीकरणाला चालना मिळावी म्हणून तालुक्यांच्या ठिकाणीही एमआयडीसी सुरू झाली. लातूरच्या एमआयडीसीचा देखील विस्तार करण्यात आला आहे.

VIDEOCON
25 YEARS SILVER JUBILEE

लातूर जिल्ह्यामध्ये पायाभूत सोयीसह एम.आय.डी.सी.च्या ५ व सहकारी ३ औद्योगिक वसाहती अशा एकूण ८ औद्योगिक वसाहती सुरू आहेत. या औद्योगिक वसाहतीच्या सुमारे ३ हजार भूखंडांपैकी जवळपास दोन हजार भूखंड वितरित करण्यात आले आहेत. सध्या एक हजार उद्योग जिल्ह्यात सुरू आहेत. लवकरच भेल-महाजेनको यांचा गॅसवर आधारित १६०० मेगा वॅटचा प्रकल्प सुरू होणार असल्याने जिल्ह्याच्या औद्योगिकीकरणाचा आलेख नक्कीच वाढणार आहे. याबरोबरच विशेष अर्थिक क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान पार्क, टेक्सटाईल पार्क यांची कामे सुरू झाली आहेत. जिल्ह्याचे २०३२ पर्यंतचे औद्यागिक विकासाचे व्हिजन तयार करण्यात आले आहे. या व्हिजननुसारच लातूर जिल्ह्याची औद्योगिक विकासाकडे वाटचाल सुरू आहे.

बीड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ व सहकारी औद्योगिक वसाहतीअंतर्गत बीड, आष्टी, पाटोदा, धारुर, परळी व अंबाजोगाई येथे औद्योगिक वसाहती आहेत. या औद्योगिक वसाहतीमध्ये एकूण सुमारे ४५० भूखंडांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यापैकी सुमारे साडेतीनशे भूखंड उद्योजकांना वितरित करण्यात आले आहेत. या भूखंडांवर सुमारे १३० उद्योग सुरू आहेत.

याशिवाय इंजिनीअरिंग वर्कशॉप, स्टोन क्रशर, वीट उद्योग, बेकरी, पेव्हर ब्लॉक्स, प्लॅस्टिक उद्योगाला जिल्ह्यात चांगला वाव आहे. जिल्ह्यात सुमारे २ हजार लघुउद्योगांमध्ये एकूण सुमारे २८० कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. जिल्ह्यात १६ मध्यम व मोठे उद्योग असून त्यातील गुंतवणूक ६२५ कोटी रुपये आहे. याशिवाय ४ मोठे उद्योग प्रस्तावित असून त्यांना परवानेही मिळाले आहेत. लवकरच हे उद्योग सुरू होतील अशी चिन्हे आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील बहुतांशी उद्योग प्राथमिक क्षेत्रातील आहेत, त्यामध्ये कृषी आधारित उद्योगांची संख्या अधिक आहे. उद्योगांच्या वर्गवारीनुसार, जिल्ह्यात सूक्ष्म उद्योगांची संख्या २६६ आहे, त्यामध्ये सुमारे ३३ कोटी तर लघुउद्योगांमध्ये सुमारे १८ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. हे सर्व उद्योग कृषी, अन्नप्रक्रिया व स्थानिक कच्च्या मालावर आधारित आहेत. मोठ्या उद्योगांची संख्या पाच आहे. त्यामध्ये पूर्णा सहकारी साखर कारखाना, बाराशिव सहकारी साखर कारखाना, भाऊराव चव्हाण साखर कारखाना, रोकडेश्वर सहकारी सूत गिरणी आणि भास्कर फूडचा समावेश आहे. या मोठ्या उद्योगांत सुमारे दीडशे कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. जिल्ह्यात एकूण ३ एमआयडीसी आहेत. त्यापैकी हिंगोली एमआयडीसीत २५ उद्योग, वसमत एमआयडीसीत १२ उद्योग आणि कळमनूरी एमआयडीसीत १ उद्योग सुरू आहे. याचबरोबर हिंगोली येथे सहकारी औद्योगिक वसाहत असून तेथे २५ उद्योग कार्यरत आहेत.

Quality Seed
mahyco®
Seed

उस्मानाबाद जिल्ह्यात सध्या उस्मानाबाद, उमरगा, कळंब, भूम, कौडगाव आदी ठिकाणी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. उस्मानाबादेत अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रही विकसित झाले आहे. जे.के. इंडस्ट्रीज, महाभृंगराज, रिंकू पालिकेम आदी महत्त्वाच्या उद्योगांनी या ठिकाणी गुंतवणूक केली आहे. उस्मानाबादपासून जवळच असणाऱ्या कौडगाव येथे १७२ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले असून महाजेनकोमार्फत सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प येथे उभारला जात आहे. उमरगा औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी २१० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून जोगेश्वरी ब्रेवरीज, संतोष फेनोकेम, राजलक्ष्मी पेट्रोकेम असे उद्योग तेथे येत आहेत. उस्मानाबाद तालुक्यातील तेरखेडा गाव हे फटाका उद्योगासाठी प्रसिद्ध असून येथील शिवकाशी हा भागही त्यासाठी प्रसिद्ध आहे. विविध फटाका व्यावसायिकांना एकत्र करून ५५ हेक्टरवर हे फटाका क्षेत्र विकसित करण्यात येत आहे.



उस्मानाबाद जिल्ह्यात मोठ्या व मध्यम प्रकल्पांत सुमारे ४३९ कोटींची गुंतवणूक झाली आहे. बालाजी अमाईन्स, बाम्बे रेयान, कटारे स्पिनिंग मिल या खाजगी संस्थांबरोबरच सहकारी साखर कारखान्यांमुळे आता काही प्रमाणात औद्योगिक क्षेत्र विस्तारले आहे. जिल्ह्यात लघुउद्योगांचीही वाढ मोठ्या प्रमाणात होत आहे. सध्या आठशेच्या आसपास लघुउद्योग आहेत. या उद्योगात सुमारे ८५ ते ९० कोटींची गुंतवणूक झाली आहे. जिल्ह्यात अजून २ हजार लघु प्रकल्प येण्याच्या तयारीत आहेत. त्याद्वारे जवळपास ३११ कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. विमानतळ, रेल्वे आदी सुविधांमुळे हा विकास गतीने होईल, अशी अपेक्षा आहे.

### कृषिपूरक उद्योग

परभणी जिल्ह्यातील कारखान्यामध्ये कापूस जिनिंग मिल्स, दालमिल व तेलगिरण्या अशा प्रकारच्या कृषी उत्पादनाचा कच्चा माल म्हणून उपयोगात आणणाऱ्या कारखान्यांचा मोठा वाटा आहे. भाजीपाला व फळ-फळांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाकरिता कच्चा माल जिल्ह्यात उपलब्ध होऊ शकतो. या जिल्ह्यात दुग्ध व्यवसाय, फळे व भाजीपाला यांच्या उत्पादनवाढीकरिता जिल्ह्यात मूलभूत साधनसामग्री भरपूर आहे. समाधानकारक जलसिंचन व्यवस्था व त्या अनुषंगाने हिरव्या चाऱ्याची उपलबधता तसेच खरीप, रब्बी या दोन्ही हंगामातील ज्वारीच्या पिकापासून विपुल चारा यामुळे दुग्ध व्यवसायाच्या विकासास चालना मिळत आहे. सहकारी संस्थेच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायांच्या विकासाला चालना देण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे.

साखर कारखाने, सॉल्व्हंट एक्स्ट्रॅान्शन प्लान्ट (मोठ्या तेल मिल) हे लातूर जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. ११ साखर कारखाने, ५ सॉल्व्हंट एक्स्ट्रॅान्शन प्लान्ट, ७० ऑईल मिल आणि १४५ दाळ मिल

लातूर जिल्ह्यात यशस्वीरीत्या उद्योग करीत आहेत. जिल्ह्यात सुरू असलेल्या ऑईल मिलमुळे येथील शेतकऱ्यांना फायदा होत असल्याने शेतकरी सोयाबीन, सूर्यफुल, पेंढी अशा तेल उत्पादन करणाऱ्या पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेत आहेत.

बीड जिल्ह्यात ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, कापूस, ऊस, तूर, उडिद, मूग आदी पिके घेतली जातात. तसेच पशुधनाची संख्याही मोठ्या प्रमाणात असल्याने पशुधन आधारित पशुखाद्य, टॉनरी, चमड्याच्या वस्तू उत्पादनास बीड जिल्ह्यात वाव आहे. शेती आधारित पोल्ट्री फार्म, डेअरी, जिनिंग व प्रेसिंग, खवा उत्पादन, ऑईल मिल, दाल मिल, गुळ उत्पादन या उद्योगास जिल्ह्यात चांगला वाव आहे. बीड येथील औद्योगिक वसाहतीमध्ये गजानन रिफायनरी व ऑईल इंडस्ट्रीज हा जवळपास दीड कोटी रुपये गुंतवणूक असलेला उद्योग सुरु आहे. या कारखान्यात सोयाबीन, सरकी व सूर्यफुलापासून रिफाईंड तेल तयार करण्यात येते. त्याचबरोबर जिल्ह्यात पशुधन मोठ्या प्रमाणात असून खाजगी व शासकीय अशा ५४५ दूध संकलन केंद्रामार्फत दररोज जवळपास पावणे दोन लाख लिटर दूध संकलित केले जाते.

उस्मानाबाद जिल्ह्यातल्या भूम तालुक्यात पारंपरिक दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. खवा निर्मिती उद्योगही तेथे मोठ्या प्रमाणात आहे. मात्र हा असंघटीत आहे. सध्या त्याला जिल्हास्तरावर एकत्रित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या औद्योगिक क्षेत्रात मिनरल वाटर आणि



दूध प्रक्रिया केंद्रही सुरू होत आहे. पुष्पसंवर्धन उद्यानासाठी चोराखळी येथे भू-संपादन करण्यात येत आहे. त्यातून फूल लागवडीचा यशस्वी प्रकल्प लवकरच आकार घेईल. नांदेड जिल्ह्यात एकूण उद्योग घटकांपैकी बहुतेक उद्योग हे अन्नप्रक्रिया व कृषी मालावर आधारित आहेत. हिंगोली जिल्हयात सध्या कृषी प्रक्रिया उद्योग फारसा उल्लेखनीय नसला तरीही विशेषत: केळी व हळद प्रक्रिया उद्योगांना येथे अधिक वाव आहे.

जालना हे बियाणांचे कोठार किंवा पंढरी म्हणून सध्या ओळखले जाते. उच्च दर्जाच्या बियाणे उत्पादनामुळे जालन्यास जगभरात लौकिक प्राप्त झाला आहे. बियाणे उद्योगाची सुरुवात १९६४ मध्ये झाली. पद्मभुषण बद्रीनारायण बारवाले यांनी प्रथम महिको हायब्रीड सिडचे उत्पादन सुरु केले. त्यानंतर सध्या बियाणे उत्पादनाचे १८ उद्योग येथे सुरु आहेत.

हिंगोली जिल्ह्यात वसमत येथे सध्या टेक्स्टाईल पार्कच्या उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून सुमारे ६ कोटी रुपये व राज्य शासनाकडून सुमारे ३ कोटी रुपये असा निधी प्राप्त झाला आहे. येथे सध्या दोन कापड उद्योगांचे उत्पादन सुरु झाले आहे. उर्वरित पावर-लूम व गारमेन्ट् घटकांच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. साधारण २०० उद्योग येथे सुरू होणार आहेत. बीड जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन घेतले जाते. केंद्र सरकारच्या धोरणानुसार माजलगाव येथे टेक्सटाईल पार्क करण्याचे प्रस्तावित आहे.

❑ ❑

## दमदार झेप

**(पान ३५ वरून)**

**कृषिमाल व प्रक्रिया :** नाशिक परिसरातील शेती अतिशय संपन्न व वैविध्यपूर्ण आहे. इगतपुरीमध्ये भात तर नांदगावमध्ये बाजरी व सर्व प्रकारची पिके होतात. आशिया खंडातील सर्वात मोठ्या कांद्याच्या बाजारपेठा याच ठिकाणी आहेत. देशातील कांदा उत्पादनापैकी ७० ते ८० टक्के उत्पादन नाशिक जिल्ह्यात होते तर निर्यातीत नाशिकचा वाटा ९० टक्के आहे. दरवर्षी नाशिक जिल्ह्यातून १,५०० ते २,००० कंटेनर द्राक्षे परदेशात जातात. त्यांचा देशातील निर्यातीत ८० टक्के सहभाग आहे. राज्यातील एकूण वाईन निर्मिती उद्योगांपैकी ३२ वायनरी या एकट्या नाशिक जिल्ह्यात असून जागतिक बाजारपेठांमध्ये नाशिकची वाईन प्रसिद्ध आहे. (सुला, विंचूरा, सिरमा, हिव्हेरो यांचा क्रमांक महत्त्वाचा आहे).

**महत्त्वाच्या संस्था :** नाशिक शहरात व लगत क्षेत्रात अतिशय महत्त्वाच्या अशा प्रमुख संस्था आहेत. हिंदुस्थान एरॉनॉटिक्स लिमिटेड ही भारताच्या संरक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे. मिग, सुखोई विमानाची निर्मिती याच ठिकाणी होते. मुद्रांक व चलनी नोटांची छपाई इंडियन सिक्युरिटी प्रेस व करन्सी नोट प्रेस या ठिकाणी होते. देवळाली येथे आर्टिलरी सेंटर आहे. वीजनिर्मितीचे एकलहरे हे प्रमुख ठिकाण आहे. शिवाय महाराष्ट्र पोलीस अकादमी ही नाशिक शहरातच आहे.

**३) शैक्षणिक सुविधा :** यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, मराठा विद्या प्रसारक संस्था यांचा उल्लेख करावा लागेल.

**४) विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) :** नाशिकपासून २५ कि.मी. अंतरावर सिन्नर या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व मे. इंडिया बुल्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती होत आहे. प्रामुख्याने वीज निर्मितीचे काम सध्या सुरू आहे. या ठिकाणी गुंतवणूकदारांना चांगल्या संधी उपलब्ध आहेत. वरील उल्लेख केलेल्या बाबींशिवाय सध्या मुंबई-नाशिक रस्त्याचे सहा पदरीकरण तसेच नाशिक-पुणे रस्त्याचे चौपदरीकरण शिवाय पुणे-नाशिक प्रस्तावित रेल्वेमार्ग, पाण्याची उपलब्धता व विविध औद्योगिक संघटनांचा सकारात्मक दृष्टिकोन या सर्व गोष्टींचा सुरेख संगम याच परिसरात असल्याने अनेक गुंतवणूकदार या ठिकाणी व्यवसाय सुरू करण्यासाठी उत्सुक आहेत व सध्या उद्योग उभारणीही करीत आहेत.

❑ ❑



# स्टील सिटी...

● यशवंत भंडारे

जालना शहर हे समृद्ध व्यापारी परंपरा असलेलं. परंतु १९६० नंतर या शहरानं उद्योगाचं शहर म्हणून लौकिक मिळविला आहे. १९६० पूर्वी जालना ही भुसार मालाची राज्यातील मोठी बाजारपेठ होती. जालना शहरात १९०२ मध्ये बगडीया परिवारानं किल्ला जिनिंग ही मिल सुरू केली. बगडीया परिवाराची तिसरी पिढी ती आजही चालवत आहे. जालन्यातूनच १९५२ मध्ये डाळ उत्पादनातील बजरंग दाल या पहिल्या ब्रँडची स्थापना झाली. ही दालमिलही सध्या उत्तमपणे सुरू आहे.

जालन्यास स्टील सिटी ऑफ इंडिया म्हणून संबोधलं जातं. जालन्यात १९७० च्या दशकात पहिला स्टील उत्पादनाचा कारखाना सुरू झाला. त्यानंतर स्टील आणि रोलींग मिलची संख्या वाढतच गेली आहे. आजघडीला ४९ स्टील आणि रोलींग मिल कार्यरत आहेत. यात उत्तम दर्जाचे स्टील एवढेच नव्हे, तर जागतिक दर्जाचं स्टील तयार केलं जातं. विशेष म्हणजे महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या विविध भागांतून जालन्याच्या स्टीलला मोठी मागणी आहे. या उद्योगात ७५४४.१७ लाख रुपयांची गुंतवणूक झाली आहे. सध्या प्रत्यक्षात १४५५ कामगार काम करीत असून, अप्रत्यक्षरीत्या २५ हजारांवर लोकांना काम देणारा हा उद्योग ठरला आहे.

जिल्ह्यात कॉटन जिनिंग व प्रेसिंगचे ६०, दाल मिल ३५, ऑईल मिल २५, सोयाबिन ऑईल पाच, सोया प्रॉडक्ट पाच, मिरची मसाले २५, प्लास्टीक प्रॉडक्टस् २५, सिमेंट प्रॉडक्टस् २६, स्टील फर्निचर / फॅब्रीकेशन ४०, फूड प्रॉडक्टस् २०, स्पिनिंग मिल चार, ऑईल रिफायनरी चार आणि इतर उद्योग ८० आहेत. यात अपेक्षित सेक्टरनिहाय या उद्योगांची एकूण संख्या ३५४ आहे. या उद्योगांतील एकूण गुंतवणूक ३३८० लाख रुपयांची आहे, तर या सर्व उद्योगांमध्ये ३ हजार ४०३ कामगार काम करीत आहेत.

जालना जिल्ह्याची निर्मिती १९८१ मध्ये झाली. त्यापूर्वी या जिल्ह्याचा औरंगाबाद जिल्ह्यात समावेश होता. १९६२ ते १९७० दरम्यान जालन्यात औद्योगिक वसाहतही अस्तित्वात आली नाही. परंतु १९७२ मध्ये जुन्या जालन्यामध्ये औद्योगिक वसाहत विकासित करण्यात आली. सध्या या औद्योगिक वसाहतीत ६२ उद्योग सुरू आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जालना शहराजवळच जालना-औरंगाबाद महामार्गावर औद्योगिक वसाहतीचा पहिला टप्पा १९७६ मध्ये विकसित केला. जालना येथे दुसरा औद्योगिक वसाहतीचा टप्पा २००४ मध्ये विकसित करण्यात आला आहे. याशिवाय भोकरदन येथे १९८१ ते १९९० या कालावधीत औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात आली. सध्या भोकरदन औद्योगिक वसाहतीत आठ ते दहा उद्योग सुरू आहेत. तसेच १९९१ ते २००० या कालावधीत जाफराबाद (१९९५), परतूर येथे (१९९५) व अंबड येथे (२०००) औद्योगिक वसाहत विकसित करण्यात आली आहे. अंबड येथे चार उद्योग सुरू आहेत. या सर्व औद्योगिक वसाहतींत सीएफसी, रस्ते, पाणी, स्ट्रीट लाईट एमआयडीसीने उपलब्ध करून दिली आहे. जालना येथे एमआयडीसीतर्फे तिसऱ्या टप्प्यासाठी जमीन अधिग्रहण करण्यात आली आहे.

राज्यात सर्वाधिक विशाल प्रकल्प जालना येथे आहेत. विशेष म्हणजे औरंगाबादनंतर सर्वाधिक औद्योगिक विकास झालेला दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा म्हणून जालन्याचा उल्लेख करता येईल. जालना येथील विशाल प्रकल्पाचेही खास वैशिष्ट्य आहे. प्रामुख्याने इतर ठिकाणच्या विशाल प्रकल्पातील गुंतवणूक लक्षात घेतली जाते. येथे मात्र उद्योगातील रोजगाराची क्षमता विचारात घेतली आहे. येथे सध्या पाच विशाल प्रकल्प सुरू आहेत. लवकरच १० विशाल प्रकल्प येथे सुरू होत आहेत. उद्योगांमध्ये १०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून, या प्रत्येक उद्योगात २५० पेक्षा अधिक कामगार काम करीत आहेत. त्यामुळे अशा विशाल प्रकल्पांची संख्या वाढत आहे. या माध्यमातून ८,००० कोटींपेक्षा अधिकची गुंतवणूक होणार आहे. यात सुमारे १२०० जणांना थेट रोजगार मिळणार आहे. मोठ्या उद्योगांबरोबरच २६ हजार २८८ छोटे उद्योग प्रस्तावित आहेत. यात ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात २०११-१२ मध्ये राबविण्यात आलेल्या उद्योजकता विकास अभियानात २४०० तरुणांना शास्त्रशुद्ध पद्धतीचे रोजगार व स्वयंरोजगाराबरोबरच उद्योजक निर्मिती करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. १२५० जणांना उत्पादनासाठी आवश्यक लघु उद्योग नोंदणी देण्यात आली आहे. विविध महामंडळातील या तरुण-तरुणींना उद्योगासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. १५२ लाभार्थ्यांनी स्वत:कडील गुंतवणूक करून उद्योग सुरू केले आहेत.

जालना येथील पहिल्या टप्प्यातील औद्योगिक वसाहतीत बी.टी. पार्क अर्थात बायोटेक्नॉलॉजी पार्क विकसित करण्यात आले आहे. या पार्कवर ४५ गाळे विकसित केले आहेत. हे गाळे उद्योजकांना उपलब्ध करून दिले आहेत. त्यापैकी १३ गाळे शिल्लक असून, सध्या १५ उद्योग प्रत्यक्ष सुरू झाले आहेत तर काही उद्योग सुरू होण्याच्या प्रक्रियेत आहेत.


जालना हे बियाणांचे कोठार किंवा पंढरी म्हणून सध्या ओळखले जाते. उच्च दर्जाच्या बियाणे उत्पादनामुळे जालन्यास जगभरात लौकिक प्राप्त झाला आहे. बियाणे उद्योगाची सुरुवात १९६४ मध्ये झाली. पद्मभूषण बद्रीनारायण बारवाले यांनी प्रथम महिको हायब्रीड सीडचे उत्पादन सुरू केले. त्यानंतर सध्या बियाणे उत्पादनाचे १८ उद्योग येथे सुरू आहेत. स्टील आणि शेतीपूरक उद्योगांबरोबरच १९८० च्या दशकात जालन्यात इंजिनीअरिंग कारखान्याचीही सुरुवात झाली. एन.आर.बी. बेअरिंग हा येथील पहिला इंजिनीअरिंगचा उद्योग होय. सध्या हिंदुस्तान फेरेडो, अॅग्रो कॉर्प, विनोदराय इंजिनीअरिंग या कंपन्यांनी जगाच्या नकाशावर आपली ओळख निर्माण केली आहे. विशेष म्हणजे हे सर्व उद्योग स्थानिक उद्योजकांच्या कौशल्यातून साकार झाले आहेत.

**संपर्क : ९८६०६१२३२८**

# झेप कोल्हापूरची

**केंद्रीय वाणिज्य मंत्री आनंद शर्मा यांनी नुकत्याच जाहीर केलेल्या आयात-निर्यात धोरणात कोल्हापूर शहराला निर्यातप्रधान शहराचा दर्जा दिला आहे. कोल्हापुरातील अनेक गोष्टींना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगली संधी आहे. त्यात प्रामुख्याने शेतीमालाचा समावेश आहे. साखर, गूळ, कापड, चप्पल, काजू आणि दुग्धजन्य पदार्थ यांना मागणी आहे. देशाला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून देण्याची क्षमता या पदार्थांत आहे. कोल्हापूरला मिळालेल्या निर्यात प्रधान शहराच्या दर्जामुळे निर्यातीसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा वाढतील.**

कोल्हापूर जिल्हा उद्योग, व्यापार, गुंतवणूक आणि सेवा क्षेत्र या सर्वच आघाड्यांवर प्रगती करीत आहे. कोल्हापूर शहर आणि जिल्ह्याचे भौगोलिक स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. कारण कोल्हापूर शहरापासून मुंबई, हैदराबाद, बंगळुरू, नाशिक, औरंगाबाद या महत्त्वाच्या शहरांत सरासरी आठ ते दहा तासांच्या प्रवासात पोहोचता येते. त्याचबरोबर पुणे, पणजी, सोलापूर ही महत्त्वाची शहरे पाच ते सहा तासांच्या अंतरावर आहेत. कोल्हापूर शहराला कृषी संस्कृतीचा वारसा आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूरच्या विकासासाठी उभ्या केलेल्या पायाभूत सुविधा कोल्हापूरच्या विकासात आजही महत्त्वाचे योगदान देत आहेत. जलसिंचन, व्यापार, उद्योग, दळणवळण या क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कार्याच्या जोरावरच आजच्या कोल्हापूरने प्रगती केली आहे.



कोल्हापूर जिल्हा आणि शहर गेल्या २० वर्षांपू-र्वी उत्पादनाच्या क्षेत्रात प्रसिद्ध होते आणि आजही आहे. मोठ्या उद्योगांना लागणारे सुटे भाग निर्मिती करणारे उद्योग कोल्हापुरात होते. त्याचबरोबर शेती आणि शेतीवर आधारित उद्योगांना यंत्रसामग्री निर्मिती करणारे उद्योगही येथे होते. पण, अलीकडच्या काळात कोल्हापूरचे उद्योग क्षेत्र कृषी, उत्पादन, वस्त्रोद्योग, औषध निर्मिती, सेवा उद्योग आणि बांधकाम अशा विविध क्षेत्रांत विस्तारले आहे. औद्योगिक विकासाबरोबरच कोल्हापूर शहराला धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरा आहे. त्यामुळे पर्यटन उद्योगही कोल्हापुरात चांगलाच मूळ धरीत आहे.

फौंड्री उद्योगासाठी पूर्वीपासूनच कोल्हापूर प्रसिद्ध आहे. पुण्यात असणाऱ्या वाहन निर्मिती उद्योगांना सुटे पार्ट पुरवण्याचा फौंड्री व्यवसाय आहे. क्लस्टरच्या माध्यमातून फौंड्री व्यवसाय अधिक कार्यक्षम आणि स्पर्धेत टिकण्यासाठी आवश्यक ते बदल करून घेत आहे.

आजरा तालुक्यातील काजू उद्योग, इचलकरंजीतील वस्त्रोद्योग साऱ्या देशभरात प्रसिद्ध आहे.

कागलनजीक विकसित झालेल्या पंचतारांकित एमआयडीसीमध्ये आणि हातकणंगले तालुक्यातील एमआयडीसीमध्ये मोठ्या प्रमाणावर वस्त्रोद्योग विकसित झाला आहे. कागलमध्ये युरोटेक्स, इंडोकाऊंट, रेमंड, ओसवाल अशा अनेक कंपन्या आल्या आहेत. अमित स्पिनिंग आणि मौटी या कंपन्याही कार्यान्वित आहेत. कोल्हापुरातील मोहिते उद्योग समूहाने उभारलेल्या अभिषेक मिल्सच्या माध्यमातूनही रोजगार निर्मिती झाली आहे. वस्त्रोद्योगाबरोबरच कागल-हातकणंगले वसाहतीत किर्लोस्कर ऑईल इंजिन, वर्धमान पॉलिटेक्स, अन्शुल स्टील, मेनन अल्कोप, विल्सन्स रूफींग, पल स्पॉन्ज आयर्न, लाहोटी ओव्हरसीज, घाटगे-पाटील इंडस्ट्रीज यांसारख्या मोठ्या कंपन्या आहेत. येत्या पाच वर्षांत या परिसरात सुमारे ५,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. त्यातून सुमारे २५,००० लोकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

पारंपरिक उद्योग व्यवसायाबरोबरच कागल-हातकणंगले नियोजित आय.टी. पार्कसाठी सुमारे ५० एकर जागा राखीव ठेवण्यात आली आहे. या आय.टी. पार्कमध्ये पहिल्या टप्प्यात सुमारे २०० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. हुपरीतील चांदी व्यवसायही असाच देशभरात प्रसिद्ध आहे. चांदी कारखानदारी उद्योग आणि निवास अशा एकत्र पद्धतीने चालत असल्यामुळे हुपरीनजीकच्या औद्योगिक वसाहतीत ७५ एकर जागेवर सिल्व्हर पार्क वसाहत निर्माण केली आहे. या वसाहतीमुळे चांदी व्यवसायात एक प्रकारची सुसूत्रता आणि अधिक व्यावसायिकता येण्याची अपेक्षा आहे.

**– रवींद्र राऊत**

**संपर्क : ९८६७४२५८२०**

## वेगळी वाट



औद्योगिक विकासासाठी फार पोषक वातावरण नाही, घरामध्ये यापूर्वी प्रिंटिंगशी संबंधित कोणीही काम केलेले नाही, अशा प्रकारे पूर्णपणे वेगळ्या वाटेवर स्वकष्टाने स्वत:चा उद्योग नावारूपाला आणलेल्या सौ. श्वेता सुधाकर कुडाळकर या यशस्विनीची यशोगाथा अनेक नवउद्योजकांना प्रेरणादायी ठरणारी आहे. त्या मूळच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील कुडाळ येथील आहेत.

सौ. श्वेता कुडाळकर यांनी कोणत्याही प्रकारची उच्च पदवी घेतलेली नसली तरी त्यांना आपण काहीतरी वेगळे करू शकतो याचाच एक ध्यास लागलेला होता. प्रिंटिंगचा व्यवसाय सुरू करण्याचा ध्यास मनात बाळगून जिल्हा उद्योग केंद्र सिंधुदुर्गकडे व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज मिळू शकते का याची खात्री करून त्याप्रकारे प्रस्ताव सादर केला. सौ. श्वेता कुडाळकर यांनी जानेवारी २००७ मध्ये जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत बीज भांडवल योजनेंतर्गत रु. ४.०० लाख रकमेचा कर्जप्रस्ताव केला. महाराष्ट्र बँक, शाखा कुडाळ यांनी रु. ३.६२ लाख प्रकल्प खर्च मंजूर केला. जुलै-२००७ मध्ये त्यांनी प्रिंटिंग उद्योग सुरू केला. डिजिटल फ्लेक्स बोर्ड प्रिंटिंग, डिजिटल साईन बोर्ड्स, रेडियम नेमप्लेट्स इ. कामे या उद्योगात केली जातात.

औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागात उद्योग स्थापन करून त्या परिसराच्या विकासामध्ये सौ. श्वेता कुडाळकर यांनी हातभार लावला आहे. त्यांच्या या यशाची दखल घेऊन राज्य शासनाच्या उत्कृष्ट लघु द्योजकांसाठी जिल्हा पुरस्कार योजनेंतर्गत सौ. श्वेता कुडाळकर यांना २०११ सालचा प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

**– संध्या गरवारे**



# सांगलीची द्राक्षे

द्राक्ष म्हटलं की सांगली जिल्ह्याचे नाव हमखास तोंडात येते. जगामध्ये सांगलीच्या द्राक्षाने नाव कमविले असून विशेषत: लंडन, दुबई, वॉशिंग्टनमधील नागरिक या द्राक्षांची आतुरतेने वाट पाहत असतात. हा नावलौकिक तयार करायला सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी जीवतोड मेहनत केली आहे. आज सांगली जिल्ह्यात एक लाख एकर क्षेत्रावर द्राक्षाचे उत्पादन घेतले जात असून सोनाका, तासगाव चमन, शरद सिडलेस या जाती प्रसिद्ध झाल्या आहेत. २ लाख ४० हजार मे. टन उत्पादन गेल्या वर्षी जिल्ह्यामध्ये झाले होते. गेल्या वर्षी ८०२ कंटेनरमधून अंदाजे ६ हजार २५१ टन द्राक्षाची निर्यात युरोपिय बाजारपेठेत झाली. दरवर्षी साधारणपणे ७०० ते ८०० कोटींची उलाढाल द्राक्ष उत्पादनात होते.

**बेदाणा निर्मिती**

देशामध्ये सांगली जिल्हा हा बेदाणा निर्मितीचे प्रमुख केंद्र बनू लागला आहे. गेल्या वर्षी अंदाजे ८५ हजार टन बेदाण्याची निर्मिती झाली असून, या जिल्ह्यामध्ये ६०च्या आसपास बेदाणे निर्मितीचे कोल्ड स्टोरेज उभारण्यात आले आहेत.

बेदाणा निर्मितीच्या व्यवसायामुळे तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळू लागला आहे व शासनालाही या व्यवसायातून भरघोस उत्पन्न मिळू लागले आहे. दरवर्षी या धंद्यात १ हजार कोटींच्या आसपास उलाढाल होत आहे.

**वस्त्रोद्योग**

वाळवा तालुक्यातील इस्लामपूर येथे मोठ्या प्रमाणावर वस्त्रोद्योगनगरी उभारण्यात आली असून तेथे विविध प्रकारचे होजिअरी तसेच टी शर्ट, शर्टिंगची उत्पादने निघू लागली आहेत. तसेच पलूस, तासगाव, विटा या ठिकाणी सहकाराच्या माध्यमातून सूतगिरण्यांनी चांगलीच प्रगती केली आहे. सांगलीजवळ अलकूड-मणेराजुरी औद्योगिक वसाहत उभी करावी अशी तेथील मागणी व्यापाऱ्यांची मागणी आहे. आज जिल्ह्यात म्हैसाळ, ताकारी, टेंभू यांसारख्या अत्यंत मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी पाणी योजना कार्यरत झाल्या आहेत. योग्य नियोजनाने आणि प्राधान्यक्रमाणे योजनांचे पाणी जिल्ह्यातील दुष्काळी भागात फिरले तर या भागातील उत्पन्न प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. मका, हळदीची लागवड वाढणार आहे. पुढच्या ३०-४० चाळीस वर्षांचा विचार करून या भागात ही औद्योगिक वसाहत उभी राहिली तर जिल्हा कृषी उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्रात प्रचंड झेप घेऊ शकतो.

**– सुरेश पाटील**
माजी महापौर, सांगली

❑ ❑

## केशर कथा

**(पान २८ वरून)**

जगातील औषधी कंपन्या आणि केशराचा वापर करणाऱ्या संस्था ह्यांना काश्मिरी केशराचे महत्त्व माहीत आहे पण शेतकऱ्यांच्या अगतिकतेचा व संघटित प्रयत्नांचा अभाव लक्षात घेऊन व्यापारी तत्त्वाने शेतकऱ्यांना कमीतकमी भाव देता येईल व स्वत:कडे जास्त नफा कसा ओढता येईल याचा पद्धतशीर सापळा रचला होता. शेतकऱ्यांची दयनीय परिस्थीती लक्षात घेऊन मॅग्नम फाउंडेशनद्वारा काश्मिरी केशराची थेट ग्राहकास विक्री हा आगळा वेगळा उपक्रम राबविणे सुरू केले. यापूर्वी काश्मिरी केशर शुद्ध स्वरूपात भारतीय ग्राहकांत उपलब्ध होणे दुरापास्त होते. केशराच्या नावाखाली तृतीय व चतुर्थ दर्जाचे आयातीत केशर भेसळ करून भारतीय ग्राहकास विकल्या जात होते. मॅग्नम फाउंडेशनने चळवळीत येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करून त्यांचे सुव्यवस्थित व्यवस्थापन केले. सोबत शुद्ध केशराची माहिती पुरविली तसेच १००% शुद्धतेची हमी ग्राहकास दिली. या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी संस्थेला भरपूर वेळ, शक्ती, व पैसा खर्ची घालावा लागला. पण सरते शेवटी ग्राहक व शेतकऱ्यांचे सरळ संबंध प्रस्थापित झाल्याने त्याचा लाभ शेतकरी व ग्राहकांना झाला. शेतकरी व ग्राहक भागीदारीचा व्यापारी दुरूपयोग होऊ नये म्हणून मॅग्नम फाउंडेशनद्वारा स्वत:ची विक्री व्यवस्था उभरण्यात आली. संस्थेशिवाय अन्यत्र कुठेही हे शुद्ध काश्मिरी केशर विक्रीस ठेवले नाही. भारतातील कुठल्याही कोपऱ्यातील ग्राहक फोनद्वारे केशर विकत घेऊ शकतात व त्यांना त्वरित शुद्ध केशर देण्याची व्यवस्था मॅग्नम फाउंडेशनद्वारा केली जाते.

आज काश्मिरात पिकणारे हे केशर त्याच्या शुद्ध स्वरूपात महाराष्ट्रात उपलब्ध आहे. मॅग्नम फाउंडेशनचा हा उपक्रम म्हणजे 'दुधात केशर'च जणू!



**– टीम लोकराज्य**

❑ ❑

**संपर्क : ॲड. पुष्पा शिंदे, मॅग्नम फाउंडेशन, नागपूर, ०९४२२१०४७५१**

# संधी आणि समृद्धी

राज्य शासनाने आजवर अनेक प्रकारे उद्योजकांना मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी अनेक योजनादेखील राबविल्या. राज्य शासनाच्या विविध उद्योजकस्नेही धोरणांमुळे, महाराष्ट्राची मोठीच औद्योगिक प्रगती झाली आहे. अर्थात, अलीकडच्या काळात जागतिक मंदीचा फटका भारताप्रमाणेच महाराष्ट्रालाही बसला आहे. औद्योगिक गुंतवणूक कमी झाली आहे. मात्र त्यामागे अन्यही काही कारणे आहेत. वस्तुत: महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण अतिशय पुरोगामी आणि उद्योग व्यवसायांना अतिशय अनुकूल असेच आहे. म्हणूनच फारसा गाजावाजा होत नसला तरी नवनवीन उद्योग येथे उभे राहात आहेत आणि त्यातून रोजगार निर्मितीदेखील होत आहे. गेल्या १० वर्षांत देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक रोजगार निर्मिती महाराष्ट्रातच झाली आहे. चांगल्या पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि चांगली सामाजिक परिस्थिती, किंबहुना सामाजिक आणि औद्योगिक सौहार्द यामुळेच महाराष्ट्रात, गेल्या १० वर्षांत सर्वांत जास्त म्हणजे सुमारे ६ लाख ९५ हजार ५१६ कोटी रुपये गुंतवणुकीचे १६१४० प्रस्ताव आले. त्यातून ३० लाख रोजगारांची निर्मिती झाली.

केंद्र शासनाने गेल्या २० वर्षांपासून आर्थिक उदारीकरण आणि खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. त्यामुळे उद्योगव्यवसायाचे जागतिकीकरण भारतात अवतरणे अटळच होते. या नव्या धोरणामुळे, आतापर्यंत फक्त सार्वजनिक क्षेत्रासाठीच राखीव असलेले उद्योग आणि उत्पादने खाजगी क्षेत्रांसाठीदेखील उपलब्ध झाली. त्यातूनच देशातील खाजगी गुंतवणुकीबरोबरच विदेशी थेट गुंतवणुकीसाठीसुद्धा भारतीय उद्योगांची दारे उघडली गेली. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नुकत्याच जाहीर केलेल्या विदेशी गुंतवणूक धोरणामुळे हवाई वाहतूक आणि किरकोळ व्यापाराबरोबरच प्रसिद्धीमाध्यमातही थेट विदेशी गुंतवणुकीस मोठ्या प्रमाणावर वाव मिळणार आहे. अशा गुंतवणुकीमुळे देशातील उद्योग व्यवसायांना मोठी चालना मिळणार आहे, त्यातून अधिकाधिक रोजगार निर्मिती होण्याची शक्यता आहे.



**राज्यात अनेक ठिकाणी १०० पेक्षा जास्त सहकारी औद्योगिक वसाहतींमधून सात हजारांवर लहान-मोठे उद्योग उभे राहिले आहेत. त्यामुळे सुमारे सव्वा लाख लोकांना रोजगार मिळाला. किमान ४५० अब्ज रुपयांची उलाढाल झाली. हा आकडा अधिक मोठाही असू शकतो. कारण राज्य सरकारच्याच एका पाहणीनुसार महाराष्ट्रातील विविध उत्पादक आणि सेवा उद्योगात १० लाखांहून अधिक रोजगार आहेत. त्यातून दरवर्षी सुमारे दीड लाख कोटी रुपयांची मूल्यवृद्धी होते.**

### रोजगाराभिमुख धोरण

महाराष्ट्रात रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे आणि नवीन उद्योगांची स्थापना वा विस्तार करणे, यासाठी उद्योजकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. त्या अंतर्गत राज्यात विविध ठिकाणी सहकारी औद्योगिक वसाहती विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे तसेच भागभांडवलात भागीदारी करणे, उद्योगांना तांत्रिक सल्ला देणे आणि मार्गदर्शन करणे असे विविध प्रयत्न राज्य शासनाने केले.




### तंत्रशिक्षणात आघाडी

महाराष्ट्र राज्य शिक्षणात आघाडीवर आहे ही बाब निर्विवाद आहे; आणि महाराष्ट्राकडे अनेकविध उद्योग आकर्षित होण्याचे तसेच अन्य राज्यांच्या मानाने येथे औद्योगिक शांतता असण्याचे कारणच मुळी तंत्र शिक्षणातील प्रगती हेच आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यातील उद्योगवाढीसाठी अधिकाधिक गुंतवणुकीची गरज असल्याचे जसे मान्य केले आणि औद्योगिक धोरण आखले, तसेच वाढत्या औद्योगिकीकरणासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे हेही ओळखले. त्यामुळेच आज महाराष्ट्रात अभियांत्रिकीचे विविध स्तरावरील शिक्षण प्रशिक्षण देणाऱ्या दीड हजारांच्या आसपास शासनमान्य शिक्षण संस्था कार्यरत आहेत. यातून प्रतिवर्षी काही लाख प्रशिक्षित मनुष्यबळ विविध उद्योगांना उपलब्ध होते. याशिवाय कुशल, अर्धकुशल तांत्रिक मनुष्यबळ घडविणाऱ्या हजारो खाजगी शासनमान्यता नसलेल्या संस्था राज्यभर पसरलेल्या आहेत. यातून बाहेर पडणाऱ्यांचे प्रमाणीकरण करण्याच्या हेतूने वेगवेगळ्या पातळ्यांवरील परीक्षा राज्य शासन घेत असते. राज्य शासनाचे हे सर्व कार्यक्रम उद्योगपूरकच आहेत.

महाराष्ट्र शासनाने अलीकडेच एक अभिनव उपक्रम राबविला उद्योग आणि शिक्षणसंस्थांची परस्पर भागीदारी. यामुळे संबंधित उद्योगांना त्यांना हवे असलेले कुशल अर्धकुशल कामगार रोजगाराभिमुख पद्धतीनेच प्रशिक्षित करून मिळू लागले. उद्योगांचा कामगार प्रशिक्षणावरील खर्च कमी झाला, तर शिक्षण संस्थांची आर्थिक चणचण कमी झाली. यातून रोजगार निर्मितीचे नवे पर्व सुरू झाले.

### औद्योगिक वसाहती

उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच, त्यांना अपेक्षित चालना देण्यासाठी, केंद्र शासनाच्या धोरणांच्या अधीन राहून, महाराष्ट्र

शासनाने अनेक अभिनव योजना अंमलात आणल्या. राज्याच्या औद्योगिक धोरणातील विविध बाबींचा नुसता आढावा जरी घेतला तरी हे आपल्या ध्यानात येईल. जगभर व्यवहारात असलेल्या 'बांधा, वापरा, हस्तांतर करा' (बी. ओ. टी.) किंवा 'बांधा, वापरा, मालकी घ्या' (बी. ओ. ओ.) या धोरणांना अनुसरून महाराष्ट्र शासनाने राज्यात अनेक ठिकाणी औद्योगिक वसाहती (इंडस्ट्रीयल पार्क) उभारण्यास मदत केली. यातून राज्यात संगणक आधारित शेकडो लहान-मोठे उद्योग उभे राहिले. त्यामुळे अनेकांना रोजगार मिळाला.

**सर्वसमावेशक धोरण**

महाराष्ट्र सरकारचे विद्यमान औद्योगिक धोरण केवळ सर्वसमावेशकच नव्हे, विविधांगी असून बड्या भांडवलदारांपासून लहान गावातल्या लहान उद्योजकापर्यंत सर्वांनाच प्रोत्साहन देणारे आहे. भविष्याचा वेध घेण्याचीही या धोरणात ताकद आहे. ह्या औद्योगिक धोरणांतर्गत शेतकऱ्यांनाही उद्योजकच नव्हे, तर निर्यातदार होण्याचीही संधी मिळण्यासारखी आहे. अर्थात, हाताशी येणाऱ्या संधीचे स्वागत कसे करायचे आणि समृद्धीच्या मार्गाने जायचे किंवा नाही हा निर्णय प्रत्येक गुंतवणूकदारानेच घ्यायचा आहे. शेतकऱ्यांनी गटशेती करून निर्यातक्षम शेतमाल उत्पादन केले तर, साखर कारखान्यांप्रमाणेच या शेतकरी उद्योजकांनाही काही प्रमाणात भांडवल पुरविण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. खरे म्हणजे सहकारी औद्योगिक वसाहतींना प्रोत्साहन देण्यामागे शेतकऱ्यांनीच उद्योजक आणि निर्यातदार व्हावे हाच सरकारचा उद्देश होता. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र सरकारने जैव-तंत्रज्ञान (बायो-टेक्नोलॉजी) धोरण आखले. राज्यातील शेती आणि शेतकरी, पशुपालक आणि पशुधन, पर्यावरण रक्षण आणि पोषण - संवर्धन, आरोग्य आदी विविध क्षेत्रांवर त्याचा लाभदायी परिणाम होणार आहे. कृषिविषयक जैव-तंत्रज्ञानामुळे देशातील, पर्यायाने महाराष्ट्रातील तापमानाच्या विविध पट्ट्यांना पूरक असे अन् त्याचवेळी जास्त उत्पादनक्षमता असणारे, दुष्काळ आणि अतिवृष्टी यातही तगून राहणारे बियाणे शेतकऱ्यांना मिळणार आहे. हे नवे बियाणे कदाचित विविध रोग आणि किडींना प्रतिकारक्षमसुद्धा असेल. या क्षेत्रात येणाऱ्या शेतकरी उद्योजकांना मूलभूत सल्ला, सेवा मिळावी, त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत व्हावी म्हणून महाराष्ट्र सरकारने आंतरराष्ट्रीय ख्यातीचे रसायनशास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक जैव - तंत्रज्ञान सल्लागार मंडळही नियुक्त केले आहे. याशिवाय महाराष्ट्र जैव - तंत्रज्ञान आधारित उद्योग उभारण्यासाठी काही प्रोत्साहन योजना देखील सरकारने जाहीर केल्या आहेत. त्यात सवलतीच्या दराने वीजपुरवठा, भांडवली अनुदान, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक आदींचा समावेश आहे. राज्यातील वनसंपदेचा जाणीवपूर्वक वापर व्हावा आणि आस्थेने तिची जोपासना केली जावी ही या जैव तंत्रज्ञानाधारित औद्योगिक धोरणामागची शासनाची भूमिका आहे. महाराष्ट्राची सुमारे ७२० कि.मी. लांबीची सागरी किनारपट्टीदेखील यासाठी अनुकूल आहे. महाराष्ट्रात आज घडीला कमी-अधिक १०० जैव-तंत्रज्ञान उद्योग कार्यरत असून त्यात सुमारे १५०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. तर जवळपास त्याच्या निम्म्याने म्हणजे ७०० कोटी रुपयांची आणखी गुंतवणूक नजीकच्या काळात अपेक्षित आहे. यासाठी सार्वजनिक क्षेत्रात नऊ जैव-तंत्रज्ञान विशेष आर्थिक परिक्षेत्र प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यांना मंजुरी मिळाली आणि अपेक्षित गुंतवणूक आली तर आणखी लाखभर नवे रोजगार उपलब्ध होणार आहेत. सध्या जालना आणि हिंजवडी (पुणे) येथे जैव-तंत्रज्ञान उद्याने (पार्क) विकसित करण्यात आली असून सुमारे ३०० कोटी रुपये गुंतवणुकीची चार खाजगी जैव-तंत्रज्ञान उद्याने विकसित केली जाताहेत.




**राज्यात २०१० सालापर्यंत एकूण १४३ प्रस्तावित विशेष आर्थिक परिक्षेत्रांना मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी सुमारे ४० हजार हेक्टर जमीन मंजूर करण्यात आली आहे. यातील २५ टक्के जमीन अधिसूचित करण्यात आली. त्यात दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. तसे झाल्यास त्या भागात किमान ६३ लाख नवे रोजगार निर्माण होतील.**

**आयटीतील आघाडी**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात एकूण ४२५ खाजगी संकुलांना राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यापैकी ८८ संकुले आतापर्यंत कार्यरत झाली आहेत. त्यात सुमारे १४०० कोटी रुपयांची गुंतवणूक आजवर झाली आहे.

महाराष्ट्र शासनाचे धोरण आणि उद्योजकांचा प्रतिसाद पाहता नजीकच्या भविष्यकाळात महाराष्ट्र पुन्हा एकदा उद्योग, उत्पादन आणि रोजगार निर्मितीचे मोठे केंद्र बनेल यात शंका नाही. या संघटित क्षेत्रांखेरीज पर्यटन आणि संगणक आधारित ॲनिमेशनपट किंवा चित्रपट प्रक्रिया उद्योग यातदेखील फार मोठा वाव महाराष्ट्रातील होतकरू उद्योजकांना आहे. विविध योजनादेखील त्यासाठी राज्य सरकारने आखल्या आहेत. राज्याच्या ग्रामीण भागात पर्यटकांसाठी 'न्याहारी आणि निवास' तत्त्वावर कौटुंबिक निवास उपलब्ध करून देणारी योजना आहे. त्यातून निवासी रोजगाराबरोबरच 'पर्यटक मार्गदर्शक' (गाईड) बनण्याची, हस्तकला वस्तूंचे निर्माते आणि विक्रेते बनण्याची संधी मिळणार आहे. हा एक वेगळाच उद्योग उभा राहू शकतो. पर्यटकांसाठी वाहनव्यवस्था, स्थानिक जल पर्यटन (बोटिंग) असेही काही रोजगार निर्माण होऊ शकतात. शासनाच्या काही योजनांचाही लाभ त्यासाठी घेता येईल. यातून स्थानीय ऐतिहासिक, नैसर्गिक, धार्मिक ठेव्यांचे जतन संवर्धन देखील होऊ शकेल. एकूणच शासकीय योजना, धोरण आणि उद्योजकता यांचा सुयोग्य मेळ घातल्यास ग्रामीण भागातही मोठा आणि कायमस्वरूपी रोजगार निर्माण होण्यास भरपूर वाव आहे.

महामंडळाच्या जडणघडणीत बारवी धरणाचे महत्व आगळे वेगळे असून महामंडळाची आर्थिक भरभराट या धरणामुळे झाली आहे.

राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राचा औद्योगिक विकास साधण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. जमिनीच्या संपादनाबरोबरच उद्योजकांना पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने महामंडळाने सन १९६८ मध्ये बारवी नदीवर पिंपळ-ोळी येथे बारवी धरण बांधण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. अभियंत्यांनी व कर्मचाऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हा प्रकल्प सन १९७२ मध्ये पूर्ण केला. हे धरण दगडी बांधकामाने बांधण्यात आले.

बारवी धरणाच्या पहिल्या टप्प्यात पाणी साठवण क्षमता १२२.८५ द.ल.घ.मि. होती. बारवी धरणातून महामंडळाच्या वागळे इस्टेट, टी.टी.सी. डोंबिवली, कल्याण-भिवंडी, तळोजा, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ, बदलापूर या औद्योगिक क्षेत्रांना तसेच सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, ग्रामपंचायत व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांना सवलतीच्या दरात पाणीपुरवठा करण्यात येतो.

पाण्याची निकड लक्षात घेता महामंडळाने धरणाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सन १९८६ मध्ये पूर्ण केले. दुसऱ्या टप्प्यात विस्तारामुळे धरणाची पाणी साठवण क्षमता १७८.५८ द.ल.घ.मी. इतकी झाली. बारवी धरणाच्या बांधकामादरम्यान बांधून झालेल्या तोंडली, मोहेघर, काचकोली व मानिवली इ. गावांचे पुनर्वसन करण्यात आले. पाण्याची वाढती मागणी व भविष्यातील गरज लक्षात घेता महामंडळाने धरणाची उंची वाढविण्याचे काम तिसऱ्या टप्प्यात सुरु केले.


तिसऱ्या टप्प्यात काम पूर्ण झाल्यानंतर धरणातील पाणी साठवण क्षमता ३४०.४८ द.ल.घ.मी. इतकी होणार आहे. म्हणजेच सध्याच्या पाणी साठवण क्षमतेत दुपटीने वाढ होणार आहे. तिसऱ्या टप्प्यात काम हाती घेतल्याने बारवी धरण परिसरातील जवळपास ७६५ कुटुंबांचे पुनर्वसन महामंडळास करावे लागणार आहे.

बारवी धरणाची उंची वाढविण्याचे तिसऱ्या टप्प्यातील काम पूर्णत्वाच्या शेवटच्या टप्प्यात आहे.

सध्या बारवी धरणातून ५०० द.ल.प्र. दिन इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. मुंबई प्रादेशिक विभागातील टी.टी.सी. तळोजा, वागळे इस्टेट, डोंबिवली, कल्याण-भिवंडी, अंबरनाथ, बदलापूर इत्यादी औद्योगिक क्षेत्रातील जवळपास ११००० औद्योगिक घटकांना पाणीपुरवठा करण्यात येतो. या पाणीपुरवठ्यापोटी महामंडळाच्या अंदाजे रु.१५०.०० कोटी इतका वार्षिक महसूल प्राप्त होतो. बारवी धरणाची उंची वाढल्यानंतर बारवी धरणातून उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाणी साठ्यामुळे महामंडळाला अंदाजे रु.९५.०० कोटी इतका अतिरिक्त महसूल प्राप्त होणार आहे. बारवी धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यावर ४५० मेगा वॅट क्षमतेचे जलविद्युत निर्मिती केंद्र उभारणीचे काम महामंडळाने हाती घेतले. वीज निर्मितीमुळे महामंडळाची वार्षिक रु.६.०० कोटी इतक्या रकमेची बचत होणार आहे.

महामंडळाच्या मुंबई प्रादेशिक विभागातील सर्व औद्योगिक घटकांच्या पाण्याचे स्रोत बारवी धरण आहे. त्यामुळे महामंडळाच्या महसुलात वाढ होत असून, महामंडळ हे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले आहे.

# अपूर्व अभियांत्रिकी



महामंडळाच्या प्रगतीत अभियांत्रिकी विभागाने महत्त्वाचा वाटा उचलला आहे. औद्योगिक वसाहतींना रस्ते, वीज व पाणी या मूलभूत सुविधांपैकी रस्ते व पाणीपुरवठा या सुविधा पुरविण्याची जबाबदारी अभियांत्रिकी विभागाने यशस्वीपणे पार पाडली आहे.

औद्योगिक क्षेत्राची जागा निश्चित झाल्यावर त्या जागेचे व आजूबाजूच्या परिसराचे सर्वेक्षण करून मूलभूत सुविधांसाठी योजना तयार करणे, तद्नंतर रस्ते, पाणीपुरवठा, विविध इमारती, सांडपाणी नि:सारण योजना इत्यादी साठी आवश्यक बांधकामे करणे व पायाभूत सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणे ही अभियांत्रिकी विभागाची प्रमुख कामे आहेत.



सुरुवातीला औद्योगिक क्षेत्रांना रस्ते उपलब्ध करून देण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायती इत्यादीचे रस्ते विचारात घेऊन पुढील नियोजन केले गेले. पुढे आवश्यकतेनुसार डांबरी रस्ते तसेच काँक्रीट रस्ते बांधण्यात आले व आजमितीस महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रात सुमारे २०,७४५ कि.मी लांबीचे रस्त्यांचे जाळे तयार झाले आहे.

**स्वतंत्र पाणीपुरवठा योजना**

औद्योगिक विकासासाठी पाणीपुरवठा ही अत्यावश्यक व मूलभूत सुविधा असल्याने महामंडळाने सुरुवातीपासूनच स्वत:च्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजना असण्यावर भर दिला आहे. हे साध्य करण्यासाठी महामंडळाने स्वत:ची बारवी, रानसाई, मुरबाडी, सावित्री व मोतीनाला अशी ०५ धरणे बांधली आहेत, तसेच एकूण ७९ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहेत. उभारलेल्या पाणीपुरवठा योजनांची एकूण क्षमता २०४५ दशलक्ष लीटर्स प्रतिदिन असून वापर १३७४ दशलक्ष लीटर प्रतिदिन इतका आहे. बारवी धरणासारखेच रायगड जिल्ह्यातील कर्नाळा किल्ल्याच्या पश्चिमेला उरण तालुक्यात रानसई येथे एक छोटे धरण आहे. धरणा लगतच जलशुद्धीकरण केंद्र व बाजूला जलकुंभ आहे. एकाच परिसरात पूर्ण पाणीपुरवठा योजना म्हणजे अभियांत्रिकी संकल्पनेचे उत्तम उदाहरण आहे. तसेच अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना पाणीपुरवठा योजनेच्या अभ्यासासाठी योग्य असे ठिकाण आहे. या व्यतिरिक्त औरंगाबाद, बुटीबोरी, तारापूर व पिंपरी-चिंचवड येथे पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहेत. तळेगाव चाकण येथील औद्योगिक वसाहतींच्या पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे.

**नवीन उपक्रम**

शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या औद्योगिक धोरणांनुसार महामंडळाने नवनवीन उपक्रम हाती घेतले. लघु व सुक्ष्म उद्योजकांसाठी फ्लॅटेड टाईप गाळे, शेड्स, माहिती व तंत्रज्ञान उद्यानांसाठी इमारती बांधल्या आहेत. तसेच पुष्पसंवर्धन, वस्त्रोद्योग व माहिती-तंत्रज्ञान यांसाठी खास क्षेत्र विकसित केली आहेत. त्याचप्रमाणे विशेष आर्थिक क्षेत्र, बारामती, यवतमाळ, नांदेड येथील विमानतळांची यशस्वी उभारणी करण्यात आली आहे.




**पर्यावरण संतुलन**

पर्यावरण संतुलनासाठी औद्योगिक क्षेत्रात सांडपाणी वाहिन्यांचे जाळे आहे. तसेच जमा झालेले सांडपाणी योग्य ठिकाणी सोडण्याची व्यवस्था केली आहे. सांडपाणी योग्य प्रक्रिया केलेले असावे याकरीता काही ठिकाणी महामंडळातर्फे किंवा त्या-त्या औद्योगिक क्षेत्रातील संघटनांच्या सहकार्याने सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची उभारणी केली आहे.

**इतरांसाठी मूलभूत सुविधा**

महामंडळाने स्वत:च्या औद्योगिक क्षेत्रात मूलभूत सुविधांची कामे करतानाच बाहेरील संस्थांसाठी कामे केली आहेत. अंधेरी मधील सिप्झ, गोरेगाव येथील चित्रनगरी, औरंगाबाद (चिकलठाणा) येथील आयजीटीआर (इंडोजर्मन टूल रूम), नागपूर, पुणे, नांदेड व चंद्रपूर येथील उद्योगभवन, अलिबाग येथील आरसीएफ, आयपीसीएल व गेल यांच्यासाठी पाणीपुरवठा योजना, यांचा ठळकपणे उल्लेख करायला पाहिजे.

महामंडळाने माहिती तंत्रज्ञानाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यामध्ये अभियांत्रिकी विभागाच्या सर्वात जास्त लोकाभिमुख कार्यप्रणाली आहेत. उद्योजकांना सर्व सेवा, परवानग्या त्वरित उपलब्ध करून देणे हे मुख्य उद्दिष्ट यामागे आहे. ❑❑







# हलकी- फुलकी बैलगाडी

● अनिल गडेकर

स्वातंत्र्यपूर्व काळापासून ग्रामीण भागातील दळणवळणाचे साधन म्हणून बैलगाडीचाच वापर होत आहे. शेतातील शेतमाल मंडईपर्यंत पोहोचविण्यापासून वऱ्हाड्यांनादेखील कोस दरकोस मुक्काम करीत बैलगाडीतूनच जावे लागत होते. त्यामुळे बैलगाडीमधून प्रवासाची अनेक वर्णने कथा व कादंबऱ्यांमधून वाचायला मिळतात. यात्रा असो, लग्न असो अथवा धार्मिक कार्याप्रसंगी बैलगाडीचे महत्त्व अधोरेखित होते. नवरदेवदेखील बैलगाडीतूनच मिरविला जायचा. परंतु तंत्रज्ञानाच्या बदलाबरोबरच बैलगाडीचे स्वरूपही बदलत आले.

अकोला जिल्ह्यातील लाकडी बैलगाड्या तयार करण्याचा व्यवसाय पूर्वीपासूनच होता. त्यांचा दर्जा, टिकाऊपणा यामुळे या बैलगाड्यांची वेगळी ओळख होती. या परिसरात छोट्याशा गावात चार-पाच कुटुंबे हा व्यवसाय करीत होती. परंतु कालांतराने हा व्यवसाय बंद पडला. बैलगाडी तयार करण्यासाठी आवश्यक असलेले लाकूड आता उपलब्ध होत नाही. यासाठी बाभळीसह इतर लाकूड वापरले जात होते. बैलांना गाडी ओढताना त्रासदायक ठरू नये म्हणून लाकडाची चाके बनविली जात होती. लाकडी चाकांच्या संरक्षणासाठी लोखंडी पट्ट्या बसविल्या जात होत्या. बैलगाडी बनविताना लाकडावरची कलाकुसर तासन्‌तास पाहण्याचा आनंद काही औरच असायचा. परंतु लाकडाच्या चाकाऐवजी आता संपूर्ण लोखंडाच्या चाकांचा वापर केला जात आहे. चाक बनविण्यासाठी सागाचे लाकूड महाग पडते आणि गाडीचा खर्च सुद्धा १० ते १२ हजारांनी वाढतो.

बैलगाडीचे पारंपरिक रूप बदलत असून, आता संपूर्ण बैलगाडी आधुनिक पद्धतीने तयार करण्यात येते. केवळ 'जू' तेवढे लाकडाचेच राहिले आहे. शेतातून पीक आणताना ते सुरक्षित राहावे यासाठी साधारणत: बैलगाडीच्या दोन बाजूला सहा उभाऱ्या आणि बैलगाडीतील वस्तू मागच्या बाजूला पडू नये म्हणून छोट्या दोन उभाऱ्या अशी साधारणत: बैलगाडीची रचना असते. बैलबंडी आता बैलगाडी झाली असली तरी बैलांशिवाय पर्याय नाही. बैलांच्या खांद्याकडच्या भागापेक्षा मागच्या बाजूने अधिक भार झाला की 'बंडी उलार झाली' असे म्हटले जाते. त्यापासूनच नवीन म्हण रूढ झाली. ज्या ठिकाणी साधारण व्यक्ती पोहोचू शकत नाही तेथून बैलगाडीतून साहित्य आणणे शक्य होत होते. विद्यमान परिस्थितीत बैलगाडीची जागा ट्रॅक्टरने घेतली. सायंकाळी बैल गाडीला जुंपून घरी परतणाऱ्या बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज हरवला आहे. भारत कृषीप्रधान देश आहे. या देशातील शेतकरी काबाडकष्ट करून शेती पिकवतो. शेती पिकवताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्याची जणू त्याला सवय पडली आहे. शेतामध्ये नागरी, वखरणी करण्याची पारंपरिक पद्धत म्हणजे बैलांना जुंपून काम करून घेणे. हे नांगर, वखर असे अवजड साहित्य याच बैलगाडीतून शेतापर्यंत पोहोचवले जात होते.

आधुनिक युगात ट्रॅक्टर वगैरे वाहने उपलब्ध झाली. परंतु बैलगाडीची मजा काही औरच होती. आणि सोपे वाटत असले तरी शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त व्यक्ती हे काम करू शकणार नाही, त्यासाठी त्याचा अनुभव घ्यावा लागतो.

लाकडी पाट्या ठेवून बैल जुंपणे आणि 'गाडा' पुढे हाकलणे हे वाटते तेवढे सोपे नव्हे. बैलांचा कासरा आपल्या हातात ठेवून अपेक्षित त्या ठिकाणी पोहोचविणेही तेवढेच जिकिरीचे आहे. कुठल्या बाजूच्या बैलाचा 'कासरा' सैल सोडला की बैल कोणत्या बाजूला वळतो? दोन्ही कासरे खेचले की बैलांचे 'ब्रेक' कसे लागतात? हे अनुभवाने शिकावे लागते. एकंदरीत विज्ञान युगाने हे सर्व हिरावले आहे. धावपळीच्या जमान्यात 'बंडी' दिसेनाशी होत असल्याची हुरहुर मनी असली तरी 'ती' अबाधित मात्र राहिली. मग, त्या बंडीवरील लाकडी पाट्यांची जागा लोखंडी पत्र्यांनी घेतली तरी ती बैलबंडीच राहणार आहे.

वर्धा येथील दत्तपूरच्या ग्रामोपयोगी विज्ञान केंद्रात इन्स्टिट्यूट फॉर स्टील डेव्हलपमेंट ॲण्ड ग्रोथच्या वतीने शेतकऱ्यांसाठी सुलभ अशी बैलगाडी तयार करण्यात आली आहे.

'उन्नत बैलगाडी' ही आधुनिक स्वरूपातील संपूर्ण बैलगाडी लोखंडाची तयार करण्यात आली आहे. या बैलगाडीचे वजन २७० किलोग्रॅम आहे. बैल सहजपणे बैलगाडी ओढू शकतात. बैलगाडीच्या चाकांना बेअरिंगचा उपयोग करण्यात आला असून, गाडी सहजपणे रस्त्यावर ओढण्यास बैलांना मदत होते. लाकडी बैलगाडीच्या भारवाहन क्षमतेपेक्षा या आधुनिक गाडीमध्ये दुप्पट म्हणजे २० क्विंटलपर्यंत साहित्य वाहून नेणे सहज शक्य असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

बैलगाडीच्या वेगावर नियंत्रणासाठी ब्रेकसुद्धा बसविण्यात आले असून, बैलगाडी वाहकाला सुविधेनुसार गाडी थांबविता येते. ही बैलगाडी तयार करणे अत्यंत सुलभ असून, ग्रामीण भागामध्ये ही बैलगाडी तयार करणे सहज शक्य आहे. आणि या बैलगाडीचे आयुष्य २० वर्षांपर्यंत असून, १३ हजार रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना बैलगाडी सहज उपलब्ध होत आहे.

परंपरागत बैलगाडीचे प्रारूप त्याची वाहनक्षमता व ग्रामीण भागांतील रस्त्यावर सहजपणे बैल ओढू शकतील याचा ग्रामोपयोगी विज्ञान केंद्राने अभ्यास करून नवीन स्वरूपातील बैलगाडी तयार केली आहे.

संपर्क : ९८९०१५७७८८



# 'आरकेएस'ची झेप

कोकणात जयवंत विचारे यांनी सहकाराच्या माध्यमातून काजू उत्पादकांना एकत्रित करण्यास २००३ मध्ये सुरुवात केली. तब्बल सहा वर्षांनंतर त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन रत्नागिरी कृषी प्रक्रिया सहकारी संस्थेची स्थापना लांजा तालुक्यातील गवाणे येथे झाली.

रत्नागिरी जिल्ह्यात काजूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. मात्र, काजू प्रक्रियेसाठी कर्नाटक-केरळ राज्यातील प्रक्रिया केंद्रांवर कच्चा माल पाठवावा लागत असे. त्यामुळे काजू उत्पादकांना होणाऱ्या फायद्यात घट होत असे. त्यावर उपाय म्हणून काही ठिकाणी घरगुती स्वरूपाचे प्रक्रिया उद्योग सुरू झाले. मात्र, त्याला मर्यादा असल्याने मोठ्या स्वरूपात असा उद्योग सुरू करणे उत्पादकांच्या दृष्टीने आवश्यक होते. अशी प्रक्रिया संस्था उभारण्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडे राज्य शासनाच्या माध्यमातून प्रस्ताव सादर करण्यात आला.

केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने जुलै २००९ मध्ये प्रक्रिया उद्योगाला प्रत्यक्षात सुरुवात झाली. २२ हजार चौरस फूट क्षेत्रात उद्योगासाठी आवश्यक इमारत उभारण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात कच्च्या मालाच्या उपलब्धतेपासून बाजारपेठ सर्वेक्षणापर्यंतच्या सर्व बाबींचे नियोजन करण्यात आले होते. दैनंदिन कामावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुविधेपासून वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने सोईची असल्याने गवाणे परिसरातील जागेला प्राधान्य देण्यात आले. लांजा येथे राष्ट्रीय फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत नवीन काजू लागवड मोठ्या प्रमाणात झाल्याने भविष्यात उद्योगाची वाढ झाल्यावर कच्चा माल उपलब्ध होणार असल्याचे गणित जागा निवडीमागे आहे.

उद्योगाची सुरुवात केल्यावर प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मोठी समस्या होती. स्थानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी आजरा येथील तज्ज्ञ मार्गदर्शकास पाचारण करण्यात आले. एक वर्षाच्या कालावधीत परिसरातील महिला संपूर्ण प्रक्रियेच्या कामात निष्णात झाल्या. शासनाच्या मानकाप्रमाणे संस्थेत बॉयलरची व्यवस्था करण्यात आली. संस्थेचे सभासद, कर्मचारी यांना विविध ठिकाणी होणाऱ्या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येत असल्याने उत्पादनाची गुणवत्ता राखणे शक्य झाले आहे. सोलणी, तोडणी, पॉलिशिंग, ग्रेडेशन, पॅकिंग सर्व कामे रूपाली कांबळे या युवतीच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील महिला सराईतपणे करतात. विजय धुळप यांचे व्यवस्थापनाच्या क्षेत्रात मार्गदर्शन मिळत असल्याने नियोजनावर सूक्ष्म नियंत्रण ठेवणे शक्य झाले असल्याचे विचारे यांनी सांगितले.



आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे काजूचे ग्रेडेशन करून १० किलोच्या टिनमध्ये पॅकिंग करण्यात येते. प्रकल्पाची प्रक्रिया क्षमता ४ टनाची असून, सध्या दररोज एक ते दोन टन काजू बीवर प्रक्रिया करण्यात येते. एकावेळी १० टन काजू बी वाळविण्यासाठी १४ हजार वर्ग फुटांचे 'ड्रायिंग यार्ड' हे या संस्थेचे वैशिष्ट्य आहे. असे यार्ड क्वचितच प्रक्रिया उद्योगांत पाहायला मिळतात. २०११-१२ या वर्षात संस्थेने २०० टन काजू बियांवर प्रक्रिया करून ६६ टन काजूगराचे उत्पादन घेतले आहे. संस्थेच्या माध्यमातून १५० महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आयएसओ मानांकन मिळविण्यासाठी आवश्यक यंत्रणा संस्थेने सज्ज केली असून, त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

मुंबई, चिपळूण, सांगली, वारणा आणि शारजा येथे संपन्न झालेल्या कृषिमाल व प्रक्रियामाल प्रदर्शनात घेतलेल्या सहभागामुळे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत संस्थेच्या मालाची मागणी दिवसेंदिवस वाढते आहे.

'आरकेएस' या टोपण नावाने ओळख असलेल्या येथील उत्पादनाला मुंबईच्या बाजारात चांगली मागणी आहे.

❒ ❒



## कर्तृत्व आणि कीर्ती

(पान ३१ वरून)

केलेल्या हस्तकलेच्या वस्तूंच्या विक्रीसाठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महामंडळामार्फत राज्यामध्ये हस्तकला प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. इतर राज्यांनी आयोजित केलेल्या हस्तकलेच्या प्रदर्शनात भाग घेतला जातो. परदेशातील हस्तकलेच्या प्रदर्शनात भाग घेण्यात येतो. हस्तकला कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी महामंडळाने सन १९६८-६९ मध्ये नवी दिल्ली येथे पहिले हस्तकला दालन सुरू केले, त्यानंतर मुंबई व पैठण येथे हस्तकला विक्री दालने उभारली. या दालनातून राज्यातील महामंडळाकडे नोंदणीकृत एकूण २१७ हस्तकला कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यात येते.

राज्यातील पैठणी विणकाम कलेच्या पुनरुज्जीवनासाठी महामंडळामार्फत पैठण येथे पैठणी साडी विणकाम केंद्र सन १९७३ पासून चालविण्यात येत आहे. या पैठणी विणकाम केंद्रात एकूण १८९ हातमाग उभारण्यात आले आहेत. त्यावर अस्सल रेशीम व सोन्या-चांदीच्या जरीचा वापर करून पारंपरिक पैठणी साडी हातमागावर विणण्यात येते. महाराष्ट्राची भूषण असलेली पैठणी साडी फक्त महामंडळाच्या पैठणी उत्पादन केंद्रातच तयार करण्यात येते. महामंडळाच्या पैठणी उत्पादन केंद्रात पैठणी साडीच्या पुनरुज्जीवनासाठी नवीन विणकाम कारागिरांना पैठणी साडीच्या विणकामाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. या प्रशिक्षण व उत्पादन केंद्रामुळे महिला व इतर सुशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध होतो.

### व्यापार मेळ्यात महाराष्ट्र दालन

भारत व्यापार वृद्धी संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत दरवर्षी दि.१४ ते २७ नोव्हेंबर दरम्यान भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचे आयोजन प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे करण्यात येते. सन १९८४ पासून महामंडळ यात सहभागी होत आहे. या प्रदर्शनामध्ये राज्यातील शासकीय विभाग, उद्योजक व हस्तकला कारागीर मोठ्या प्रमाणात भाग घेतात.

**संपर्क : ०२२-२२६१४९३९**

❒ ❒

# देसाई बंधू नावातच ब्रॅण्ड

● डॉ. किरण मोघे

देसाई बंधू हे शब्द उच्चारताच 'आंबेवाले' असे बिरुद नकळतपणे जोडले जाते; आणि हीच त्यांनी उभ्या केलेल्या प्रक्रिया उद्योगाच्या यशाची पावती आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील पावस गावी केवळ आंबा विक्रीपासून सुरू झालेल्या या व्यवसायाचे रूपांतर आता मोठ्या प्रक्रिया उद्योगात झाले आहे.

पावस हे गाव स्वामी स्वरूपानंदांच्या स्पर्शाने पावन झालेली भूमी म्हणून ओळखले जाते. याच गावात आंबा उत्पादन व्यवसायात देसाई कुटुंबाची ही चौथी पिढी काम करते आहे. कै. भाऊराव देसाई यांचे कराची येथे आंब्याचे दुकान होते. मात्र, एका वेळेस बोटीने आंबे उशिरा पोहोचल्याने व्यवसायात झालेल्या नुकसानामुळे व्यवसाय बंद करून ते नागपूरला आले. काही काळानंतर पुणे येथे त्यांनी आंब्याची वखार काढली. वखारीत आंबा मोठ्या प्रमाणात उरल्याने त्यावर पर्यायी मार्ग म्हणून आंब्यावर प्रक्रिया करून आंबामावा तयार केला. हा प्रयोग चांगलाच यशस्वी झाला आणि इथेच 'देसाई प्रॉडक्ट्स'ची मुहूर्तमेढ रोवली गेली.

प्रारंभी आंबामावा चुलीवर आटवला जात असे. मात्र, वाढती मागणी लक्षात घेऊन १९७६ मध्ये आंबा कॅनिंग फॅक्टरीचे लहान युनिट सुरू करण्यात आले. पहिल्याच वर्षी आंब्याच्या रसाचे ५०० डबे भरले गेले. उद्योगासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री घरगुती स्वरूपाची होती. उत्पादनाला मागणी वाढली तसे यंत्रांचे स्वरूप बदलत गेले. प्रारंभीच्या काळात खादी ग्रामोद्योग महामंडळ आणि बँक ऑफ महाराष्ट्रने या प्रगतीत मोलाचे सहकार्य केल्याचे आनंद देसाई आवर्जून सांगतात.

भाऊरावांच्या तीन मुलांनी पुढे व्यवसायाचे उत्तम नियोजन केले. जयंत देसाई यांनी आंबा लागवड व उत्पादन, विजय देसाई यांनी कॅनिंग आणि वसंत देसाई यांनी मार्केटिंग व्यवस्थितरीत्या सांभाळले. जयंत देसाई बी.कॉम सीए होण्यासाठी मुंबईला जाणार होते. मात्र, स्वामी स्वरूपानंद यांच्या इच्छेनुसार ते कोकणातच स्थायिक झाले आणि इथेच आंबा व्यवसाय बहरू लागला. सुरुवातीला मँगो पल्पची निर्यात करण्यात आली. १९९४-९५ मध्ये उत्पादनाचा पहिला कंटेनर जपानला निर्यात करण्यात आला. त्यानंतर देसाई बंधूंनी मागे वळून पाहिले नाही. जपानच्या तायझो मासूदा यांच्या सहकार्याने ही निर्यात आता २४० टनापर्यंत पोहोचली आहे. आंबा निर्यातीसाठी आवश्यक ग्लोबल गॅप सर्टीफिकेट मिळविल्याने गेल्या चार-पाच वर्षांत निर्यात सातत्याने वाढते आहे.

आज या उद्योगांतर्गत देशांतर्गत विक्रीसाठी उत्पादन करणारे एक आणि निर्यातीसाठी एक असे दोन स्वतंत्र प्रक्रिया करणारे युनिट आहेत. त्यांना उत्तम व्यवस्थापनामुळे आयएसओ ९००१ आणि आयएसओ २२००० प्रमाणपत्रदेखील मिळाले आहे. गुणवत्तेचे निकष पाळताना मँगो पल्प, मँगो स्लाईस, सांडगी मिरची, फणस पोळी, आंबा पोळी, हवाबंद डब्यातली फणस भाजी, अमृत कोकम, कैरी छुंदा, कैरी पन्हे, आंबा मावा आदी विविध उत्पादने तयार करून बाजारात ते लोकप्रिय करण्यात देसाई बंधूंना यश आले आहे.

पुणे येथून व्यवसायाचे संपूर्ण नियंत्रण करण्यात येते. शासनाचा उद्यानपंडित पुरस्कार मिळालेल्या तिसऱ्या पिढीतील आनंद यांनी मोठा भाऊ अमरच्या मदतीने या व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञान आणि विपणनातल्या उत्तम नियोजनाची जोड दिली आहे. देसाई बंधूंच्या स्वत:च्या तीनशे एकर बागेत १५ ते १७ प्रकारच्या आंब्याच्या जाती लावलेल्या असल्याने कच्चा माल मुबलक प्रमाणात मिळतो. कॅनिंग फॅक्टरीत सुरुवातीला असलेली दर दिवशी पाच टन माल बनविण्याची क्षमता आता १४ टनापर्यंत पोहोचली आहे.

देसाई यांच्या कार्याची दखल देशपातळीवर घेण्यात आली आहे. त्यांना लखनऊ येथील ऑल इंडिया मँगो शो आणि कोलकाता येथील मँगो महोत्सवात अनेक विभागांत पारितोषिके मिळाली आहेत. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या आबासाहेब कुबल पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

'देसाई बंधू आंबेवाले' असा नावलौकिक मिळविणाऱ्या या देसाई कुटुंबीयांच्या यशामागे वर्षानुवर्षांचे परिश्रम आणि अभ्यास आहे. उद्योगात सूक्ष्म नियोजन केल्यास त्याचे परिणाम उत्तमच येतात, हे सूत्र देसाई बंधूंच्या यशातून समोर येतं. त्यांच्या यशाने कोकणातील प्रक्रिया उद्योगाची उपयुक्तता आणि महत्त्वदेखील अधोरेखित केले आहे.

**संपर्क : ९८२३०३१६५२**

### यशाची सप्तपदी

- गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड नाही
- वेळेपूर्वी ऑर्डर पूर्ण करणे
- दिलेला शब्द पाळायचा
- ग्राहकाचा विश्वास संपादन करायचा
- योग्य दरात चांगले उत्पादन
- व्यवसायात धोका पत्करताना त्यामागे नियोजनाचे बळ
- प्रयत्नात सातत्य





**आंबा कॅनिंग फॅक्टरीतील मँगो पल्प जपान, अमेरिका, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर आदी देशात निर्यात होत आहे. उत्तम व्यवस्थापनाद्वारे फॅक्टरीचे कामकाज चालविताना फळबाग अधिक विकसित करण्याकडे सातत्याने लक्ष देण्यात येत आहे. या कृषी आधारित उद्योगातून स्थानिक पातळीवर अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आंब्याच्या मोसमात सुमारे ३०० तर इतरवेळी ३० ते ४० व्यक्तींना या उद्योगामुळे रोजगार मिळतो. कोकणातल्या आंबा उत्पादकांनी सुरुवातीला ५ ते १० लाखांची गुंतवणूक करून योग्य नियोजन केल्यास प्रक्रिया उद्योगाद्वारे चांगले उत्पन्न मिळू शकते.**

# उद्योगमित्र-प्रवासी भारतीय

● प्रवीण टाके

उद्योग क्षेत्रात प्रत्येक राज्यात विदेशी गुंतवणूक व्हावी यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असते. या अनुषंगाने केंद्रीय अनिवासी भारतीय कामकाज मंत्रालय, उद्योग मंत्रालय, पूर्वोत्तर राज्य विकास विभाग आणि भारतीय उद्योग प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने भारतात अनिवासी भारतीयांना देशातील उद्योग-व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी प्रवासी भारतीय दिनाचे आयोजन केले जाते. दरवर्षी ७ ते ९ जानेवारी या काळात देशातील प्रमुख एका शहरात हे आयोजन केले जाते.

जगभरात भारतीयांनी आपल्या व्यावसायिक कौशल्याच्या व जिद्दीच्या बळावर ते ज्या देशात राहतात तिथल्या अर्थव्यवस्थेला चालना दिली आहे. अनेक देशांत भारतीय मूळवंशाच्या नागरिकांनी स्वत:चे उद्योग, व्यवसाय त्या-त्या देशातील प्रमुख व्यवस्थापन म्हणून नावलौकिकास आणले आहे. अशा जगभरातील अनिवासी भारतीयांना आपल्या मायभूमीचे आकर्षण कायम राहिले आहे. भारताच्या प्रगतीच्या वाटचालीत आपलाही वाटा असावा, असे त्यांना नेहमी वाटते. मायभूमीबद्दलचे हे आकर्षण ते विविध व्यासपीठांवर व्यक्त करतात. त्यामुळे या सर्वांना एक व्यासपीठ उपलब्ध करण्यासाठी केंद्र शासनाने २००३ या वर्षापासून 'प्रवासी भारतीय दिना'ची सुरुवात केली आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात प्रत्येक राज्याचा सहभाग असतो. पहिल्या दिवशी पंतप्रधान हजारोंच्या संख्येने येणाऱ्या या अनिवासी भारतीयांना संबोधित करतात, त्यांच्या अपेक्षा, सूचना आणि भावना जाणून घेतात. अनिवासी भारतीयांचा प्रवास व त्यासंदर्भातील समस्या, निवास आणि सुरक्षितता, गुंतवणूक व त्यासंदर्भातील समस्या याबाबतही विविध सत्रांत चर्चा होते. शेवटच्या दिवशी या गुंतवणूकदारांना त्यांची इच्छा असणाऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी, उद्योग मंत्र्यांशी थेट संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध केले जाते. या चर्चेत गुंतवणूक संदर्भात आपआपल्या समस्या मांडल्या जातात. कुठे गुंतवणूक करायची, सरकार काय मदत करेल, अशा अनेक प्रश्नांची थेट मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा होते. यावेळी सारे उच्चपदस्थ अधिकारी आणि संबंधित विभागाचे सचिव प्रामुख्याने उपस्थित राहून याच व्यासपीठावर बहुतांश माहिती देऊन किंवा उपाययोजना सुचवून समाधान करतात. साधारण तीन तासांचे हे सत्र गुंतवणूकदार आणि मुख्यमंत्री यांच्यातील थेट संवादाचे सूत्र असते.




आतमध्ये गुंतवणूक या विषयावर चर्चा सुरू असतानाच देश-विदेशातील अनिवासी भारतीयांना प्रत्येक राज्याच्या प्रगतीमध्ये आढावा घेता यावा यासाठी राज्यांची दालने सुसज्ज असतात. यामध्ये त्या त्या राज्याच्या उद्योग, पायाभूत सुविधा, पर्यटन याची प्रामुख्याने माहिती दिली जाते. महाराष्ट्र या उत्सवातील अग्रणी राज्य असते. त्यामुळे या दालनात मुंबई महानगर विकास प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आदींचा प्रामुख्याने समावेश असतो. २०१० मध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने जानेवारी महिन्यात प्रवासी भारतीय दिनाचे औचित्य साधून 'महाराष्ट्र अहेड' एक विशेष अंक प्रकाशित केला होता. २ हजार अंकांचे सर्व अनिवासी भारतीयांना वाटप करण्यात आले होते.

प्रवासी भारतीय दिन ७ ते ९ जानेवारी या काळातच साजरा होतो कारण, या प्रश्नाचे उत्तर आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी ९ जानेवारी १९१५ रोजी दक्षिण आफ्रिकेवरून भारतात परतले होते. पुढे या महापुरुषाने भारतीय उत्कर्षाचा इतिहास रचला. त्यामुळेच या दिनाचे औचित्य साधून अनिवासी भारतीयांना देशाच्या विकासात सामील केले जाते. या ठिकाणी कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीची मुहूर्तमेढ रोवली जाते. त्यामुळे उद्योग विश्वात प्रवासी भारतीय दिनाचे महत्त्व असून महाराष्ट्राला यातून मोठ्या प्रमाणात दरवर्षी गुंतवणूक मिळत आहे.

**संपर्क : ०९७१७१४०४९५**


❐❐



# वाचू आनंदे

● संजय सोनवणी

## 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रमय चरित्र'




प्रा. हरी नरके संपादित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रमय चरित्र' हा बृहत्खंड मुळात शासनाचे प्रकाशन वाटत नाही एवढ्या देखण्या स्वरूपात प्रसिद्ध झाला आहे. अशा अभिजात चित्र-चरित्राच्या संपादनाबद्दल व प्रकाशनाबद्दल शासनाचे आणि संपादक प्रा. हरी नरके व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करणे भाग आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव प्रा. दत्ता भगत आणि तत्कालीन कार्यासन अधिकारी शुद्धोदन आहेर यांच्या योगदानाबद्दल त्यांचेही अभिनंदन केलेच पाहिजे एवढे उच्च दर्जाचे कार्य या ग्रंथरूपाने झाले आहे. हा ग्रंथ म्हणजे बाबासाहेबांना दिलेली एक अभिनव विनम्र मानवंदना आहे. उण्यापुऱ्या अत्यंत दुर्मीळ अशा अडीचशे छायाचित्रांतून व त्यासोबत दिलेल्या बाबासाहेबांच्या बहुमोल वचनांतून एक विलक्षण असा जीवनपट उलगडणारा हा ग्रंथ म्हणजे सर्वांसाठी एक पर्वणीच आहे. आणि अवघ्या देशातून इंग्रजी आवृत्तीला तर महाराष्ट्रातून मराठी आवृत्तीला एवढा प्रतिसाद लाभला आहे, इतका की प्रथम प्रकाशनानंतर (१४ एप्रिल २०१०) या चित्रचरित्राच्या मराठी आवृत्तीच्या तीन हजार प्रती व इंग्रजी आवृत्तीच्या दोन हजार प्रती हातोहात संपल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या शोषितांसाठी अविरत संघर्षरत राहणाऱ्या, प्रज्ञासूर्याचे आत्मभान देणाऱ्या महामानवाचे समग्र साहित्य, त्यांची सर्व भाषणे, पत्रव्यवहार पुढच्या पिढ्यांसाठी एक चिरंतन दीपस्तंभ म्हणून उपलब्ध करून देणे हे अत्यंत आवश्यक असेच होते. महाराष्ट्र शासनाने त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समितीची १५ मार्च १९७६ मध्ये स्थापना केली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे' या शीर्षकाखाली क्रमाक्रमाने अनेक खंड प्रकाशित होत राहिले. हे सर्व होत असताना बाबासाहेबांचे चित्रमय चरित्रही प्रकाशित झाले पाहिजे या भावनेने शासनाने १९९५ साली त्यासाठी एक उपसमिती निर्माण केली. २००२ साली या समितीची धुरा प्रा. हरी नरकेंकडे आली. तत्पूर्वी बराचसा काळ हा छायाचित्रे मिळवण्यातच व्यतीत झाला होता.

यातील अनेक छायाचित्रे ही जुनी असल्याने फिक्कट झालेली, सुरकुत्या पडलेली वा पिवळट पडलेली अशी होती. अनेक छायाचित्रे तर प्रिंटवरून रीप्रिंट मारलेली असल्याने छापण्यास योग्यच नव्हती. अशा स्थितीत हार न मानता चित्रमय चरित्राला अग्रक्रम देण्याचे ठरवत प्रा. नरके यांनी या अंधुक/खराब झालेल्या अथवा आकार वाढवला तर धुरकट होणाऱ्या फोटोंना जणू अलीकडेच काढलेत असे वाटावे यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घ्यायचे ठरवले.

'डॉ. बाबासाहेब लेखन आणि भाषणे' या ग्रंथमालिकेतील बाविसावा खंड म्हणजे हा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : चित्रमय चरित्र'. या चित्रमय चरित्रातील प्रक्रिया करून आधुनिक छपाई तंत्रज्ञानाने छापलेली बाबासाहेबांची छायाचित्रे पाहिली तर लक्षात येते की बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील भव्यता, प्रगल्भता आणि तेजस्वीपणा प्रत्येक छायाचित्रातून ओथंबून वाहतो आहे. बाबासाहेबांच्या माणुसकीचा, करुणेचा आणि समतेचा हा अक्षय्य झरा पानापानातून ओसंडून वाहताना दिसतो... आणि प्रत्येक छायाचित्रासोबत बाबासाहेबांचे महत्त्वपूर्ण विचारही दिले असल्याने ग्रंथाची उंचीही वाढताना दिसते. छायाचित्रांवर तांत्रिक संस्कार करणारे श्री. संजू हिंगे आणि चित्रमय चरित्रासाठीचे लेखन करणाऱ्या संगीता पवार यांच्याही कार्याला या निमित्ताने दाद दिलीच पाहिजे. या सर्वांमुळे व प्रा. नरकेंच्या साक्षेपी संपादनामुळे एक जागतिक दर्जाचा चित्रमय ग्रंथ प्रसिद्ध होऊ शकला आहे.

बाबासाहेबांचे समग्र जीवन हा अथक संघर्षाचा एक प्रवास आहे. हा विलक्षण प्रवास छायाचित्रांच्या मदतीने क्रमाक्रमाने उलगडला जातो. त्यांच्या जीवनातील विविधांगी प्रसंग छायाचित्रांच्या रूपाने उलगडत जातात. फार क्वचित त्यांना फुरसतीचे, हास्य-विनोदाचे क्षण लाभले आहेत. परंतु, या ग्रंथात बाबासाहेबांच्या तब्बल १२ हसऱ्या मुद्रा आहेत. हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. एवढी हास्यमुद्रा असणारी छायाचित्रे आजवर बाबासाहेबांवरील प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही ग्रंथात नाहीत. प्रसन्नतेचा शिडकावा करणारे बाबासाहेबांचे हास्य पाहिले की पाहणारा नकळत भावुक होऊन जातो आणि त्या महामानवासमोर नतमस्तक होतो.

बाबासाहेब हे आजच्या-पुढच्या पिढ्यांसाठीचे अक्षय्य ऊर्जास्रोत आहेत. या ग्रंथमालेमुळे अनमोल ठेवा एकत्रित संचित झाला आहे. अनेक अडचणींवर मात करीत, मार्ग काढत हे जे एक चित्रमय चरित्र प्रकाशित झाले आहे त्यासाठी प्रा. नरके अभिनंदनास पात्र आहेत.

प्रत्येक भारतीयाच्या संग्रही असायलाच हवे असे हे चित्रमय चरित्र. जगभरात या चित्रमय चरित्राचा प्रसार व्हायला हवा.

**संपर्क : ९८६०९९१२०५**

### पुस्तक कुठे मिळेल?

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई - ४००००४. दूरध्वनी : २३६३१४३३, २३६३१७९९.

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथकार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ.नजीक, पुणे - ४११००१. दूरध्वनी : २६१२५८०८.

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथकार, सिव्हिल लाइन्स, नागपूर-४४०००१. दूरध्वनी : २५६२६१५.

४. सहायक संचालक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद - ४३१००१. दूरध्वनी क्र. २३३१५२५.

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३. दूरध्वनी क्र. २६५०३९५, २६५०४०२.

पुस्तकाचे संपादक - हरी नरके
एकूण पृष्ठे - २१२,
किंमत -रु.४००/-


● प्रकाश कथले

# वर्धा- श्रम आणि आश्रम संस्कृती

श्रम आणि आश्रम संस्कृती सांभाळतच जिल्ह्याची वाटचाल सुरू आहे. जिल्ह्याच्या राजकीय, भौतिक आणि अधिभौतिक वैभवाची यातूनच जडणघडण झाली. वर्धा बदलले ते मूळ घेतलेल्या वस्याचे स्वरूप कायम राखीत. जिल्ह्याच्या श्रम आणि आश्रम संस्कृतीवर गांधीजी, विनोबाजी, जमनालालजी बजाज तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत केजाजी महाराज, संत नगाजी महाराज आदींचे संस्कार आहेत. घरांचे स्वरूप बदलले पण मनाचे रूप कायमच राहिले. हेच वर्ध्याचे वैशिष्ट्य आहे. धोरण आणि धारणा कायम राहिली. मातीशी जुळलेले नाते बदलत्या परिस्थितीवर मात करते झाले.

क्षय आणि अक्षयाचा शोध घेत जिल्ह्याची वाटचाल सुरू झाली. ती कायम आहे. नव्याचा शोध आणि यातून घ्यायचा बोध, यातून जिल्ह्याने देवधर्म आणि राष्ट्रधर्माची सांगड घातली. यामुळेच येथील नागरिकांना भान आणि अभिमानाची जोड देता आली. शहर बदलले, खेडीही बदलली पण संस्कृती कायम राहिली त्यामुळेच विकृती आली नाही व कृती गतिशील राहिली. यातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक बदल जिल्ह्याने अनुभवले.

इंग्रजांच्या राजवटीत जिल्ह्याचे मुख्यालय देवळी तालुक्यातील कावठा या गावात होते. इंग्रजांनी जिल्ह्याचे मुख्यालय वर्ध्याला आणले. वर्ध्याचे मूळ नाव पालकवाडी. वर्धा नदीने जिल्ह्याचे सिमांकन झाल्याने पालकवाडीचे वर्धा झाले. पण पुढील वाटचालीत गांधीजींच्या वास्तव्याने वर्धा स्वातंत्र्य राजधानीचे केंद्र झाले आणि वर्ध्याचे नाव जगात झाले.






बाजाजवाडीत महात्मा गांधींसोबत चर्चा करताना जमनालालजी बजाज.




वर्ध्याचे वैशिष्ट्य आगळेच आहे. येथील चौक सोशॅलिस्ट आहे. त्याला सोशालिस्ट चौक नावाने ओळखला जातो. रस्त्याचे नाव बॅचलर रोड आहे. तो बॅचलर नावाच्या अभियंत्याने जिल्ह्याच्या मुख्यालयाची उभारणी करताना वाहतुकीच्या नियोजनाकरीता तयार केला होता. हे नामकरण तसेच कायम आहे. येथील सोशॅलिस्ट चौकाने देशातील ज्येष्ठ नेत्यांची भाषणे ऐकली. गाजलेल्या सभा मनात साठविल्या. आता या चौकात सभा होत नाही. पण चौकाचे नाव कायम आहे. वर्धा शहराच्या मुख्य रेल्वेस्थानकातून स्वराज्याच्या आंदोलन काळात ज्येष्ठ नेत्यांची मांदियाळी यायची. रेल्वे स्थानकाच्या फलाटाने या घटना मनात साठवून ठेवल्या आहेत.

देशाच्या सर्वेक्षणाची नोंद घेताना विल्यम लॅम्बटन या सर्वेक्षकाने हिंगणघाट येथे शेवटचा श्वास घेतला. तो हिंगणघाट येथेच चीरनिंद्रेत आहे. त्याचे पुढील काम त्याचा सहकारी एव्हरेस्टने केले तो हिमालयाच्या शिखरापर्यंत गेला आणि त्या हिमालयाच्या शिखराचे नाव एव्हरेस्ट पडले. पण, विल्यम लॅम्बटन याची हिंगणघाट येथील समाधी उपेक्षितच आहे. इंग्लंड येथील कापड गिरण्या बंद पडायची पाळी आली तेव्हा हिंगणघाट तालुक्यानेच बनी जातीचा कापूस इंग्लंडमधील लँकशायरला पुरविला. पुढच्या काळात हिंगणघाट, पुलगावमधील कापड गिरण्या मोडकळीस आल्या. कापसाने शेतकऱ्यांचा गळा घोटला. पिकांचा पॅटर्न बदलला, पण शेतकऱ्यांची शेतिनिष्ठा कायमच आहे. हेच जिल्ह्याचे बदलत्या काळातही वैशिष्ट्य आहे. जिल्ह्यातील हातमागावरील कापड विणण्याचा उद्योग मात्र नामशेष झाला.

१९०९ मध्ये एकूण लोकसंख्येच्या तुलनेत नागरी लोकसंख्येची टक्केवारी ११.२३ होती. शहरीकरणाच्या वाटचालीत ती पुढील ८० वर्षांत २४.९८ टक्क्यांवर गेली. १९०१ मध्ये ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी ८८.७४ होती. ८० वर्षांनी



गीताई मंदिर प्रवेशद्वार

ती ७५.२ म्हणजेच १८ टक्क्यांनी कमी झाली. पुढे हा वेग अतिशय गतिशील झाला.

**पौराणिक वैभव**

जिल्ह्यातील पवनार, केळझर, पोहणा ही पौराणिक वैभवाची साक्ष जपणारी गावे. पवनारचा उल्लेख ऐन ए अकबरीत 'पनार' असा आहे. वाकाटककालीन राजा प्रवरसेन (इसवी सन ४२०-४५० ) हा सर्वांत प्रभावशाली होता. प्रवरसेनाने त्याच्या दुसऱ्या वर्षात दिलेला ताम्रपट समुद्रपूर तालुक्यातील जाम येथे तसेच अकराव्या वर्षात दिलेला ताम्रपट वर्धा जिल्ह्यात मिळाला आहे. पवनार येथील विनोबाजींच्या आश्रमात स्थापन केलेले शिल्प वाकाटक काळातील आहेत. प्रवरसेनाची आई प्रभावती गुप्ता विष्णूची भक्त होती. विष्णू अवतार रामाचे मंदिर प्रवरसेनाने तिच्यावरील प्रेमानेच बांधले असावे, असे मानले जाते. पवनार येथील विनोबाजींच्या आश्रमात गंगेचे सुंदर शिल्प जपून ठेवण्यात आले आहे. या शिल्पावरील पोटिकाशीर्ष लिपीतील मजकूर वाचता हे शिल्प पाचव्या शतकातील असावे, असे मानले जाते. सध्याच्या पवनार येथील आश्रमाच्या जागी उत्तुंग देवालय होते, असे संशोधक डॉ. मिराशी यांचे म्हणणे आहे. नागपूर विद्यापीठाच्या वतीने डॉ. शा.भा. देव यांनी पवनारला केलेल्या उत्खननातून इसवी सन पूर्व १००० ते ८०० पंधराव्या शतकापर्यंतचे अवशेष मिळाले. पवनार येथील एका घरात देवनागरीतील १५१० ते १५५३ या काळातील बुऱ्हाण निजामशहाच्या काळातील शीलालेख मिळाला होता. वाकाटकाच्या काळापासून मुसलमान राजवटीच्या कालावधीतील मानवी वसाहतीचे अवशेष पवनारला मिळाले आहेत. पवनार आश्रमाजवळच धाम नदीच्या तिरावर अरबी भाषेत बिस्मिल्ला लिहिलेली तांब्याची १०६२ ते १०६८ या काळातील नाणीही मिळाली होती. ही नाणी औरंगजेबाच्या काळातील असून, ती बख्त बुलंद नामक गोंड राजाच्या काळातील होती. पवनार येथे प्राचीन किल्ल्याचे अवशेष दिल्ली दरवाज्यासह आहेत. येथेच दगडाने बांधलेली मशीद आहे.



बाजाजवाडीत जमनालाल बाजाज, जवाहरलाल नेहरु, शंकरराव देव आणि इंदिरा गांधी.



शांती स्तूप

पोहणा हेही पौराणिक संस्कृतीची साक्ष देणारे गाव हिंगणघाट तालुक्यात आहे. येथे सवाखंडी धान्य मावणारी शिवपिंड रुद्रसेनाने स्थापन केल्याचे मानले जाते. पोहणा हे गाव प्रवरसेन (पहिला) चा नातू रुद्रसेनाने वसवले आणि त्यानेच हे शिवालय उभारले, असे मानले जाते. पोहण्यातील चिरेबंद दगड, वर्धा नदीच्या किनाऱ्यावरील किल्ल्याची तटबंदी, येथे मिळणाऱ्या मूर्ती प्राचीनतेची साक्ष देतात.

केळझर हेही गाव प्राचीनच. या गावाला एकचक्रा नगरी म्हटले जायचे. येथील टेकडीवर प्राचीन गणेशमूर्ती आहे. गावाच्या जवळील तलावाच्या किनाऱ्यावर अश्मयुगकालीन शिळावर्तुळे मिळतात. येथे गंडकी पाषाणात कोरलेली विष्णूमूर्ती मिळाली आहे. केळझर -एकचक्रा नगरीत पांडवांनी वास्तव्य केले होते. असा पोथीवाङ्‌मयात उल्लेख आहे. ऐन ए अकबरीत केळझर महाल असा उल्लेख आहे. गावाला सम्राट अशोकाच्या काळापासूनचाही वारसा सांगितला जातो. गिरड येथील टेकडीवरील फरीदबाबांचा दर्गाही जिल्ह्याचे आध्यात्मिक वैभव सांगून जातो. कापसी येथील वर्धा नदीच्या किनाऱ्यावरील लक्ष्मीनारायणाचे मंदिर, ठाणेगाव येथील अंबामातेचे मंदिर (शालिवाहन शके ११४५), ढगा येथील जंगलातले पहाडाच्या कपारीतील धौम्य ऋषींच्या साधनाकाळातील शिवपिंड, मांडगावचे राममंदिर, देवळी तालुक्यातील भिडीचे कृष्णमंदिर, कोटेश्वर येथील कोटेश्वराचे भस्मागिरी शिवमंदिर जिल्ह्याचे आध्यात्मसाधना वैभव सांगणारेच आहे.

गांधीजी वर्ध्यास आले ते सेठ जनमालालजी बजाज यांच्यामुळे. त्यांनी निवासाकरिता सेवाग्राम निवडले. १९३६ नंतर जिल्ह्यात सांस्कृतिक आणि सामाजिक क्रांतीयुगच अवतरले. जमनालाजी बजाज यांच्या आजोबांनी १९०५ मध्ये बांधलेले लक्ष्मीनारायणाचे मंदिर १७ जुलै १९२८ रोजी सर्वांना जमनालालजींनी खुले केले आणि गांधीजींना अभिप्रेत सामाजिक क्रांतीपर्वाच्या वाटचालीची मुहूर्तमेढ केली. सेवाग्राम आश्रमातील बापूकुटी, बा कुटी, परचुरेशास्त्री कुटी, महादेवभाई देसाई कुटी आदी निवास, गांधीजींचे आखरी निवास जगाचे श्रद्धास्थानच नाही तर प्रेरणास्थान असून, देशाचा मानबिंदू आहे. बापूकुटीत स्वातंत्र्य लढ्याच्या मसलती झाल्या. त्यांचे नियोजन झाले त्यामुळेच सेवाग्राम हे स्वातंत्र्यलढ्याच्या

**लक्ष्मी- नारायण मंदिर**



राजधानीचे स्थळ ठरले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रेरणेने आणि खंजिरी भजनाने स्वातंत्र्य लढ्यात आष्टीचा अभूतपूर्व संग्राम उभा राहिला आणि त्याचा देशात इतिहास झाला. तळेगावच्या जंगल सत्याग्रहाने अभूतपूर्व क्रांती केली. विनोबाजींनी १९३७ मध्ये जमनालालजींच्या पवनार येथील लाल बंगल्यात परमधाम आश्रमाची स्थापना केली. १३ मार्च १९५९ रोजी त्यांनी येथेच ब्रह्मविद्या मंदिर स्थापन केले. हा विनोबाजींचा अध्यात्मसाधनेचा प्रयोग होता. भूदान यज्ञाची पवनार कर्मभूमी राहिली आणि पवनारच्या पारंपरिक इतिहासात नवी भर पडली. वर्ध्यातील गीताई मंदिरही असेच आगळे आहे. गाईच्या आकारातील छत नसलेले हे मंदिर आहे. याचे सीमांकन दगडांच्या चिऱ्यांनी झाले असून, या दगडांवर विनोबाजींच्या गीताईचे श्लोक कोरले आहेत. सरहद्द गांधी म्हणजेच अब्दुल गफ्फारखान यांनी या मंदिराची कोनशिला बसविली होती. शेजारीच विशाल बौद्धस्तूप आहे.

### निसर्ग समृद्धी

वर्धा जिल्हा निसर्ग वनराईने समृद्ध आहे. येथील सागाची झाडे राज्यात नावलौकिक मिळवून आहेत. धाम प्रकल्प, बोर अभयारण्य पर्यटन केंद्र आहे.बोर अभयारण्यातील व्याघ्र समृद्धी राज्यात नाव राखून आहे. विविध प्रकारच्या वृक्षांनी नटलेला खळाळत्या नाल्यांना साद देणारा किनारा, विशाल जलसाठा जपणाऱ्या नद्या, जलाशये, प्राचीन बारव, अशी निसर्ग समृद्धीची साथ जिल्ह्यात मिळते. उलट जपणुकीकडेच कल अधिक आहे.

**गांधी ज्ञान मंदिर**



### अर्वाचीन परंपरा

बदलत्या काळात बरीच स्थित्यंतरे झाली. गावागावांतील रस्त्यांचे सिमेंटीकरण झाले. विकासाची माणके बदलली, पण ती मनांची समृद्धी न बदलताच गावागावात दळणवळणाची साधने उभी राहिली. ग्रामोद्योगाला फेरचालना देण्याची गरज वाटू लागली. सिंचनविकास झाला. वीजप्रकाशाने गावे उजळून निघाली. उद्योग उभे राहिले. सिंचनात मोटीचा वापर व्हायचा तेथे वीजपंप आले. धाम, बोर, निम्नवर्धा, कारनदी आदी प्रकल्पांनी जिल्ह्यात सिंचनाची सुविधा उपलब्ध करून दिली. राष्ट्रसंतांच्या ग्रामविकास साधनेत काही गावांनी कायम स्वच्छतेचा वसा जपला. साडेनऊशे गावांत किमान बाराशे बचतगटांनी महिला समृद्धीची वाटचाल सुरू झाली. वर्धा, देवळी, हिंगणघाट शहराच्या सीमारेषेवर मोठ्या उद्योगांची मालिका उभी राहिली. राज्याच्या राजकारणात जिल्ह्याने समृद्ध विचारसरणीने आपला वाटा उचलला. सहकारातून विकाससाधना सुरू झाली. ज्ञानाची विविध दालने विविध शाळा महाविद्यालयांतून खुली झाली. शहरांच्या कक्षा विस्तारल्या. शेतकऱ्यांच्या आंदोलनात जिल्ह्याने सक्रिय सहभाग घेतला आणि चळवळीचा वारसा कायम ठेवला. माणसांची मने जागरूक राहिली. हेच जिल्ह्याचे स्वरूप आहे. वाहनांची रस्त्यावरील वर्दळ मनाच्या भटकंतीपासून चार पावले दूर राहिली. माणसांचा पेहेराव बदलला. सुटाबुटातील माणसे वाढली, पण मनांचे साधेपण तेच कायम आहे. विचारांचा जागर आजही कायम आहे. संगणकाचा वापर वाढला. महिलांतील जागृती वाढली. साक्षरता वाढली आणि अक्षयाचा ध्यासही वाढला. येथे आंदोलने होतात. त्यात दम असतो पण दगा नसतो. गांधीजींच्या परंपरेत विकसित झालेल्या जिल्ह्याने त्याचे वैशिष्ट्य जपतच विकासाची स्थित्यंतरे घडविली आहेत.



**काँग्रेस कार्यकारीणीच्या बैठकीनंतर बजाजवाडीत विविध विषयांवर चर्चा करीत असलेले जमनालालजी बजाज, राजेंद्र प्रसाद आणि सरदार पटेल.**

सहकार महर्षी कै. बापूरावजी देशमुख, कै. प्रभाताई राव, माजी खासदार कै. संतोषराव गोडे, नानाजी कदम, कै. शंकरराव सोनावणे, कै. बंसीलालजी पाटणी, माजी खासदार आणि कामगार नेते कै. रामचंद्र घंगारे, कै. डॉ. शरद काळे यांचे राज्याच्या राजकारणात योगदान राहिले आहे. विधानसभेचे माजी उपाध्यक्ष प्रमोदबाबू शेंडे, खा. दत्ताजी मेघे, राज्यमंत्री रणजीत कांबळे, आमदार सुरेश देशमुख, अशोक शिंदे, माजी आमदार अमर काळे, राजू तिमांडे, माजी खासदार विजय मुडे, सुरेश वाघमारे यांचेही जिल्ह्याच्या वाटचालीत मोठे योगदान आहे.

**संपर्क : ९९२२४४७९८१**

भ्रमती

# वाघांचा आणि विश्रामगृहांचा मेळघाट...



● जितेंद्र गुलाबराव रोडे

घाटांचा मेळ, मेळघाट, नागवेलीचा वळणाचा रस्ता, दोन्हीकडून गगनचुंबी पहाड, भव्य कातळांना चिरत, गुलाबी थंडीचा बोचरा आनंद अन् कधी दाट धुके, रिमझिम पावसाच्या अंगावर अलगद पडणाऱ्या सरी, दऱ्यांमध्ये नजर वळली की दिसतात धो-धो कोसळणारे धबधबे, जणू स्वर्गात आल्याचा अद्‌भुत अनुभव आणि तो द्विगुणित करण्यासाठी मेळघाटात पर्यटकांची प्रतीक्षा करणारी ब्रिटिशकालीन विश्रामगृहे.

विदर्भातील पर्यटन स्थळ चिखलदरा आणि सर्वांत मोठे व्याघ्र प्रकल्पाचे जंगल मेळघाटात आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसर म्हणजे धारणी, चिखलदरा आणि काही भाग अचलपूर तालुक्याचा कोरकू, गोंड, गवळी, बलई या जमातीचे लोक येथे राहतात. जवळपास ८० टक्के आदिवासी कोरकूंची संख्या आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांना नैसर्गिक पर्यावरणाचा मनसोक्त आनंद लुटता येतो. दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून काही काळ मनःशांती प्राप्त करण्यासाठी दूरदूरचे पर्यटक येथे येतात. मेळघाट हा एक प्रकारचा पृथ्वीवरचा स्वर्गच आहे. येथील वनसंपदेमुळे आणि भौगोलिक परिस्थितीमुळे हे अतिशय मनमोहक असे ठिकाण आहे. येथील निसर्ग सौंदर्यामुळे इंग्रज अधिकारी या भागाकडे आकर्षित झाले. निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी या मेळघाट वनक्षेत्रामध्ये, येथील दऱ्याखोऱ्यांमध्ये फिरायला ते येऊ लागले. येथे राहू लागले. इंग्रज लोकांनी आपल्या विश्रांतीसाठी या अतिदुर्गम भागामध्ये विश्रामगृहांचे बांधकाम आपल्या कलाकौशल्याने करवून घेतले. मेळघाट वनक्षेत्रामध्ये ब्रिटिशांनी जवळजवळ २१ विश्रामगृहांची निर्मिती केली आहे. ही सर्व विश्रामगृहे विशेषकरून नदीकिनारी एका विशिष्ट पद्धतीने बांधलेली आहेत.

१८५३ मध्ये इंग्रज कॅप्टन रॉबीन्सन याने चिखलदरा पर्यटन स्थळासह परिसराचा शोध लावला. कॅप्टन मिडोज टायलर, जनरल वेलस्टीन यांचासुद्धा या शोध मोहिमेत समावेश होता. या गगनचुंबी पहाडावर जाण्यासाठी रस्ता तयार करण्यापासून तर विश्रामगृहांची त्या काळी केलेली निर्मिती अनेकांना आश्चर्यचकित करणारी ठरते. १८५३ मध्ये इंग्रजांनी वनसत्ता आपल्या ताब्यात घेतली आणि संरक्षित मेळघाटची निर्मिती झाली. बैरागड आणि गुगामल या दोन भागांत त्याचे विभाजन केले. मेळघाटात सर्वाधिक सागवन वृक्ष आणि वाघांची संख्या पाहता जंगलाला 'A' वर्गाचा दर्जा देण्यात आला. १८६६ मध्ये बैरागड, १८७६ मध्ये गुगामल अतिसंरक्षित दर्जाचे वनक्षेत्र घोषित करण्यात आले.

१९१३ मध्ये मेळघाटातील उर्वरित जंगल आरक्षणात घेण्यात आले. त्यानुसार बैरागड, चिकल्दा, कोहाना, गुगामल, ताप्ती, पिंगी, बोड, झापनदेव, दाबीया, धुळघाट, वान, रूपागड, खिरपानी, मुथा, चिखली असे १५ खंड तयार करण्यात आले. सागवन आणि वाघांची संख्या पाहता बेरार फॉरेस्ट नियम १८७१, बेरार फॉरेस्ट लॉ १८८६, १८९१ नुसार वन व्यवस्थापनाचे कार्य इंग्रजांनी सुरू केले होते. १९२७ मध्ये इंग्रजांनी शिकार ब्लॉक्स प्रणाली अस्तित्वात आणली आणि मेळघाटात शिकारीसाठी सूट मिळाली. शिकारीसाठी इंग्रजांची ये-जा मेळघाटात वाढली. १९५५-५६ मध्ये तर मेळघाट शिकाऱ्यांची प्रथम पसंती ठरले. ५३ शिकाऱ्यांना त्या काळी परवाने वाटण्यात आले. शिकारीसाठी येताना जंगलामध्ये राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून प्रत्येकी १५ ते २० किलोमीटर अंतरावरील विश्रामगृहांची निर्मिती करण्यात आली. जवळपास २१ विश्रामगृहे त्या काळी बनविण्यात आली. त्यामध्ये परतवाडा शहरातील दोन घटांग, सेमाडोह, माखला, जारीदा, रायपूर, हतरु, कोलकास, चौराकुंड, रंगुबेली, हरिसाल, तारुबांदा, ढाकणा, चुनखडी, बेलकुंड, धारगड, कोकरु, खटकाली, सह धारणी आणि चिखलदरा या तालुकास्थळांचा समावेश आहे. विश्रामगृहांची निर्मिती करताना इंग्रजांनी त्यांच्या बग्गीचे घोडे जेथपर्यंत चालू शकतात तेवढ्याच अंतरावर विश्रामगृहे बांधली. ही विश्रामगृहे आजही सुस्थितीमध्ये उभी आहेत.

**सफर विश्रामगृहांची**

ब्रिटिशकालीन विश्रामगृहे सार्वजनिक बांधकाम विभाग, वनविभाग, व्याघ्र प्रकल्प सिपना व गुगामल विभागांच्या ताब्यात आहेत. सर्वांत जास्त विश्रामगृहे व्याघ्र प्रकल्पाच्या अखत्यारीत येतात. वरील २१ विश्रामगृहांपैकी अतिसंरक्षित असलेल्या एकमात्र कोकटु येथील विश्रामगृहाचे आरक्षण होत नाही. परतवाडा शहरात १९१२ मध्ये विश्रामगृह तयार करण्यात आले. येथे इंग्रजांची फलटन (फौज) तैनात राहत होती. याच शहरात इंग्रजांनी १९१३ मध्ये काही अंतरावर २ कक्ष असलेले विश्रामगृह तयार केले होते. हे विश्रामगृह अत्यंत



कोलकास विश्रामगृह

व्ही.आय.पी. आहे. या ठिकाणी कार्यरत असलेला खानसामा नंदवंशी मसाल्याने भरलेल्या वांग्यांची भाजी सुरेख करतो. या विश्रामगृहांचा वापर मेळघाटात जाण्यापूर्वी व मेळघाटाचा प्रवास करून आल्यानंतर विसावा घेण्याकरिता केला जातो. या विश्रामगृहावरून पुढील विश्रामगृहांचा प्रवास निश्चित करता येतो. मेळघाटात घटांगमार्गे जाताना परतवाड्यावरून अगदी २३ कि.मी. अंतरावर १८७८ मध्ये इंग्रजांनी स्थापित केलेले विश्रामगृह चांगल्या स्थितीत स्वागतासाठी सज्ज असते. या ठिकाणी २ कक्ष असून, जेवणाचे साहित्य नेल्यास







सेमाडोह धबधबा

खानसामा रुचकर भोजन तयार करून देतो. हे विश्रामगृह सार्वजनिक बांधकाम विभाग, चिखलदरा यांचे अधिनस्त असून, या विश्रामगृहाचे आरक्षण चिखलदरा येथून केले जाते. या विश्रामगृहाच्या चहूबाजूने निसर्गरम्य वातावरण असून, या ठिकाणी आपल्याला मोर, जंगली म्हशी पाहावयास मिळतात. या विश्रामगृहानंतर धारणी मार्गावर वसलेले सेमाडोह हे विश्रामगृह इंग्रजांनी पूर्णतः काळ्या दगडात बांधले. या ठिकाणी या विश्रामगृहाच्या बाजूने रायपूर नाला म्हणजेच माखला नदी वाहत असून, मागच्या बाजूने सिपना नदी दुथडी भरून वाहते. त्यामुळे येथील नैसर्गिक वातावरण सर्वांना मोहित करून टाकते. हे विश्रामगृह सार्वजनिक बांधकाम विभाग चिखलदरा यांचे अधिनस्त आहे. मेळघाटच्या नागमोडी रस्त्यावरून जाताना सेमाडोहवरून १८ कि.मी. अंतरावर अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी घनदाट झाडी व पांढऱ्या पाण्याच्या धबधब्यांचा साक्षीदार असलेले माखला हे विश्रामगृह अत्यंत देखणे आहे. या विश्रामगृहावर जेवणाचा बेत असल्यास पूर्णतः सर्व साहित्य सोबत नेऊन तेथील खानसामाच्या माध्यमातून भोजनाची व्यवस्था करून घ्यावी लागते. या ठिकाणी आमराई असून, तेथे अस्वल आपल्याला पाहावयास मिळतात. या विश्रामगृहावर पक्षितज्ज्ञ मारोती चित्तमपल्ली यांचा विशेष मुक्काम राहिलेला आहे. हे विश्रामगृह सिपना वन्यजीव विभागांतर्गत येत असून, याचे आरक्षण परतवाड्यावरून करता येते.

वेगवेगळ्या रंगांच्या रानझेनीयाच्या सौंदर्याने मन मोहून टाकणारे चुनखडी हे विश्रामगृह सिपना वन्यजीव विभागांतर्गत आरक्षित होत असून, या ठिकाणी राहण्याची व्यवस्था आहे, परंतु जेवणाची व्यवस्था या ठिकाणी होत नाही. त्यामुळे हे विश्रामगृह मुक्कामाच्या सोईने सध्यातरी योग्य नाही. या ठिकाणी मुक्काम केल्यास जंगली कुत्र्यांचा कळप तसेच अस्वल नजरेस पडतात. अस्वलांचा सतत राबता असलेले जारीदा हे विश्रामगृह पूर्व मेळघाट, वनविभाग यांच्या अधिनस्त आहे. या विश्रामगृहाची निर्मिती १८६०-६१ मध्ये ब्रिटिशांनी केली असून, या विश्रामगृहात दोन भव्य कक्ष व वेगळे स्वयंपाकगृहसुद्धा तयार आहे. या ठिकाणी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था आहे. या विश्रामगृहावर अस्वल, हरिण यांसारखे वन्य प्राणी नेहमीच नजरेस पडतात. या विश्रामगृहाचे आरक्षण चिखलदरा व परतवाडा पूर्व मेळघाट येथून केले जाऊ शकते. उंच उंच वनराजीच्या कीर्र अशा अंधारात वसलेले हतरू हे विश्रामगृह जंगलाच्या मध्यभागी आहे. हे विश्रामगृह सेमाडोहवरून ४० कि.मी.वर तर रायपूर व जारीद्यावरून २० कि.मी. अंतरावर इंग्रजांनी वसवलेले असून या ठिकाणी जाण्याकरिता रस्ता फारच अवघड आहे. प्रवासाकरिता उपलब्ध असलेले वाहन चांगल्या स्थितीत असेल तरच या ठिकाणचा प्रवास करणे सोपे जाते. या ठिकाणी जेवणाची व्यवस्था करावयाची असल्यास सर्व साहित्य सोबत न्यावे लागते. या ठिकाणी कार्यरत असलेला खानसामा चांगल्या प्रकारचे भोजन तयार करून देतो. हे विश्रामगृह सिपना वन्यजीव विभाग यांच्या कार्यालयाद्वारे आरक्षित केले जाऊ शकते.

रायपूर-सेमाडोह वरून २० कि.मी. अंतरावर १८९२ मध्ये बांधलेल्या या विश्रामगृहाचा परिसर म्हणजे आदिवासी समुदायाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा आहे. हे विश्रामगृह सिपना वन्यजीव विभागांतर्गत येत असून, या ठिकाणी जाण्याकरिता अवघड रस्ता ओलांडत व मोहाच्या फुलांचा तसेच विविध जंगली फुलांना बघत रायपूर विश्रामगृह आपल्याला गाठता येते. या ठिकाणी जेवणाच्या व्यवस्थेकरिता सर्व सामग्री सोबत न्यावी लागते. खळखळ वाहणाऱ्या सिपना नदीच्या किनाऱ्यावर वसलेले कोलकास हे विश्रामगृह परतवाडा-धारणी या महामार्गावर सेमाडोह येथून २० कि.मी. अंतरावर वसले असून, या ठिकाणी निवासाकरिता ४ कक्ष आहेत. या कक्षांना खापरा, सिपना, खुर्सी, खुंड या नदीची नावे देण्यात आली आहेत. या विश्रामगृहावरून सिपना नदीचा देखावा सुरेख दिसतो. या विश्रामगृहाचे आरक्षण व्याघ्र प्रकल्प कार्यालय, अमरावतीवरून होते. निसर्गनिर्मित जलकुंडाजवळ चौराकुंड या विश्रामगृहावर इंग्रजकालीन दोन कक्ष असून, नव्यानेच आणखी एका कक्षाची निर्मिती सुरू आहे. या ठिकाणी मेळघाटातील विविध पक्षांच्या जाती निरीक्षणासाठी देश-विदेशातील पर्यटकांची गर्दी असते. घनदाट जंगलामध्ये लपून बसलेले रंगुबेली हे विश्रामगृह १८७१ मध्ये बांधण्यात आले आहे. या ठिकाणी जगविख्यात शिकारी जिम कार्बेट १९४३-१९४४ मध्ये वाघाच्या शिकारीकरिता मुक्कामाला होते. हे विश्रामगृह जंगलाच्या मध्यभागी असून या विश्रामगृहाच्या काही अंतरावर तापीनदी वाहते. या ठिकाणी पर्यटकांच्या सोईकरिता काही सुविधासुद्धा उपलब्ध केल्या गेल्या आहेत. या विश्रामगृहावर निवासाकरिता दोन कक्ष असून, आजूबाजूने उंच उंच झाडांच्या सावलीत हे विश्रामगृह वसलेले आहे. हे विश्रामगृह सिपना वन्यजीव विभाग या कार्यालयातून आरक्षित केले जाऊ शकते. मेळघाटातील आदिवासींचे बाजारहाटाचे मुख्य केंद्र धारणी आहे. मेळघाटातील धारणी हे गाव तहसील

असून, येथील विश्रामगृहात ब्रिटिशकालीन दोन कक्ष आहेत. येथे जेवणाची व राहण्याची उत्तम व्यवस्था आहे. हे विश्रामगृह धारणी येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, यांच्या अधिनस्त असून येथे सर्व सुखसोई उपलब्ध आहेत. हिरव्यागार अशा झाडीमध्ये असलेले हरिसाल परतवाडा-धारणी या महामार्गावर रस्त्याच्या कडेला हे विश्रामगृह सार्वजनिक बांधकाम विभाग, धारणी यांच्या अधिनस्त येत असून या ठिकाणी निवासाचे दोन कक्ष आहेत. हवेवर झुल्यासारखे बांधले असल्याचा भास होणारे तारूबांधा गुगामल वन्यजीव विभाग यांचे अधिनस्त असणाऱ्या तारूबांधा विश्रामगृहात राहण्याकरिता अत्याधुनिक सोईचे दोन कक्ष आहेत. या ठिकाणी जेवणाची उत्तम व्यवस्था केली जाते. परंतु, सामग्री सोबत न्यावी लागते. या विश्रामगृहावरून साधु कुंडी व अन्य पर्यटन स्थळे पाहण्याकरिता पैदल भ्रमणसुद्धा करता येते. हे विश्रामगृह गुगामल व्याघ्र प्रकल्प परतवाडा येथून आरक्षित केले जाते. विविध पक्षांच्या किलबिलाटाने रमणीय असलेले ढाकणा. १९०८ साली स्थापित करण्यात आलेल्या गडगा नदीच्या किनाऱ्यावरील या विश्रामगृहामध्ये राहण्याकरिता दोन कक्ष आहेत. या ठिकाणी कार्यरत असलेले खानसामा वेगळाच स्वाद असलेला गवती चहा उपलब्ध करून देतात. या ठिकाणी जेवणाची व्यवस्था चांगल्या प्रकारे केली जाते. परंतु, सामग्री सोबत न्यावी लागते. बाजूलाच गडगा नदी असल्यामुळे तेथील सौंदर्य पर्यटकांना विशेष आकर्षित करते. विविध झाडांच्या पालापाचोळ्यामध्ये असलेले बेलकुंड हे विश्रामगृह १८९१ साली बांधण्यात आले. हे विश्रामगृह काही प्रशासकीय कारणास्तव बंद असल्याने या ठिकाणी पर्यटकांसाठी राहण्याची कोणत्याच प्रकारची व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे या विश्रामगृहाच्या परिसरात डबा पार्टी किंवा स्वतः जेवणाची व्यवस्था करून येथील परिसरात असलेल्या उंच उंच गवतात व मागे असलेल्या दऱ्याखोऱ्यांत फिरण्याचा आनंद घेता येतो. परंतु, त्याकरिता जाणकार व्यक्ती सोबत असणे आवश्यक आहे. या विश्रामगृहाच्या बाजूने इंग्रजांनी बनविलेला दगडी पूल चांगल्या स्थितीत पाहायला मिळतो. पळसांच्या गुलाबी रंगछटांमध्ये बसलेले खटकाली हे विश्रामगृह १८७१ मध्ये बांधण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभाग धारणीच्या अधिनस्त असलेल्या खटकाली या विश्रामगृहात दोन कक्ष आहेत. या विश्रामगृहावर जाण्याकरिता अरुंद अशा टेकडीवरून मार्गक्रमण करीत खोंगडामार्गे पोहोचता येते तसेच अकोटवरूनसुद्धा या ठिकाणी जाण्याची व्यवस्था



सेमाडोह विश्रामगृह



चिखलदरा

आहे. परंतु, खोंगडा-बेलकुंड मार्गे येणारा रस्ता मोहित करणारा आहे. या ठिकाणी जेवणाची संपूर्ण व्यवस्था केली जाते. हे विश्रामगृह धारणीवरून आरक्षित केले जाते. नयनरम्य आणि नैसर्गिक सौंदर्याने ओतप्रोत ओसंडून वाहणाऱ्या मनमोहक ठिकाणी असलेले धारगड अकोट वन्यजीव विभागांतर्गत येणारे हे विश्रामगृह १९६२-६३ मध्ये निर्माण झाले आहे. या ठिकाणावरून गुल्लरघाट पर्यटन केंद्र जवळ असून, या केंद्रावर माहिती घेऊन धारगड विश्रामगृहाच्या दोन कक्षांत राहण्याची व्यवस्था केली जाते. या विश्रामगृहावरून जंगल भ्रमंतीची व्यवस्था केली जाते. या ठिकाणी जेवणाची सामग्री सोबत न्यावी लागते. हे विश्रामगृह अकोट वन्यजीव येथून आरक्षित केले जाते. विदर्भाचे नंदनवन म्हटले जाते अशा थंड हवेच्या ठिकाणी असलेली चिखलदरा येथील दोन विश्रामगृहे सन १८२३ व १८८२ मध्ये निर्माण केली.

या विश्रामगृहात अगोदर आरक्षण झाल्यावरच राहण्याची व्यवस्था होऊ शकते. पर्यटकांना मन मोहित करणाऱ्या अनेक स्थळांना येथे भेट देता येते. चिखलदऱ्यातील इतिहासकालीन गावीलगड किल्ला, महाभारतकालीन भीमकुंड, एका ध्वनीला प्रतिसाद देणारा पंचबोल, आदिवासींचे कुलदैवत मंदिर, वैराट सनसेट, मेळघाटचा स्वर्ग कोलकास, सेमाडोह येथे जंगल सफारी अशा अगणित स्थळांना दरवर्षी शेकडो पर्यटक भेटी देतात.

### मेळघाट अमूल्य ठेवा

१९७४ मध्ये स्थापित मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघ, बिबट, गवा, सांबर, चितळ, नीलगाय, भेडकी, रानकुत्री, चौसिंगा, चांदीअस्वल, उडी खार आदी प्राण्यांसह २६८ प्रकारचे पक्षी ज्यामध्ये ५४ प्रकारचे सर्प, ९६ प्रजातीचे मासे, ९९ प्रकारची घार.. त्यामध्ये २३ प्रकारची उडणारी घार, सर्प गरुड, १० प्रकारचे प्रमुख वृक्ष, ३१६ प्रकारचे आयुर्वेदिक औषधी, आदी वृक्षवेलींसह, सिपना, खंडू, गडगा, डोलार, खापरा, तापी, वान, पूर्णा, चंद्रभागा या नद्यांचा समावेश आहे.

### कसे येणार मेळघाटात?

उपराजधानी नागपूरपर्यंत येण्याची सुविधा आहे. तेथून १५० कि.मी. अंतरावर अमरावती हे जिल्ह्याचे ठिकाण. रेल्वेमार्गाने आल्यास अमरावती व बडनेरा येथे रेल्वे स्टेशनवर उतरल्यास तेथून ५० कि.मी. अंतरावर परतवाडा हे शहर. मेळघाटच्या कुठल्या भागात पर्यटनाला जायचे हे ठरविण्यासाठी परतवाडा शहर केंद्रबिंदू आहे. विदर्भाचे नंदनवन चिखलदरा या परतवाडा शहरापासून धामणगाव गढी मार्गे केवळ ३२ कि.मी. अंतरावर आहे. घाटवळणाच्या मार्गे परतवाडा बस स्थानकावरून परिवहन महामंडळाची बस येथून दिवसभर ये-जा करते; तर खाजगी गाडीसुद्धा परतवाडा शहरातून भाड्याने उपलब्ध राहतात. परतवाडा येथून व्याघ्र प्रकल्पाच्या सेमाडोह येथील निसर्ग निर्वाचन संकुलासाठीसुद्धा जाता येते. ५० कि.मी. अंतरावर सेमाडोह, चिखलदरा-सेमाडोहचे अंतर २५ कि.मी. आहे. चिखलदरा पर्यटन सफरी दरम्यान उंच पहाड, नागमोडी रस्ता आणि आल्हाददायी वातावरणाने मन प्रफुल्लीत होते. मनमोहक दृष्य असणारे पॉईंट पर्यटकांना आकर्षित करतात.

वरील सर्व विश्रामगृहांच्या आरक्षणाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर ०७२२३-२२०२६०, सार्वजनिक बांधकाम विभाग चिखलदरा ०७२२०-२२३०२२/२४, सार्वजनिक बांधकाम विभाग, धारणी - ०७२२६-२२४२४२, पूर्व मेळघाट, चिखलदरा - ०७२२०-२३०२२९, सिपना वन्यजीव विभाग - ०७२२३-२२०२१४, गुगामल वन्यजीव विभाग - ०७२२३-२२०६४३, अकोट वन्यजीव विभाग - ०७२५८-२२२२११, क्षेत्र संचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती - ०७२१-२५५१७६६ या क्रमांकांवर संपर्क करून आरक्षण करता येते.

**संपर्क : ९४२२१५८००५**

MSACS
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

# शिक्षणातून सुरक्षितता

ज्ञान, स्थलांतर आणि दारिद्र्य या मुख्य घटकांमुळे आदिवासी समाजाचा सामाजिकदृष्ट्या जोखीमग्रस्त गटामध्ये समावेश होतो. एच.आय.व्ही./एड्सच्या बाबतीत काही अभ्यासाच्याद्वारे असे दिसून आले आहे की, आदिवासी हे धोक्याच्या पातळीवर आहेत. कारण, कमी वयात लग्न होणे, अल्प वयात लैंगिक पूर्ती करणे, विवाहापूर्वी व विवाहबाह्य लैंगिक संबंध ठेवणे या गोष्टी ठळकपणे अभ्यासाअंती निदर्शनास आल्या आहेत. पती व पत्नी हे विभक्त किंवा त्यांनी पुन्हा लग्न करणे या गोष्टी समाजमान्य आहेत. निरोधचा वापर सर्रासपणे टाळला जातो किंवा निरोध वापरणे आवडत नाही असेही लक्षात आले आहे.

बहूतांश आदिवासी समाज हा गुप्तरोग व एच.आय.व्ही./एड्सच्या बाबतीत अनभिज्ञ आहे.

बहुतांश आजारांवर आदिवासी समाजातील व्यक्ती या घरगुती औषधोपचार, वैदू, भगत यांचा मार्ग स्वीकारतात व त्यांच्याकडून औषधे घेतात.

इतर अभ्यासकांच्या अभ्यासातसुद्धा असे आढळून आले आहे की, आजही कलंक, भेदभाव, संकुचित वृत्ती यामुळे महिला या लिंगसांसर्गिक तसेच गुप्तरोगांसारख्या आजाराला बळी पडतात किंवा आजाराचा खूप मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाल्यावर आरोग्य केंद्राकडे धाव घेतात. आदिवासी समाजाला मुख्य घटक मानून त्यांच्यासाठी यापूर्वी एच.आय.व्ही./एड्स या विषयावर कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम कार्यक्रम राबविले गेले नव्हते. या सर्व गोष्टींचा अभ्यास केल्यानंतर सन २०१० पासून महाराष्ट्रातील ठाणे, पुणे, अहमदनगर, नांदेड, नंदुरबार, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, जळगाव व अमरावती या जिल्ह्यांतील १६ आय.टी.डी.पी. विभागांतील कार्यक्षेत्रात ग्रामपंचायत, सरपंच, आश्रमशाळा मुख्याध्यापक, अधीक्षक, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कर्मचारी यांच्यामध्ये प्रशिक्षणाच्या माध्यमातून एच.आय.व्ही./एड्सविषयी जनजागृती करण्याचे काम महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या वतीने आदिवासी क्षेत्रात चालू आहे.

साधन
हेल्पलाइन
022-2411 4000

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या सहकार्याने एचआयव्हीविरुद्ध नियोजनबद्ध लढा सन १९९९ पासून सुरू आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील वाडी, वस्ती, गावांमधून विविध शासकीय, अशासकीय, शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून एचआयव्हीविरोधी जनजागृतीचे काम अत्यंत योजनाबद्ध रितीने सुरू आहे.

आजपर्यंत एच.आय.व्ही./एड्स या आजाराची माहिती वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून म्हणजेच सुरक्षित रक्तपुरवठा (रक्तसुरक्षा), एकात्मिक समुपदेशन व सल्ला चाचणी केंद्र (आयसीटीसी), पालकांकडून बालकास होणारा एच.आय.व्ही. संसर्ग (पीपीटीसीटी), प्रहरी संरक्षण (सेंन्टीनल सर्व्हीलन्स), कौटुंबिक आरोग्य जागृती मोहीम, समुदाय देखभाल केंद्र, ड्रॉप इन सेंटर इत्यादी सोयीसुविधा, एच.आय.व्ही./एड्स व्यक्तीसाठी संस्थेमार्फत पुरविल्या जातात; तसेच १ ऑक्टोबर (जागतिक रक्तदान दिवस), १ डिसेंबर (जागतिक एड्स दिन), १ ते ७ एप्रिल (जागतिक आरोग्य सप्ताह) अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून एच.आय.व्ही./एड्सविषयी जनजागृतीचे काम नियमित सुरू आहे.

वेगवेगळ्या संदर्भ सेवा पुरविण्यासाठी व कार्यक्रमाचा एक भाग म्हणून संस्थेने सन २०१० पासून आदिवासी मुख्य प्रवाह (मेनस्ट्रिमिंग ट्रायबल ॲक्शन प्लॅन) हा प्रकल्प सुरू केला आहे. महाराष्ट्रातील एकूण १६ आयटीडीपी विभागांत हा प्रकल्प सुरू आहे. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई तसेच जिल्हास्तरावरील जिल्हा एड्स नियंत्रण पथक, आयटीडीपी विभागातील प्रकल्प समन्वयक यांच्या सहकार्याने आदिवासी कार्यक्षेत्रातील ११ जिल्ह्यांतील १६ आयटीडीपीमध्ये पुढील लक्ष्यगटातील प्रतिनिधीसाठी म्हणजेच, ग्रामपंचायत सरपंच, आश्रमशाळा मुख्याध्यापक व शिक्षक अधीक्षक, तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कर्मचारी (आयटीडीपी स्टाफ), स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी यांना एच.आय.व्ही./एड्सविषयक प्रशिक्षण देऊन त्यांनी आपापल्या स्तरावर ही माहिती सर्वदूर पोहोचवावी हा आदिवासी मुख्य प्रवाहातील प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. वरील सर्व गटांच्या माध्यमातून आदिवासी समाजातील लोकांना आरोग्यविषयक माहिती देऊन संदर्भ सेवांचा लाभ त्यांनी घ्यावा हा ट्रायबल ॲक्शन प्लॅनचा मुख्य उद्देश आहे.

सन २०१० ते सन २०१२ या कालावधीत खालील गटासाठी प्रशिक्षण घेण्यात आले.

| अ.क्र. | प्रशिक्षण | एकूण कार्यशाळा | एकूण प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत सरपंच | ३१ | २०६८ |
| २ | स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी | ०७ | २७९ |
| ३ | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कर्मचारी | ०६ | २३७ |
| ४ | आश्रमशाळा मुख्याध्यापक व शिक्षक तसेच अधीक्षक | १० | ४०० |
| | एकूण | ५४ | २९८४ |

वरील गटातील व्यक्तींना प्रशिक्षणाचा लाभ देऊन त्यांच्याबरोबर आदिवासी समाजास एच.आय.व्ही./एड्सविषयी योग्य ती माहिती देऊन या आजाराचा प्रादुर्भाव रोखणे हा ट्रायबल ॲक्शन प्लॅनचा मुख्य उद्देश आहे. वरील उद्देश सफल करण्यासाठी सर्व स्तरावर सर्वांचे प्रयत्न गरजेचे आहेत.

**– विजय कुलकर्णी,**

# विदेशी थेट गुंतवणुकीचे महाराष्ट्रातील प्रस्ताव

| उद्योग गट | प्रस्तावांची संख्या | गुंतवणूक रक्कम (रु.कोटी) | गुंतवणूक रक्कमेशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| माहिती तंत्रज्ञान | ७६२ | १२,७६५ | १५.० |
| वित्तीय सेवा | ६६७ | ११,८५८ | १४.० |
| हॉटेल आणि पर्यटन उद्योग | ९५ | ६,३२६ | ७.५ |
| व्यवसाय व्यवस्थापन सल्ला | ३६९ | ४,९६२ | ५.८ |
| परिवहन | १०८ | ४,१२४ | ४.९ |
| सिमेंट आणि सिरॅमिक्स | ५८ | ३,७२७ | ४.४ |
| उर्जा व इंधन | ३९ | २,८४१ | ३.३ |
| रसायने व खते | १९७ | २,६६६ | ३.१ |
| विद्युत सामग्री आणि इलेक्ट्रॉनिक्स | २१२ | १,४६७ | १.७ |
| कागद व कागदाचा लगदा | ३१ | १,३२३ | १.६ |
| वस्त्रोद्योग | १२२ | १,०५१ | १.२ |
| अन्नप्रक्रिया | १७३ | १,०३९ | १.२ |
| औषधे व औषधी द्रव्ये | १२१ | १,०१२ | १.२ |
| मोटार वाहने | ११२ | ८९५ | १.१ |
| औद्योगिक यंत्रसामग्री | २६१ | ७७१ | ०.९ |
| प्लॅस्टिक आणि रबर वस्तू | २७ | ७६७ | ०.९ |
| यंत्रसामग्री/औद्योगिक उपकरणे | ८९ | ७१७ | ०.८ |
| इतर | ७७८ | २६,६४७ | ३१.४ |
| एकूण | ४,२२१ | ८४,९५८ | १००.० |

संदर्भ: उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन (महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२)

**R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14**
**Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, October 2012.**
**Date of Publication : 10th of every Month**







## लोकराज्य

## माहिती आणि ज्ञानाचा अपूर्व ठेवा

## लोकराज्य

## नव्या रूपात, नव्या स्वरूपात महाराष्ट्राच्या गावागावात

## ५० लाख वाचकांच्या पसंतीची मोहोर

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

**दिगंबर वा. पालवे**
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे